प्रकरण दुसरे

# 'ल्हावर' कथासंग्रहाचा सर्वांगीण अभ्यास

# प्रस्तावना

श्री. रंगराव बापू पाटील यांच्या 'ल्हावर' कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला आणि खरोखरच एका ग्रामीण कथाकाराला खूप दिवसांनी न्याय मिळाला. त्यांनी 'रानकोंबडी', 'भोवरा' 'मुराळी', 'दंश', 'हिरवी काच', 'बोरबन', 'कारस्थान', 'ल्हावर', 'मळयाची वाट', 'उज्ज्वला', 'अपहरण', 'वस्ताद' इ. कथा आणि कादंबरी लेखन केले आहे. गेले वीस वर्षे महाराष्ट्रातील मान्यवर नियतकालिकामधून रंगराव बापूंची कथा प्रसिद्ध होते आहे. 'गावकरी कथा स्पर्धे'त पुरस्कार मिळालेली त्यांची 'दुपार' ही कथा पंधरा वर्षापूर्वीची आहे. त्यानंतर ते सतत पुरस्कार मिळवीत राहिले.

इस्लामपूरच्या यशवंत हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम करणाऱ्या रंगराव बापूंचे शिक्षण, वडील ज्या ठिकाणी नोकरीला जात तिथे तिथे होत गेले. महाविद्यालयीन शिक्षण 'राजाराम कॉलेज, कोल्हापूर' येथे झाले. कामेरी या गावात त्यांचे बालपण गेले. रंगराव पाटलांच्या साहित्यिक पिंड राजाराम कॉलेज, शाहू मराठा बोर्डिंग, कामेरीची माती यांनी घडविला.

आज ग्रामीण कथा लिहिणारे लेखक आपणांस थोड्या प्रमाणात दिसतात. ग्रामीण कथाच दुर्मिळ होत चालली आहे. या काळात डॉ. आनंद यादव, चारुता सागर यांच्या पंक्तीत रंगराव बापूचे स्थान आहे. सत्यकथेतील 'देऊळ' या कथेने तर मोठ्या अपेक्षा निर्माण केल्या होत्या. थोड्या शब्दात खूप काही सांगून जाण्याची रंगराव बापूंची शैली आपल्या लक्षात आल्याशिवाय रहात नाही. प्रामुख्याने तिसऱ्या पिढीतील हा लेखक असल्याचे आपणास दिसून येते.

डॉ. स. ग. यादव म्हणतात –

"कमीत कमी शब्दात खूप चांगलं लिहिण्याची ताकद याच लेखकांत आजच्या ग्रामीण लेखन करणाऱ्या पिढीत आहे. अस म्हंटल तर वावगं होऊ नये।." १

व्यवहारात अतिशय कमी बोलणारे रंगराव पाटील कथामधूनही तोच प्रत्यय देताना दिसतात. हा लेखक म्हणजे जग सगळं चांगल आहे या विचाराची बैठक असणारा लेखक आहे. साहित्यात सत्यं, शिवं, सुंदरं याचा प्रत्यय देतो आहे. त्यांची कथा मांगल्यपूर्ण आहे. तिच्यात भकासपणा नाही.

ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव, आनंद पाटील, रा. रं. बोराडे, शंकर पाटील, चंद्रकुमार नलगे, संपतराव जाधव, मोहन पाटील या लेखकाच्या परंपरेत या लेखकाचे एक स्वतंत्र स्थान आहे. शासनाने 'ल्हावर' कथासंग्रहाला पुरस्काराच्या निमित्ताने एका लेखकास गौरविले व न्याय दिला आहे.

मराठी ग्रामीण कथेचा जन्म १९४० साली झाला असे मानतात. प्रा. माटे, ग.ल. ठोकळ, र. वा. दिघे ही ग्रामीण कथा लिहिणारी पहिली पिढी, आनंद यादव, शंकर पाटील, चंद्रकुमार नलगे ही तिसरी पिढी व आज नवोदितपणे लेखन करुन या वाङ्मय प्रकारास हाताळणारी रंगराव बापू पाटील, सखा कलाल, महादेव मोरे ही पिढी उदयास आली. श्री. रंगराव बापू पाटील यांचा १९६६ पासूनच्या कथा लक्षणीय ठरणाऱ्या आहेत.

श्री. रंगराव बापू पाटील यांच्या 'ल्हावर' कथासंग्रहाचा शोध आणि त्यांच्या लेखनातून प्रकट होणारे विविध पैलू याचा शोध घेण्याचे या प्रकरणात ठरविले आहे.



13365

## 'ल्हावर'चे मूल्यमापन

रंगराव बापू पाटील यांचा २ ऑगस्ट १९७८ साली प्रकाशित झालेला 'ल्हावर' कथासंग्रह खरोखरच ग्रामीण कथेत भर घालणारा आहे. लेखक जिथं कथा संपवितो तिथेच दुसरी कथा निर्माण होते असा अनुभव पाटलांची कथा देते. त्यांची कथा अंतर्मनाचा तळ शोधत राहते. याला कारण त्यांच्या अनुभवातील ताजेपण, निरागसपण, डोळसदृष्टी, प्रसंगाची अचूक निवड नेमके शब्द, मोहक प्रतिभा, यात त्यांचे यश सामाविलेले आहे. रंगराव बापू पाटील यांच्या कथेचे मूल्यमापन पुढील मुद्यांच्या आधारे करण्याचा प्रयत्न केला आहे.

### १. ग्रामीण कथा

#### अ) ग्रामीण प्रदेश

'ल्हावर' कथासंग्रहातील संपूर्ण कथा या ग्रामीण भागातील कथा आहेत. ती कथा मानवी भावभावनांशी नाते जोडणारी आहे. या सर्व कथा कामेरी, इस्लामपूरच्या आसपास परिसर, ऐतवडे बुद्रुक, जंगमाची शिवपुरी, पुणे–बेंगलोर रोड, येडेनिपाणी इ. परिसरात घडलेल्या आहेत हे दिसून येते.

रंगराव बापू पाटील यांची कथा ग्रामीण कथा आहे हे म्हणण्या पाठीमागचा उद्देश हाच आहे की ती कथा ग्रामीण जीवनातील विविध प्रश्नांना हात घालते. ग्रामीण जीवन जवळून चित्रित करते. विशिष्ट ग्रामीण प्रदेशात त्या कथा घडलेल्या आहेत. या ग्रामीण कथा का वाटतात तर त्यामध्यें ग्रामीण जीवनातील प्रीती व्यक्त झालेली आहे. ती प्रीती 'ल्हावर', 'राखणवाली', 'जोगवा', 'कंदील', 'सय' इ. कथामधून व्यक्त होते. या प्रीतीचे वेगवेगळे स्थर आहेत.

## ब) ग्रामीण प्रीती

ही ग्रामीण प्रीती कधी आईपासून दुरावलेला पक्या, त्याच्याविषयी वात्सल्याच्या पातळीवर चित्रित होते. तर तीच प्रीती कधी स्वत:ची बायको काळी आहे म्हणून दारावर भिक्षा मागण्यासाठी आलेल्या जोगतीणीचा विचार करणारी आहे. ही प्रीती 'जोगवा' या कथेमधून व्यक्त झालेली आहे. मास्तरला जोगतीणीशिवाय काहीच सुचत नसते. अशी ही प्रीतीत गुरफटलेली कथा आहे. प्रीतीविषयीच्या वेगवेगळया आठवणीमधून 'सय' कथेला अविष्कार झालेला आहे. तर ग्रामीण युवतीचे मन प्रेमांनी कसे भारले आहे आणि कुसुम आपल्या मैत्रिणी शानी आणि आनंदी कशा पळून गेल्या तसे आपणही पळून जावे याचा विचार करणे या अनुभवाचे प्रत्यंतर घडविणारी ग्रामीण पातळीवरची 'कंदील' ही कथा आहे. तिच्या विचलीत मनाचे दर्शन 'कंदील' मध्ये घडते. प्रेमाबद्दलची भीतीही तिच्या मनात आहे.

## क) कौटुंबिक प्रश्न

या कथामधून प्रश्नही हाताळले गेलेले आहेत. त्यामध्ये मुलगा–वडील संबंध, नवरा– बायको संबंध, मामा–भाचे संबंध इ. विषय आलेले आहेत. हे कौटुंबिक प्रश्न ग्रामीणतेशी नांते सांगताना दिसतात. तोंडाला बाभळी आलेले आहे म्हणून आबा आपला मुलगा तानाजी याला ल्हावर मारुन आणण्यासाठी सांगतो, पण तानाजी हा ती मारलेली ल्हावर शानीला देऊन रिकामा घरी परततो आणि नंतर त्याला लाजल्यासारखे होते. इथे त्याच्या मनात अपराधीपणाची भावना निर्माण होते. हा अविष्कार 'ल्हावर' कथेमध्ये व्यक्त झालेला आहे.

तर मुलगीला जावई नांदवत नाही म्हणून आबा जाब विचारायला जातो. तेव्हा आपला जावई सरशी नांवाच्या स्त्रीमध्ये गुरफटलेला आहे यावर जाणीव त्याला होते आणि मुलीविषयीचा प्रश्न त्याच्या मनात निर्माण होतो. असे ग्रामीण पातळीवरचे वेगवेगळे प्रश्न कौटुंबिक प्रश्नांच्या माध्यमातून व्यक्त झालेले आहेत. म्हणून पाटलांची कथा ग्रामीण कथा वाटते व तिच्यात ग्रामीण अविष्कार आहे.

## ड) आर्थिक तणाव

'परपंच्या' सारख्या कथामधून आर्थिक तणाव व्यक्त झाला आहे. शेजारच्या हत्तीबाळगौंडाच्या घरात मटन आणलेले पाहून आबाला त्याची बायको मटन आणण्यास सांगते. तेव्हा पैसे नसल्यामुळे तो बायकोला खूप मारहाण करतो. आणि "हाच का परपंच्या करायचीस? " असा प्रश्न विचारतो.

## इ) ग्रामीण निसर्ग

रंगराव बापू पाटील यांच्या 'ल्हावर' कथासंग्रहामधून खेड्यापाड्यातला निसर्ग चित्रित होतो आहे. त्यामध्ये डोंगर, मळा, बागा, पाणंद शेत, वेदांचा मळा, बुद्रुक टेकचा परिसर इ. मधला निसर्ग चित्रित होतो. या परिघात ह्या कथा फुलताना दिसतात. विशेषत: 'दिंडी' या कथेकध्ये पांगिरा चित्रित होतो ते लिहितात –

"वाऱ्यानं पांगिरा शहारतो गदगदतो तांबड्या फुलांच डोळं असमंत न्याहाळतात. रस्ता ... घर .....माणसं ..... सोनाप्पा ..... म्हातारी .... पोर .... आणि पांगिऱ्याचा बुंधा ..... "

दिंडी पृष्ठ क्र.६०

वरीलप्रकारे पांगिऱ्याचे शब्दचित्र पाटील रेखाटतात. वाऱ्यांन पांगिरा गदगदतो आहे. त्यांची फुलं आसमंतात न्याहाळत आहेत. त्याचबरोबर सर्वच त्यामध्ये गदगदत आहेत. म्हातारी, सोनाप्पा आणि पोर असे चित्रण येते.

## ई) ग्रामीण जीवनाला साह्यक मानवेतर जीवन चित्रण

रंगराव बापू पाटील यांच्या कथामधून मानवेतर जीवन चित्रण आलेले आहे. त्यामध्ये कोल्हं, म्हैस, गाढव, कुत्रं, साप, इ. तर पक्ष्यामध्ये ल्हावर, घनछडी, पारवे, व्हला इ. आलेले आहेत. या चित्रामधूनही ही कथा ग्रामीण कथा आहे असे वाटत रहाते.

### ड) ग्रामीण भाषा

रंगराव बापू पाटील यांची 'ल्हावर' मधील कथा ही ग्रामीण कथा आहे. या कथा ग्रामीण भाषेत व्यक्त झालेल्या आहेत. मानवी मनातील वेगवेगळे भावविष्कार या कथेतून व्यक्त झालेले आहेत आणि ते सुद्धा ग्रामीण बोलीतूनच होय. ते लिहितात —

"लईदिंच्या घरनं ल्हावराचं कोरडयास खावं वाटतय ..... पण कुणाला सांगायच? ..... तुझ्यामागं असं बारा बैलाचं काम ..... म्हणून लई दिस घुटकन ठेवल्याली गोष्ट सांगतुय .... . तेच्या कोरडयाशांन जरा चव यील तोंडाला ...." ल्हावर पृष्ठ क्र. ६७

'ल्हावर' कथेतील वर्णनामधून आबा हा आपल्या मुलाजवळ ल्हावर मारुन आणण्यासाठी सांगतो आहे. आपल्या मुलाला खूप काम आहे. म्हणून इतक्या दिवस सांगीतलं नाही असेही तो म्हणतो आहे. हे वर्णन ग्रामीण भाषेतून आलेले आहे आणि हा मानवी मनाचा अविष्कार ग्रामीण भाषेतून व्यक्त होतो.

सारांशरुपाने आपणास असे म्हणता येईल की, या कथा विशिष्ट परिसरात चित्रित होतात. त्या काही वेळेला शेतीच्या अनुरोधाने चित्रित होतात. शेतीप्रधान समाजव्यवस्था, शेतीमधून उपस्थित होणारे प्रश्न या कथेमधून आलेले आहेत. की जे ग्रामीणतेशी नाते सांगणारे आहेत. यातूनच कधी ग्रामीण प्रीती, रुढी परंपरा न ओलाडंता व्यक्त होते. तर कधी मुलगा वडील यांचे संबंध चित्रित होतात. नवराबायकोमधील तणावही कथेमधून व्यक्त होतो. आर्थिक प्रश्न तर आहेतच आणि तो सोडविण्यासाठी गाढवाला औषध चारण्याच्या कल्पनेतूनही श्रद्धा : अंधश्रद्धा या कथेतून व्यक्त होते. वेगवेगळया पातळीवरचा निसर्ग तर कथेची रंगत वाढविण्यासाठी येतो आहे. मग त्यातूनच पांगिरा चित्रित होतो. खेडयापाडयामधला निसर्ग कथामधून येतो. ग्रामीण जीवनाला साह्यक मानवेतर जीवनही कथेतून प्रकट होते. त्यामध्ये प्राणी, पक्षी, जनावरे आहेत. या सर्वांचा

विचार करता रंगराव बापू पाटील यांची 'ल्हावर' मधली कथा ही अस्सल ग्रामीण कथा ठरते. ग्रामीणतेचे सर्व निकष कथेमधून आलेले आहेत. हे कथा अभ्यासल्यानंतर लक्षात येते.

## २) मनोविश्लेषणात्मक कथा

ग्रामीण व प्रादेशिक कथेमध्ये मनोविश्लेषण आल्याचे दिसून येते. शंकर पाटील, व्यंकटेश माडगुळकर, डॉ. आनंद यादव इत्यादींनी जाणीवपूर्वक मनोविश्लेषणाचा भाग फुलविलेला आहे. पाटलांनीही आपली कथा मनोविश्लेषणातून फुलविलेली आहे. त्यांच्या कथामधून मनाचे वेगवेगळे स्थर चित्रित झालेले आहेत. वेगवेगळया पात्रामधून हे मन चित्रित होते.

### अ) आईपासून दुरावलेलं मन

आईपासून दुरावलेलं मन कोणत्या प्रकारे अस्वस्थ असते हे 'ल्हावर' कथासंग्रहातील 'दिंडी' या कथेतून व्यक्त होते. बालमनाचा वेध घेणारी ही कथा आहे. त्यांच्या या कथेने खरोखरच वाचकाच्या मनाची पकड घेतलेली आहे. पक्या मनाशीच काहीतरी बोलतो. चादर मुस्कटून घेतो. दिंडी पुढे–पुढे सरकत जाते. आई नाही याचा परिणाम बालमनावर किती होतो. हे या कथेने दाखवून दिले आहे. सासूच्या छळाला कंटाळून आईने आत्महत्या केली आहे. त्या धक्क्याने बापाला वेड लागले आहे. आई दिंडीतून पंढरपूरला गेलीय असे सांगून पक्याचा बाप ५–६ वर्षाच्या पोरक्या पोराची, पक्याची समजूत काढतो. आई परत येईल याची पक्या वाट पहात असतो. ही कथा तीन पदरी आहे. पक्या, वेडा बाप आणि त्यांची धूर्त आजी असे तीन पदर आहेत.

या कथेच्या संदर्भात महादेव मोरे म्हणतात –

"२–३ पानांच्या मोजक्याच आवाक्यात व नेमक्या शब्दात ही कथा समर्थ कथा लिहिलीय रंगराव पाटलांनी। बालमनाचे चित्रण करणाऱ्या ज्या मोजक्या कथा मराठी साहित्यात आहेत त्यात दिंडीचे नांव अग्रक्रमाने घ्यावे लागेल अशा तोलामोलाची ही कथा आहे." [२]

'दिंडी' या कथेच्या चित्रणातून आपल्या हे नजरेस येते. या कथेमध्ये पांगिऱ्याचे शब्दचित्रही ते अत्यंत कुशलतेने रेखाटतात. ते लिहितात –

"पक्या चादर घेऊन बाच्या मांडीवर कलंडतो ...... मी येत न्हाय आता ..... डोळे मिटून घेतो.

दिंडी वाजत असते. वारकरी बेहोष होऊन नाचत असतात.

ज्ञानेश्वर ऽ ऽ माऊ ऽ ऽ ऽ ली

ज्ञानराज माऊली तुकाराम ऽ ऽ "

डोळयापुढं माणसं नाचताना दिसतात. बुक्का उधळताना दिसतात. दिंडीच्या पालखीपुढं माणसं, आई नाचताना दिसते. ती काय नेसली असेल? पांढर पातळ, आबीरबुक्का कपाळावर, ...... केस सोडलेले. त्याला कुठल्यातरी कीर्तनातली बाई आठवते. वीणा घेऊन बसलेली. त्याला वाटतं, आपली आई तशीच दिसत असेल ...... जाऊया का बघायला? ..... तू का आली नाहीस? ..... मी नको का तूला? .... बस मी येतच न्हाय."

"पक्या स्वताशीच बोलतो आणि चादर अधिकच मुस्कटून घेतो ..... " दिंडी पृष्ठ क्र. ६३,६४

वरील वर्णनामधून असे लक्षात येते की, लहान मुलांच्या मनावर आई नसल्याचा परिणाम किती होतो आहे. तो अनेक विचार करतो आणि दुसरीच कीर्तनातील स्त्री आठवतो. आणि तशीच आपली आई असेल अशी कल्पना करतो. प्रत्यक्षात मात्र आई भेटतच नाही. पक्या उदास होतो. मी तुला नको आहे असे म्हणतो आणि स्वत:च विचारात मग्न होऊन जातो. आईपासून दुरावलेल्या बालमनाचा अविष्कार करणारी ही कथा आहे.

वासुदेव मुलाटे म्हणतात –

" मनोविश्लेषणासाठी रंगराव बापू पाटील हे निसर्ग प्रतिमांचा वापर करतात. "[३] याचे प्रत्यंतर अनेक कथेत येते.

## ब) प्रीतीत गुरफटलेलं मन

प्रीतीत गुरफटलेलं मन प्रामुख्याने आपणांस 'जोगवा' या कथेत दिसून येते. गावापासून दूर असलेला मास्तर, आपल्या आईवडिलांनी हुंड्यापायी काळीकुट्ठ बायको आपल्या पदरात बांधली, तिचा विचार करतो आणि त्याच्या मनाचे खेळ सुरु होतात. शेवटी तो धाडस करुन तिला भेटायला जातो परंतु "मी उद्या गिरीलाल बरोबर आळत्याच्या यात्रेला जाणार आहे." असे जेव्हा ती सांगते तेव्हा मास्तरच्या मनाची झालेली केविलवाणी अवस्था लेखकाने मोजक्याच शब्दात टिपली आहे. नेमके कोणी कोणाकडे किंवा कोण जोगवा मागते आहे हा प्रश्न अधुराच राहतो आणि कथा संपते. कथेमध्ये मास्तरच्या मनाचे खेळ व्यक्त करताना रंगराव बापू पाटील 'जोगवा' कथेत लिहितात –

"कापडं काढली. गुडघाबर पाण्यात बसला. मांडयावरच्या चड्डीचं दोन फुगं झालं. सगळा बोजा आच्यात उचलतील असं वाटलं. पाठीवर ओंजळी घेतल्या. कॅस भिजवलं. खसाखसा चोळलं ह्येच्यायला। असा भांगबी पडतो यॉव रे यॉव रे । धाडकन् अंगावरच यिवून आदळली पाहीजे ..... खळाखळा चुळा भरल्या. हातपाय चोळलं। पालथं पडून पवावं वाटलं. पण माणसं काय म्हणतील? अन् जोगतीणीकडे गेल्यावर? ....... " 'जोगवा' पृष्ठ क्र. १३

किंवा हे वर्णन पहा –

“मळून ढॅन झालेली कापडं त्यानं पाण्यात बुडविली. चांगली वरखाली केली. दगडावर उभं राहून पायावर पसरुन साबण फासला. पाण्यातनं एक पांढरी धार वाहत दूर गेली. कापडात साबण मुरला. धपा–धपा आपटून दोन.तिन वेळा पाण्यातनं वर खाली केली. ती पांढरी धोट निघाली. एका मनानं ती अंगावर सुद्दा घातली ते मन जुगतीणीकडे गेलं. भारी धोतराचा काठ हातात धरुन कोल्हापूरी पायताण घालून मिशावर ताव मारीत जुगतीणीच्या घरापुडं हासत उभं ऱ्हायलं. ” ‘जोगवा’ पृष्ठ क्र. १२,१३

वरील वर्णनामधून मास्तरच्या मनातील विचार व्यक्त झालेले आहेत. कपडे धुण्यासाठी गेल्यानंतर त्यांच्या मनात वेगवेगळे विचार येतात. आणि त्याच्या मनाचे खेळ सुरु होतात. बायको काळी आहे म्हणून कोणत्यातरी जोगतीणीच्या प्रेमात हा मास्तर गुंतलेला आहे. पण ती जोगतीण मात्र याचा विचार मुळीच करत नाही असे एकतर्फी प्रेम मास्तर करतो आहे. जोगतीणीच्या प्रीतीत मास्तरचे मन गुरफटलेले आहे. त्याच्या मनाचे विश्लेषण रंगराव बापू पाटील अत्यंत सार्थपणाने रेखाटतात. नोकरी गेली तरी चालेल पण ती हवी हा विचार मास्तरच्या मनात बळावतो. तिच्या घरात जाऊन मन मोकळं करु इच्छिणारा खूप दुबळा होतो. कोरा बनून परत येतो.

या कथेच्या बाबतीत डॉ. स.ग. यादव म्हणतात –

“ मास्तरचे असे व्हायला नको होते. अस वाटत राहते. कथा संपते ती लेखकाच्या दृष्टीने. वाचकाच्या दृष्टीने नव्हे. तर ती कथा सुरु होते.” [४]

अशाप्रकारे ‘जोगवा’ कथेमधून मास्तरच्या मनाचे दर्शन घडवितात.

## क) प्रीतीचा विचार करणारे मन आठवणीत रंगलेले मन

रंगराव पाटलांच्या कथेमध्ये प्रेमाच्या आठवणीत रंगलेले मन 'सय' या कथेमधून दिसून येतो. कथेमध्ये बर्म्याच्या विहीरीवर सुली कपडे धुण्यासाठी येते व तिला सोबत म्हणून बर्म्या थांबतो त्याला तिच्याबद्दलचा मोह अनावर होतो पण लगेच त्याला पहिली आठवण येते. त्याने एकदा शाबीला तुला पोहायला शिकवतो म्हणून विहीरीत ओढलेले असते. त्यावेळी शाबीच्या भावानं दोस्त जमवून त्याला मरेपर्यंत विहीरीतून फेऱ्या मारायला लावलेल्या होत्या. त्याची आठवण त्याला होते. रंगराव बापू पाटील लिहितात –

"वाफ अंगाला झोंबत होती. केवड्याचं कणीस मक्याच्या कणसागतं भाजत होत. बुबळाला वाफ सहन होत नव्हती. डोळं विहीरीगत समडम भरत होते. चिटपाखरुही दिसत नव्हतं. आंब्याचा मोहर करपून जात होता. त्याचा सुगंध वाफात मिसळून अंगाला झोंबत होता. जरा गोड वाटत होतं. झळा अंगाला झोंबत होत्या. कडेवरच्या गाठोड्यातला निर्जिवपणा मोहरातही असल्यासारखा वाटला. काहीतरी अर्थच मृगजळासारखं."

एक छप्पर अुन्हात अुभ शांत. पुढं ऐक शुष्क पाट. हिरवळलेला दुपार. किर्र्रर्र. ती हताश." 'सय' पृष्ठ क्र. ७९

या चित्रणातूनही आपणांस उदास मनोदर्शन घडते. ते आणखी लिहितात –

"तो त्या केळकोंबाकडे डोळे लावून मोहराचा गंध नाकाला भिनतो. केवड्याच पान डोळयांत भरतं. कोसा खोंड फुसफुसतो. तो त्याचं कातडं पांघरतो त्याला शिंग फुटतात, आणि तो डिरकी टाकतो. सुली धावू लागते. छातीवर भाले घुसतात. मऊ मांसात रक्त ओघळतं. पण आग तशीच धुमसते." 'सय' पृष्ठ क्र ८०

ते पुढे लिहितात –

"नकं छप्पर उघडं हायं." त्याच निमित्त मनात घाबरतो. ससा होतो ...... ती बाईमाणूस. आपण तिथं बसावं कसं? ती वडतीया मस्त .... एकदा अद्दल न्हाय घडली? ... सोकला कोला ..... " 'सय' पृष्ठ क्र. ८१

"चिमण्याची कोटी विहीरीत लोंबकळत होती. ती टोपी घालून शिवाजी महाराज व्हावं अस त्याला वाटलं एक दोन पारवी फडफडली. " 'सय' पृष्ठ क्र. ८४

अशा वर्णनामधून रंगराव बापू पाटील हे बम्र्याच्या मनाचे दर्शन घडवतात. पहिला एकदा त्याला प्रेमाच्या बाबतीत चटका बसलेला आहे. म्हणून तो बम्र्या, समोर सुली असताना सुद्धा तिच्या बाबतीत आपली चूक होईल म्हणून सावधगीरी बाळगतो आहे. परंतु त्याचे मन मात्र आपण एकदा चूक केली होती. या विचाराने अस्वस्थ आहे. त्या प्रसंगाची सय त्याला होते आहे. बम्र्या इतका विचारात मग्न होतो की त्याला समोर विहीरीत कपडे धुण्यासाठी असलेली सुली विहीरीत बुडते तरी त्याचे लक्ष त्याकडे नसते. शेवटी शाबीचा चुलता बम्र्यावर गरजतो – "लेका तुला काढाय येत नव्हती व्हय? " या वाक्याने तो जागा होतो. लेखक लिहितात –

"आणि बम्र्या विहीरीच्या काठावर हे सगळं पाहतं, कुडकुडतं गरीबागतं उभा होता. डोकं फिरलेल्या माणसासारखा."'सय' पृष्ठ क्र. ९०

'सय' कथेमध्ये प्रेमात गुरफटलेले मन चित्रित केले आहे. पण तो प्रेमाचा अविष्कार नाही. तर त्यातून विफल प्रेमाचे दर्शन घडते आहे. पण त्या आठवणीवरती बम्र्या जगतो आहे. एकदा केलेले प्रेम त्याला जीवन जगण्यासाठी उपयोगी पडते आहे. तेच विचार मनात

घोळवतो आहे. पण त्या प्रेमापायी आपणाला शिक्षा बसली होती हे तो विसरत नाही. म्हणूनच तो पुढे तरुण सुली असताना तिचा विचार तो करत नाही. कारण त्याला प्रेमाचा चटका बसलेला आहे. अशा त्या बर्म्याचे मनोदर्शन पाटील घडवतात. तो आठवणीत इतका गुरफटतो की, समोर बुडलेली सुलीही त्याला दिसत नाही. कथेचे 'सय' शीर्षकच खूप काही सुचवून जाते. हे अधुरे प्रेम पाहून वाचकही कुठेतरी अस्वस्थ होतो. कारणं प्रामाणिक असणारा बर्म्या मात्र केवळ आठवणीवर सय काढून जीवन जगतो आहे ही खंत कथा वाचल्यानंतर वाटत राहते.

## ड) ग्रामीण युवतीचे मन

रंगराव बापू पाटील यांच्या 'कंदील' या कथेमधून ग्रामीण तरुण युवतीच्या मनाचे दर्शन घडवलेले आहे. तारुण्यात पदार्पण केलेली युवती तिच्या मनाचे कसे खेळ सुरु होतात. आणि कपडे धुण्यासाठी गेलेली कुसुम आपण हाऱ्याशी पळून जावे असा विचार करते. कारण सोनाऱ्याच्या शाबीनं असचं केलं आहे. आनंदीनेही असेच केले आहे. मग आपण केलं म्हणून काय झालं असा विचार तिच्या मनात येतो. आणि तिला वेळेचे भान राहत नाही. अंधार पडतो आणि वडील कंदील घेऊन तिला नेण्यासाठी येतात. त्यावेळी ती भानावर येते. लेखक लिहितात

"तिलाही असचं वाटतं. जावं असाच हात धरुन त्याचा त्या हाऱ्याचा. हे असलं वय कराव त्याच्या हवाली. त्याचं ते बोलणं, हसणं. रुबाबदार शरीर. सारं पसंत पडतं तिला."

"त्या सोनाऱ्याच्या शाबीनं नाही का असंच केलं? कामाला असलेल्या गड्याबरोबर नाही का गेली निघून? गावात किती बभ्रा झाला. सोनार दुकान लावून चार दिवस गुपचुप कुठतरी बसला. काही दिवसचं. पुन्हा माणसांत आला. आलाच की नाही? तसचं ........

पण अस कस शक्य आहे? ती पोरगी धाडसाची खरी आपणाला हे जमणार आहे का? साधेल? तो नाहीच म्हणला तर ...... त्यानं नकार दिला तर? ........ " 'कंदील' पृष्ठ क्र. १५०

"या आनंदीसारखे नाही झाले म्हणजे मिळवले. ऐनवेळी तो गेला की सोडून तिला. ती बसली कोकलतं. डोकंच फिरलं तिचं. तो गेला का हातोहात फसवून काय करील? मग कुठ कण्हेरीच्या मुळया खाऊन चालतयं? विहीरीकडं जाऊन चालतयं? कोण खाऊन दिल बाई मुळ्या? तू जगायला आली होतीस ना? जगून काय शिकलीस? हेच का? " 'कंदील' पृष्ठ क्र. १५१

वरील चित्रणामधून कुसुमच्या मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. सुरवातीला तिला वाटते. दुसऱ्या मैत्रिणीने केले तसे आपणही करावे. परंतु तिचे दुसरे मन तिला म्हणते आनंदीला ऐनवेळेला सोडून दिले आहे. तसे आपल्या बाबतीत घडेल याची तिला भिती वाटते. आणि नंतर आत्महत्या करण्यापलिकडे कोणताच पर्याय समोर असणार नाही.

ग्रामीण स्त्री असल्यामुळे आपल्या मर्यादा ती ओलांडत नाही तसे नसते तर प्रत्यक्षात ती हाऱ्याबरोबर पळून गेली असती परंतु तसे घडत नाही. तर केवळ तिच्या मनाचे खेळ कथेतून व्यक्त होतात. आणि कंदीलाच्या प्रकाशाबरोबरच हे खेळ संपतात. आतापर्यंत अंधारात विचार करत बसलेली कुसुम भानावर येते आणि आबाबरोबर घरी चालत येते. आबाला यातलं एक अक्षरही ती बोलत नाही. इथे ही ती मर्यादा पाळते आहे. अशा प्रकारचे ग्रामीण स्त्रीचं मर्यादित वावरणारं मन आपल्या नजरेत भरते. लेखक वर्णन करतो –

"तिच्या पायांना कसं मोकळं मोकळं वाटतं पायातून साखळया काढून ठेवल्यागतं सारी चित्र दुर जातात." 'कंदील' पृष्ठ क्र. १५२

कपडे धुताना एकटीनेच विचार केल्यामुळे नंतर आबा आल्यावर तो विचार बंद होतो आणि तोच विचार तिथेच थांबतो. पण आपण एकटीनं विचार केल्यामुळे आता तिला मोकळे मोकळे वाटते. कारण एकटी असल्यामुळे हवा तसा ती विचार करु शकलेली असते. असे लेखक म्हणतात. अशाप्रकारे ग्रामीण व नुकतीच तारुण्यात पदार्पण केलेली युवती तिच्या मनाचे दर्शन व विविध खेळ 'कंदील' या कथेत पाटील घडवितात.

वरील चार प्रकारच्या मनोविश्लेषणा व्यतिरिक्त आणखी अनेक कथामधून मनोविश्लेष्ण येताना दिसते. 'कळस' या कथेमध्ये ते चांदणीच्या मनाचे दर्शन घडवितात. तिला मारण्याचा विचार सासू आणि दीर करत असतात. त्यावेळी तिच्या मनातील विचार व्यक्त करताना रंगराव बापू पाटील म्हणतात –

"कापायच्या आदी दोन दिवस बोकडाला पाणी जात नाही. मुलाणी पाण्यात दिसतो तशी तिला दोन दिवस भाकरीच ग्वाड लागत नव्हती. आई बाची आठवण येत होती. येवून नुसतं नदरं पडून जावा म्हणून सांगावा द्यावा वाटत होता. पण कोण देणारं सांगावा? दीराला आणि थिरडीला जरादिकुल हिकड तिकडं झाल्यालं खपत न्हाय. दोन दिवस झालं घरात काय तरी सारखी कुजबुज चाललेली होती. उगच वाटायचं मारुन बिरुन टाकतेती काय कुणास दिक्कल. पण तसं कसं करतेली? माणूस हाय मी. बकरं कोकरं थोडचं हाय! मनात इल तवां कापायला." 'कळस' पृष्ठ क्र. ३३,३४

अशा रितीने चांदणीच्या मनाचे दर्शन पाटील घडवितात.

'ल्हावर' या कथेमध्ये तोंडाला चव नाही म्हणून आबा हा तानाजीला ल्हावर मारुन आणायला सांगतात. पण तो तानाजी ती मारलेली ल्हावर शानीला देतो आणि रिकामा घरी परततो. त्यावेळी हाताला रक्त लागलेलं पाहून आबा विचारतात हाताला कापलं काय? यावर पटकनं तानाजी म्हणतो ल्हावराचं रक्त आहे यावर आबा म्हणतो "मग कुठाय?" त्यावेळी तानाजी खोट सांगतो."वैरण काढताना बांधावर झाकून ठेवलं आणि केसकरांच्या कुत्र्यानं नेलं" 'ल्हावर' पृष्ठ क्र. ७७

नंतर घरी जाताना आपण वडीलांशी खोटे बोललो याचे तानाजीला वाईट वाटते. केसकरांच्या कुत्र्यानं ल्हावर नेली असे तो खोटेच सांगतो. त्यामुळे त्याला अपराध्यासारखे वाटते.

रंगराव बापू लिहितात –

"दोघं छप्पराबाहेर आले. अंधारात आल्यावर तान्याला बरं वाटलं असंच अंधारात तोंड लपवून चालावं असं वाटू लागलं ..... अपराध्यासारख ........ " 'ल्हावर' पृष्ठ क्र. ७७

म्हणजेच अंधारात आपण तोंड लपवले असे त्याला वाटले आणि त्याला बरं वाटलं. त्याच्या मनात जो अपराधीपणाची भावना निर्माण होते. ती पाटलांनी सार्थपणे टिपलेली आहे.

तर 'परपंच्या' कथेमधून मनोविश्लेषण व्यक्त झालेले आहे ते पुढीलप्रमाणे – खुप दिवसांनी घरी मटन आणल्यामुळे आबाला पुर्वीची आठवण येते. एकदा बायको मटन आणायला सांगते त्यावेळी तो तिला मारतो ती आठवण आज मुलाने मटन आणलेले पाहून आबाला होते आणि तो अस्वस्थ होतो.

'सरशी' कथेमधूनही मनाचे दर्शन घडते विशेषत: आपली मुलगी सासरी सुखात आहे किंवा नाही असे आबाला वाटत असते आणि दत्तु आबा लेकीकडे जातो. तर त्याला लक्षात येते खरोखरीच आपली मुलगी सुखात नाही. तर आपल्या जावयाने सरशी नावाची बाई ठेवली आहे. यावेळी तो घरी आल्यानंतर विचाराच्या तंद्रीतच असतो. रंगराव पाटील लिहितात –

"मग मायलेकीची जोडी अंथरुणावर कलंडली. आबासारखा तळमळत होता. या कुशीवरुन त्या कुशीवर होत होता. झोप येत नव्हती. डोळ भरुन येत होतं येताना वाळव्याच्या नदीवर पाणवठ्यावर ऐंकलेल दोन बायकांच बोलणं त्याला ऐकु येत होत." 'सरशी' पृष्ठ क्र. १६६,१६७

वरील चित्रणामधून आबा मुलीच्या विचाराने अस्वस्थ होतो आहे आणि बायकांचे ऐकलेले बोलणे आठवून तो अस्वस्थ होतो आहे आणि नकळत आबाच्या डोळ्यामधून पाणी येते. अशाप्रकारे दत्तूआबांच्या मनाचे दर्शन पाटील घडवितात.

'राखणवाली' कथेत दुसऱ्यावर जडलेल्या मनाचे दर्शन पाटील करतात. सगुणा नावाची स्त्री जी शेतात राखण करत असते ती खूप दिवसांनी मळ्यात गेलेल्या लेखकाला सांगते

"मी तायाची हाय ..... तेचा जीव हाय माझ्यावर. मी पाट लावणार हाय .... तेच्याबरं" ......

आणि आम्ही उठलो. मी पुढं चालू लागलो. पारवा आणि व्हला हातात घेऊन ती माझ्या पाठोपाठ चालू लागली, पुढं म्हणाली, "तुमच्या नादानं हेबी फिस्कटायं नकं ...... रागावू नका। " 'राखणवाली' पृष्ठ क्र. १७७

कथेतील नायक राखणवालीशी सलगी करण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळी ती सांगून टाकते मी तायाप्पाची आहे. मी जर तुमच्या नादी लागले तर हेही फिस्कटून जाईल. म्हणून ती सर्व सांगून टाकते. यावरुन तायाप्पावरची तिची प्रीती व्यक्त झालेली आहे. इथे तिच्या मनाचे दर्शनही पाटील घडवतात.

'सोबत' कथेमध्ये भेटीसाठी आतुर झालेल्या मनाचे दर्शन होते. 'मत्तीर' कथेमध्ये एका गारुड्याला एक ओली बाळंतीण भूलून घरातून निघून जाते. हे वर्णन करताना 'मत्तीर' कथेत पाटील लिहितात –

"तिनं पायात चेपल्या घातल्या, आणि समोर आली. गारुडयाची आणि तिची नजरानजर झाली. धामणीच्या नजरेनं जनावर घायाळं व्हावं तशी ती घायाळ झाली. मन चरकलं आणि त्याच क्षणी तिच्या डोळयातून भन्न S S S करुन काहीतरी उडालं – म्हवाच्या माशागत आणि तिला वाडा फिरतोय असं वाटू लागलं, गारुडी पण फिरु लागला." 'मत्तीर' पृष्ठ क्र. ९४

वरील वर्णनामधून असे दिसते पुंगीच्या आवाजाने बायना घरातून निघून जाते. तिच्या मनाची अवस्था अस्वस्थ होते. ती घायाळ होते आणि सर्व वाडा फिरतोय असे तिला वाटू लागले ही जादू गारुड्याच्या पुंगीची व त्याच्या नजरेची असल्याचे दिसते.

मनोविश्लेषणात्मक कथांच विचार केल्यानंतर आपणास असे दिसते की, कधी हे मन प्रीतीत गुरफटलेले आहे, तर कधी आठवणींनी व्याकुळ झालेले आहे. तर कधी वात्सल्याच्या पातळीवर व्यक्त झालेले आहे. तारुण्याच्या पातळीवर धुंदीत विचार करते आहे. अपराधीपणाची जाणीव होणारे मन आहे. कधी ते गारुड्याच्या पुंगीच्या तालावर ते धावते आहे. प्रत्येक कथेमधले मनोविश्लेषण वेगळे आहे. प्रत्येक व्यक्तींचे प्रश्न वेगळे आहेत. त्यातून ते ते मन साकार झालेले आहे. आणि वाचकांच्या मनाची पकड त्याने घेतलेली आहे. रंगराव बापू पाटील हे व्यक्तिमनातील भावतरंग टिपतात. हे सांगताना डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात –

"रंगराव बापू पाटील यांच्या कथेत सामान्यत: छोट्यामोठ्या घटना चित्रित केलेल्या असतात. परतु या घडणाऱ्या निर्माण होणाऱ्या घटनामुळे कथेतील व्यक्तिरेखांच्या मनात जे भावतरंग उमटतात किंवा ताण निर्माण होतात त्यांचे प्रभावी दर्शन घडते." ५

## ३. विषयांची विविधता

'ल्हावर' कथासंग्रहामधून रंगराव बापू पाटील यांनी विविध विषय हाताळलेले आहेत. त्यामध्ये शेती, प्रेम, संमोहन, कुटुंब इ. विषयावरही कथा निर्मिती केली आहे. त्यांनी 'ल्हावर' कथासंग्रहामधून जे विविध विषय हाताळलेले आहेत त्याचा विचार आपणांस खालीलप्रमाणे करता येईल.

### १) प्रेमविषयक कथा

रंगराव पाटील यांनी 'जोगवा', 'सय', 'कंदील', 'राखणवाली', 'ल्हावर' इ. प्रेमकथा लिहिलेल्या आहेत. त्यांच्या कथेमधील प्रेमाचे चित्रण हे विरही प्रेमाचे चित्रण आहे. प्रेम सफलतेचे चित्रण नसून प्रेम विफलतेचे चित्रण आहे. त्यांच्या प्रेमकथेत स्वत:ची बायको काळी आहे म्हणून भिक्षा मागायला आलेल्या जोगतीणीच्या प्रेमात पडणारा मास्तर चित्रित होतो. शानीने आपणांस तिचे म्हणावे म्हणून तिला ल्हावर देणारा तानाजी, त्याच्या प्रेमाचे दर्शन 'ल्हावर' कथेमधून घडते. तारुण्याच्या उंबरठयावर असणारी कुसुम वेगळयाच पातळीवर हाऱ्याबरोबर पळून जाण्याचा विचार करते आहे. 'राखणवाली' कथमध्ये तायाप्पाचा विचार करणारी आणि त्याच्या बरोबर पाट लावणारी सगुणा हिच्या प्रेमाचे दर्शन घडते. म्हणजेच या कथा वेगवेगळया पातळीवर व्यक्त झालेल्या आहेत. प्रेमविषयक वेगवेगळे अविष्कार या कथामधून प्रेम साफल्य मात्र आपणास कुठेच दिसत नाही तर विफलतेचे दर्शन सर्व प्रेमकथामधून होते, अशा वेगवेगळया विषयावरती पाटलांनी प्रेमकथा लिहिल्या आहेत.

### २) व्यक्तिवैशिष्ट्यांनी नटलेल्या कथा

रंगराव बापू पाटील यांच्या कथा व्यक्तिवैशिष्टयांनी नटलेल्या आहेत. त्यांच्या अनेक कथामधली पात्रे ही मनाची पकड घेताना आणि मनात राहून जातात. त्यांच्या 'गब्रु' कथेमधील 'हांबऱ्या' हा विशेषत: लक्षात राहतो. सुडाने पेटलेला हांबऱ्या सासऱ्याला मारण्याचा

विचार करतो. स्वत:ची बायको काळी आहे म्हणून भिक्षा मागायला आलेल्या जोगतीणीचा विचार 'जोगवा' कथेमधील मास्तर करतो. शेताची राखण करता करता तायाप्पावर प्रेम करणारी सगुणा आहे. स्वत:च्याच भाव विश्वामध्ये रंगणारी आणि प्रीतीशी नाते जोडणारी कुसुम येते. 'दिंडी' कथेमध्ये बायको गेल्यामुळे वेडा झालेला सोनाप्पा आणि आई गेलेली आहे म्हणून आईच्या प्रेमाने वेडा झालेला पक्या हा आपल्या नजरेत भरतो. 'ल्हावर' कथेमधला तानाजी हा आपल्या मनामध्ये घर करतो.

रंगराव बापू पाटील यांच्या 'ल्हावर' कथासंग्रहामध्ये मास्तर, जोगतीण, शेतावर काम करणाऱ्या व्यक्ति, धुणे–धुणेसाठी जाणाऱ्या स्त्रिया, कष्टकरी वर्ग, सासर सोडून माहेरी राहिलेली स्त्री, कुटुंबवत्सल असलेली माणसे, स्वत:च्याच विचारात गुरफटलेली मनं, वडीलांची मनं अशा कितीतरी व्यक्ति वैशिष्ट्यांनी या कथा नटलेल्या आहेत.

## ३) भाऊबंदकी व कौटुबिंक संघर्ष कथा

रंगराव बापू पाटील यांच्या 'ल्हावर' या कथासंग्रहामध्ये भाऊबंदकी विषयीचे वाद असणाऱ्या कथा आलेल्या आहेत. त्यामध्ये विशेषत: 'मळा' नावाची कथा पाहण्यासारखी आहे. या कथेमध्ये भगवानचा धाकटा भाऊ त्याला त्रास देत असतो. छप्परावर दगड मारत असतो. शेवटी भगवान हा आपला मळा विकण्याचे ठरवितो आणि तिथून बाहेर निघून जाण्याचा विचार करतो. एक भाऊ दुसऱ्या भावाला त्रास देतो आहे असा भाऊबंदकीचा संघर्ष 'मळा' कथेमध्ये व्यक्त झालेला आहे.

कौटुबिंक संघर्षामध्ये 'सरशी' कथेचा उल्लेख करता येईल. या कथेमध्ये दत्तुआबा आणि त्याचा जावई या दोघामधला संघर्ष व्यक्त झालेला आहे. जयसिंग नावाचा दत्तुआबाचा जावई याने सरशी नावाची बाई ठेवलेली असते आणि त्यामुळे दत्तुआबाची मुलगी शिर्मा ही सुखी नसते. हे आबाला समजते त्यावेळी आबा खूपच अस्वस्थ होतो. त्याच्या डोक्यात सारखे मुलीविषयीच विचार असतात. आणि त्याला सारखे शिर्मा घरातून निघून आलेली आहे असे भास होत असतात आणि यातूनच कथेमध्ये संघर्ष निर्माण होतो.

तसेच 'गब्रू' कथेमध्ये हांबऱ्या हा दारु पितो आहे म्हणून त्याचा सासरा त्याला मारतो. परंतु सासऱ्याने आपणास मारले म्हणून हांबऱ्याचा स्वाभिमान जागृत होतो. तो सासऱ्याचा सूड घेण्याच्या विचाराने पेटून उठतो. आणि सासऱ्याचा खून करायला तयार होतो. इथे कथेमधील संघर्षाने कळस गाठलेला आहे. हे कथा वाचल्यानंतर आपल्या लक्षात येते. तो कुऱ्हाडीला धार लावून सासऱ्याला मारण्यासाठी घरातून निघून जातो. परंतु सासरा पंढरपूरला गेलाय म्हणून तो सासऱ्याच्या दावणीचं वासरु मारुन परत येतो. असा संघर्ष व्यक्त होतो.

तर 'जोगवा' कथेमध्ये आपल्या आईवडिलांनी आपल्या गळ्यात काळी बायको बांधली आहे असे मास्तरला वाटते. आणि यातूनच तो जोगतीणीकडे वळतो आणि तिच्या प्रेमात पडतो. आणि तिला भेटण्यासाठी तो तिच्या घरी जातो. त्यावेळी ती याला सांगते मी उद्या गिरीलालबरोबर आळत्याला जाणार आहे. हे ऐकुन निराश मनाने मास्तर घरी परततो. लेखक लिहितात.

"हा बाहेर पडलं. ती चौकटीत उभी. गर्कन वळून मागं पाहावं वाटलं पण धोतराचा काठ हातात धरुन हा चालू लागला. आता चालण्यात दम नव्हता, पायताण कुर्र कुर्र वाजत नव्हतं. सगळं बुद्रुक टेक अंधारानं गरगटलं होतं. वर चांदण्या फुलल्यावत्या. त्या खदाखदा हसत होत्या." 'जोगवा' पृष्ठ क्र. १८

म्हणजेच निराश मनाने तो घराकडे परतत असताना आकाशातील चांदण्या आपणास हासत आहेत असे त्याला वाटते. आणि त्याला अधिकच लाजल्यासारखे होते. त्याच्या पायात दम नव्हता. असे आपणास दिसते.

वरीलप्रकारे 'ल्हावर' कथासंग्रहामधून भाऊबंदकी व कौटुबिंक संघर्ष आलेला आहे.

## ४) संमोहन विषयक कथा

'ल्हावर' कथासंग्रहामध्ये संमोहित करणाऱ्या कथेमध्ये 'मत्तीर' ही कथा आलेली आहे. या कथेमध्ये आऊची सून बायना ही गारुडयाच्या पुंगीच्या नादाने घरातून निघून जाते. आपल्या मुलाचाही ती विचार करत नाही. ती ओली बाळंतीण असल्यामुळे घरातून निघून जाते. गारुड्याच्या जादूला ती मोहित होते पाटील म्हणतात –

"तिनं पायात चेपल्या घातल्या, आणि समोर आली. गारुड्याची आणि तिची नजरानजर झाली. धामणीच्या नजरेनं जनावर घायाळ व्हावं तशी ती घायाळ झाली. मन चरकलं आणि त्याच क्षणी तिच्या डोक्यातून भन्न S S S करुन काहीतरी उडालं म्हवाच्या माशागत आणि तिला वाडा फिरतोय असं वाटू लागलं. गारुडी पण फिरु लागला. काळं आंगराक, काळी टोपी .... . बुटी ...... पुंगी .... सगळंच फिरु लागलं. चाळ वाजू लागलं. झोळीजवळचं हाडकाचं भेंडोळ पाहून ती पाक गळून गेली." 'मत्तीर' पृष्ठ क्र. ९४

वरील वर्णनात संमोहित ती कशी झाली हे पाटलांनी सांगितलेले आहे. केवळ गारुड्याच्या पुंगीच्या आवाजाने ती मोहित होते आहे आणि स्वत:चे भान तिला राहत नाही. अशी ही संमोहित करणारी कथा आहे.

## ५) कुटुंबकथा

'ल्हावर' कथासंग्रहामध्ये काही कुटुंब कथा आलेल्या आहेत. त्यामध्ये 'परपंच्या', 'सरशी', 'देऊळ' या कथांचा समावेश करता येईल. 'परपंच्या' कथेमध्ये खूप दिवसांनी घरात मटन आणण्यासाठी आबाची बायको सांगते त्यावेळी तो तिला खूप मार देतो. ही आठवण नंतर आबाला आपल्या मुलाने, जयसिंगने मटन आणल्यानंतर होते आणि त्यावेळी म्हंटलेले वाक्यही त्याला आठवते– "हाच का परपंच्या करायचीस? " अशी ही कुटुंबविषयक कथा आहे.

'सरशी' कथेमधूनही कौटुंबिक जीवन चित्रित झाले आहे. त्यामध्ये दत्तुआबा आणि त्याचा जावई याचे चित्रण झाले आहे. यामध्ये आपली मुलगी शिर्मा सुखी नाही हे आबाला समजल्यानंतर आबा अस्वस्थ होतो आहे. अशी ही कुटुंबवत्सल कथा आहे.

जीभेला बाभळी आली आहे म्हणून तानाजीला म्हातारा आबा ल्हावर मारुन आणण्यासाठी सांगतो व तानाजी ल्हावर मारतो पण शानीला देतो आणि रिकामा घरी परततो, अपराधी ठरतो. मनातूनच आपली चूक त्याला कळते. तरी हाताला लागलेले रक्त पाहून आबा विचारतात हाताला काय झाले? त्यावर तानाजी खरं सांगतो ल्हावराचं रक्त लागलयं. त्यावर आशेने आबा विचारतात– ल्हावर कुठाय? त्यावर तो खोट बोलतो नी म्हणतो "बांधावर ठेवल्यानंतर कुत्र्यानं नेलं." आबाला वाटते तानाजीच्या हाताला खुरपे लागले की काय?

इथे आबाची आपल्या मुलाविषयीची माया व्यक्त होते म्हणून ही कथा कुटुंबकथा ठरते.

'दिंडी' कथेमधूनही आईच्या प्रेमाला आतूर झालेला पक्या चित्रित होतो. तसेच बायको गेली म्हणून वेडा झालेला सोनाप्पा ही व्यक्त होतो. याशिवाय 'मत्तीर', 'देऊळ', 'सोबत', 'कंदील' इ. कथामधूनही कौटुंबिक जीवन व्यक्त झालेले आहे.

## ६) निसर्गवर्णनपर कथा

रंगराव बापू पाटील यांच्या 'ल्हावर' या कथासंग्रहामध्ये 'राखण' ही निसर्ग विषयक कथा आलेली आहे. या कथेमध्ये राखण करण्यासाठी निवास असतो. कथेमध्ये शेतीची वर्णने आलेली आहेत. पाटील 'राखण' कथेमध्ये लिहितात–

"हेदांतर जाम भट्टी बसलीवती. पेरल्यापस्न हायब्रिड झेपा खात फार फार तरारलं. काळाढू हायब्रिड वाऱ्यावर झोकं खाताना बघून निवासाचं हुर्द भरुन याचं. त्या रानात कोळपण भांगलण करुन रान पाक चक केलं होतं. रोज सांजला बांधाला बिंडा आणाय गेल्यावर त्यांच्याकडं डोळं भरुन बघायचा. सांजचं पिवळं ऊन पोपटी पीकावर पडलेलं बघून निवास मनी हारकायचा. बाभळावरलं रेघ त्या नव्या मळ्यात झेपावत. त्या किलब्रीलाटानं मळा गर्जुन जायचा. आणि निवास त्या मळ्यातली आपली एकुलती एक पट्टी बघून हारखून टम व्हायचा." 'राखण' पृष्ठ क्र. १११–११२

इथे निवासच्या शेतातील हायब्रिडचे वर्णन पाटील करतात आणि यावर्षी चांगले पीक आले म्हणून निवास मनातून खूप आनंदलेला असतो. हे चित्रित करतात. हे वाचत असताना हायब्रिडचे रान नजरेसमोर उभे राहते. आणि हेच वैशिष्टे पाटलांच्या निसर्गविषयक कथेचे असल्याचे आपणास दिसते.

## ७) भूतकथा

रंगराव बापू पाटील हे 'मळणी' कथेमधून भूताचे विश्व प्रकट करतात. या कथेमध्ये महादू सदलग्याचा भाचा रात्री मळणीसाठी निघाला तेव्हा, त्याला जोडवे पडलेली स्त्री भेटते. तो तिला मदत करतो. रानात गेल्यावर उशीर का झाला असे विचारल्यानंतर तो सर्व हकीकत सांगतो. मी डवंग्याच्या बायजीला जोडवे शोधण्यासाठी मदत केली. त्यावेळी सर्वांना धक्का बसतो. कारण ती बायजी मेलेली असते. त्यामुळे सर्वांना वाटते ती भूत होऊन आली

असेल. हे ऐकून संभाला ताप भरतो. सकाळी त्याला देवऋषीकडे नेले जाते. त्यावेळी रात्रीचीच बाई, सकाळी संभा जात असताना दाखवतो. तेव्हा असे लक्षात येते की, ही बाई म्हणजे बायजीची बहिण असते. लग्न झाल्यापासून ती बायजीसारखीच दिसत असते. भूत दिसलं म्हणून संभा मात्र खूपच घाबरलेला असतो. अशी ही भूतकथा पाटील रंगवतात. भूताच्या बाबतीत प्रत्येकजण कसा बोलतो हे पाहण्यासारखे आहे. पाटील लिहितात –

"गतकाळीच्या, भूत हाय म्हटल्यावर बोलायचं नाहीस त्येच्याबरं ...... थेट पळत याचस त्वा! भुताला पाहिली ओ देऊ नये. झाडं घेऊन जातं."

"मला काय माईत तिचं काय झालयं ते ह्या दोन वर्षात हिकडं आलुया का मी?"

आणि सदलग्याला सर्व अंगातून वार गेल्यासारखं वाटू लागलं. भाच्याला भूत दिसलं म्हणून तो रंजीस झाला.

संभाला सुद्धा थंड वाजून आली. तेवढयात कुणीतरी विचारलं,

"पावलं बघितलीस काय तिची? उपराटी हुती काय? " 'मळणी' पृष्ठ क्र. १२८–१२९

वरील वर्णनामधून भूता विषयीच्या समजूती व्यक्त होतात. भूताला ओ देऊ नये. भूत म्हटल्यावर त्याचे पाय उलटे असतात. तसेच इकडे दोन वर्षात संभा आला नसल्यामुळे त्याला बायजी मेलेली माहित नसते. त्यामुळे त्याला तिची बहिण तिच्यासारखीच वाटते. आणि आपण खरोखरच भूत बघितलं म्हणून संभाला खूप ताप येतो. सर्व वर्णनामधून पाटील भूताचे विश्व चित्रित करतात.

## ८) अंधश्रद्धेवर आधारित कथा

'ल्हावर' कथासंग्रहामध्ये अंधश्रद्धेवर आधारित 'बरकत' ही कथा आलेली आहे. कथेमध्ये हरिबा उसाणे आणि मुलाण्या हा बेलदाराच्या गाढवाला औषध चारतात. कोकणी वैद्याने त्यांना सांगितलेले असते. तो झाडपाला गाढवाला घातल्यावर गाढवाच्या लिदीत सोने सापडते. परंतु ते असे करतात आणि त्यांची चोरी उघडकीस येते. बेलदाराला मुलाण्या सापडतो. आणि शिक्षा म्हणून दोनशे रुपये देण्याचे ठरवितात. बेलदार दोनशे रुपये घेतो. आणि त्याचे गाढवही तेवढ्यात जिवंत होते परंतु हे माहित होण्याअगोदर बेलदार गाढवाला बाजारात नेण्याचे ठरवितो. अशी ही विनोदी पण अंधश्रद्धेला जवळ जाणारी कथा आहे. शेवटी उसाणे व मुलाणे यांना आपली चूक कळते आणि सर्वांत आपला बोलबाला होईल म्हणून ते दोनशे रुपये देण्याचे कबूल करतात. कथेमधून पैशाला हपापलेल्या व्यक्तीचे दर्शन घडते आहे.

## ९) प्राणी जीवनाचे चित्रण करणारी कथा

यामध्ये 'पाणेव' ही कथा समाविष्ट होते. कथेमध्ये किसामावशीची म्हैस धार देत नसते. त्यासाठी विविध प्रयत्न चाललेले असतात. त्यावेळी किसामावशी म्हणते – म्हैस गवळ्याची हाक ऐकल्यावर धार देईल. त्यावेळी तिचा नवरा गवळी बनतो आणि म्हणतो –

"धार काढा धार ! धार काढा धार ! "

किटली खडबडली. अंगणात आला. पुन्हा जोत्यावर जाऊन उभा राहिला. हाक दिली,

"धार काढा धार, धार काढा धार ........ " 'पाणेव' पृष्ठ क्र. ४५

तरीही किसामावशीची म्हैस पाणवत पाही अशी ही प्राणी जीवनावर आधारित कथा आहे.

डॉ. वासुदेव मुलाटे या कथेच्या संदर्भात म्हणतात –

"कथेतील वातावरण भिन्न असले तरी पाटलांची 'पाणेव' ही कथा वाचत असताना शंकर पाटलांच्या 'वेणा', 'वळीव' या सारख्या कथांची आठवण येते. मात्र ग्रामीण जीवनात शेतीला पुरक असा जो दुधाचा धंदा आहे या धंद्यातील दर्शन घडते. त्यांच्या इतर चांगल्या कथामध्ये 'पाणेव' ही कथा श्रेष्ठ आहे. असे म्हणण्यास काहीच हरकत नाही." ६

याशिवाय 'बरकत' या कथेमध्ये गाढव या प्राण्याचे चित्रण आलेले आहे.

## १०) मदतीची भावना व्यक्त करणारी कथा

यामध्ये 'सोबत' या कथेचा समावेश करता येईल. या कथेमध्ये शेळक्याची मुलगी आपल्या चुलत्याला आणि चुलतीला भेटण्यासाठी येते. पण तिला गावापर्यंत सोबत म्हणून रहिमान येतो. कारण तिला येण्यासाठी उशीर झालेला असतो. पण रस्त्यातून येताना तो तिला तुझ्या चुलत्याने तुझ्या आईला आणि वडिलांना मारले आहे असे सांगतो. आणि आता तूही सावध रहा असेही म्हणतो कारण तुझ्या मुलाला वाटणी मिळेल म्हणून त्यालाही काहीतरी करतील. हे सांगताना पाटील म्हणतात—

"जा आता ..... गाव जवळ आलंय ..... तुझ्या पोराला वाटणी मिळलं म्हणून कायतरी करतेली, म्हणून हे तुला सगळं सांगितलं जा ..... " 'सोबत' पृष्ठ क्र. १८२

अशी ही कथा आहे. 'देऊळ' कथेमध्ये वच्चीला सोबत म्हणून पोरगं जाते पण वेगळाच प्रकार घडतो.

सारांशरुपाने आपणास असे दिसते की पाटलांच्या 'ल्हावर' कथासंग्रहामध्ये वरील वेगवेगळे विषय असलेल्या कथा आहेत. कधी त्यामध्ये प्रेमाचा अविष्कार आहे तर कधी कौटुबिंक प्रश्न आहेत. कधी प्राणीजीवनावर आधारित भावविश्व साकार झालेले आहे. काही कथामधून निसर्ग वर्णन येते. अशा विविध विषयांनी या कथा नटलेल्या आहेत. असे दिसते.

## ४) स्वभावरेखाटन

रंगराव बापू पाटील यांनी त्यांच्या 'ल्हावर' या कथासंग्रहामध्ये वेगवेगळया व्यक्तिरेखा चितारलेल्या आहेत. त्यांनी ग्रामीण जीवनातील वेगवेगळया स्थरातील व्यक्तिरेखा रेखाटलेल्या आहेत. त्यामध्ये स्वत:च्या काळया बायकोचा विचार सोडून दारावर भिक्षा मागण्यासाठी आलेल्या जोगतीणीचा विचार करणारा मास्तर आहे. सासऱ्याचा सूड घेणारा गब्रु आहे. शेतमळ्यात राबणारी किसामावशी व अनेक स्त्रीया आहेत. सवती मत्सर आहे. नांदण सोडून माहेरी आलेली स्त्री आहे. घाटावर, ओढावर धुणे धुणाऱ्या स्त्रीया आहेत. मराठा, न्हावी, लव्हार, महार अशा जातीजमातीच्या व्यक्ति आहेत. शेतात कष्ट करणारी माणसे आहेत. या ग्रामीण परिसरामध्ये सुशिक्षीत आणि अशिक्षीत अशा दोन्हीही व्यक्तिरेखा आहेत. अशा वेगवेगळया व्यक्तिंच्या चितरकथांनी तसेच प्रीतीत गुरफटलेल्या मनांनी शेताची राखण करणाऱ्या व्यक्तींनी, दुसऱ्याला मोहित करणारा गारुडी, दुसऱ्याचा संसार उद्‌वस्थ करणारी सरशी, आठवणीत रमणारा बर्म्या अशा विविध व्यक्तींनी रंगराव बापू पाटील यांची कथा त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यासह गजबजलेली आहे.

रंगराव बापू पाटीलांच्या स्वभाव रेखाटणाच्या बाबतीत डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात –

"रंगराव बापू पाटील यांच्या कथेतून विविध वृत्तीची, स्वभावातील माणसे भेटतात. माणसांचे भावविश्व साकार करताना ते त्यांच्या स्वभावातील बारकावे व मनाचे आंदोलनेही तपशिलतेने टिपतात. ती टिपताना मानवी मनाच्या विविध पैलूंचे दर्शन वाचकाला घडते हे जरी खरे असले तरी त्यांच्या ग्रामीण कथेचा विचार करु जाता कृषी जीवनातील समस्यांनी व्यथित झालेल्या मनाचे चित्रण त्यांच्या कथेत येत नाही." ७

स्वभाव वैशिष्टयानुसार त्यांच्या पात्राचा परिचय पुढीलप्रमाणे

## १) प्रीती विश्वात रमणारी पात्रे

रंगराव बापू पाटील यांच्या 'ल्हावर' या कथासंग्रहामधून अनेक कथामधून प्रीतीचे विश्व साकार झालेले आहे. त्या विश्वात कधी प्रेम साफल्याचे दर्शन आहे तर कधी प्रेम विफलतेचे दर्शन घडते. प्रेमाच्या विश्वात रमलेल्या व्यक्तिमधील काही ठळक व्यक्ति खालीलप्रमाणे

### १) मास्तर

आपली बायको काळी आहे म्हणून मास्तर हा कलाबाई नावाच्या गोऱ्या असलेल्या हिरवे लुगडे नेसणाऱ्या जोगतीणीच्या प्रेमात पडतो आणि तिला भेटण्यासाठी आतुर होतो. धोंड्या न्हाव्याकडून तिचा पत्ता काढतो. त्याच्याकडून दाढी करुन घेतो. ओढ्यावर कपडे पांढरी स्वच्छ धुवून घेतो व तो तिला भेटण्यासाठी जातो. अर्थात प्रेमाचा जोगवा मागण्यासाठी. तेथे गेल्यानंतर जोगतीण त्यांच्याशी बोलते, परंतु आळत्याच्या यात्रेला जाणार आहे असे ती सांगते. त्याचबरोबर माझ्यासोबत माझा गिरीलाल आहे असे सांगायला ती विसरत नाही. तिथून परत फिरताना चांदण्या आपणास हसत आहेत असे मास्तरला वाटते. तसेच आपली बायकोही त्यात सामील झाली आहे असेही वाटते. प्रत्यक्षात मात्र काहीच घडत नाही. एकतर्फी प्रेम करणारा हा मास्तर आहे. तो वाचकाच्या लक्षात राहतो. प्रेमात गुंतलेले मास्तरचे मन मात्र एकतर्फी प्रेमाचा विचार करते आहे. कपडे धुता–धुता त्याला आगंदीचीही  आठवण त्याला झाली होती. एके काळी ती मास्तरच्या विहीरीवर मोट चालू झाल्यावर पाणी नेण्यासाठी आणि पिकलेली हुंबर खाण्यासाठी येत हुती. असा हा मास्तर पाटलांनी 'जोगवा' या कथेत टिपलेला आहे. त्याच्या स्र्व स्वभाव वैशिष्टयासह तो व्यक्त झालेला आहे.

२) **बर्म्या**

हा 'सय' कथेमधून चित्रित झालेला आहे. बर्म्या हा सुलीला सोबत म्हणून विहीरीवर थांबतो आणि पहिली आठवण त्याला होते. एकदा शाबीला त्याने पोहायला शिकवितो म्हणून विहीरीत ओढलेले असते त्यावेळी तिच्या भावाने त्याला बुडेपर्यंत विहीरीतून फेऱ्या मारायला लावलेल्या असतात. असा हा बर्म्या प्रेमाच्या आठवणीत इतका गुंततो की त्याला समोरची सुली पाण्यात बुडाल्याचे भान राहत नाही. त्याचे मनोदर्शन घडवताना रंगराव बापू पाटील म्हणतात –

"खाली या." तिचं धाडस

"नकं, छप्पर उघडं हायं " त्याच निमित्त मनात घाबरतो ससा होतो ...... ती बाईमाणूस आपण तिथं बसावं कस? वडतीया मस्त ..... एकदा अद्दल न्हाय घडली? ..... सोकला कोला. " 'सय' पृष्ठ क्र. ८१

या वर्णनामधून बर्म्याच्या मनाचे दर्शन आपणास होते. एकदा याचपाशी आपणास विहीरीतून फेऱ्या मारायला लागल्या होत्या. म्हणून तो सुली बोलवत असताना जात नाही. लेखक वर्णन करतात. बर्म्याची विठ्ठलमूर्ती सुलीच्या नजरेसमोर उभी राहते. यातूनच बर्म्या दिसायला कसा असेल हे लक्षात येते.

बर्म्या हा प्रेमाच्या आठवणीत गुंततो आहे त्याला सर्व आठवणी होत आहेत. अशा त्याच्या प्रेमात रमणाऱ्या स्वभावाचे प्रत्यंतर आपणास 'सय' कथेमधून येते. हा बर्म्या स्वभावाने घाबरट असा आहे. हा बर्म्याही एकतर्फीच प्रेम करतो आहे.

## ३) तानाजी

तानाजी हा 'ल्हावर' कथेमधून आलेला आहे. शानीवर तो प्रेम करतो आहे. वडील तोंडाला चव यावी म्हणून तानाजीला ल्हावर मारुन आणण्यासाठी सांगतात. पण तो तानाजी मारलेली ल्हावर शानीला देतो कारण त्याचे शानीवर प्रेम असते. तो ज्यावेळी घरी परततो त्यावेळी आशेने वडील बघतात. पण तो रिकामाच असतो. बापाच्या प्रेमाला न जागणारा असा हा तानाजी दिसतो. कारण तारुण्याच्या उंबरठयावर असल्यामुळे तो शानीला भूलतो आणि तिलाच ल्हावर देतो. हाताला रक्त कशाचे लागले आहे हे विचारतात तेव्हा मात्र त्याच्या तोंडून सत्य बाहेर पडते आणि तो म्हणतो, ल्हावराचे आहे. ल्हावर मारुन बांधावर ठेवली आणि केसकरांच्या कुत्र्यांनी नेली असे तो खोटेच सांगतो आबाला खरे वाटते.

"बर कंदील घे त्यो...... छलं घरलां ...... मला वाटलं का खुरपबिरपं लावून घेतलसं ....... " 'ल्हावर' पृष्ठ क्र. ७७

या वाक्यातून आपणास असे दिसते वडील हे तानाजीवर प्रेम करत आहेत. घरी परतताना मात्र या तानाजीला अपराध्यासारखं वाटतं. अंधारात तोंड लपवावे असे त्याला वाटते. असा हा तारुण्याच्या उंबरठयावर असणारा आणि शानीवर प्रेम करणारा तानाजी 'ल्हावर' कथेत आलेला आहे.

## ४) कुसुम

कुसुम ही 'कंदील' कथेमध्ये पाटलांनी चितारलेली आहे. निळी साडी घातलेली, नाकात नथ, कारण नसताना चेहऱ्यावर हसू असलेली अशी ही कुसुम आहे. ती तरुण आहे. कपडे धुण्यासाठी ती जाते आणि तिथेच विचार करत बसते. ती प्रेमाच्या विश्वात गुंतलेली आहे. तिच्या मनाचे खेळ सुरु होतात. शाबीने, आनंदीने जसे पळून जावून लग्न केले तसेच आपणही

हाऱ्याबरोबर लग्न करावे असे तिला वाटते. पण तेही ती करु शकत नाही. तेवढे धाडस तिच्यात नाही. नंतर काही बरे वाईट होईल याची भिती तिला आहे. आनंदीला सोडून दिलेलं हेही तिला माहीत आहे. आपल्याही बाबतीत हाऱ्या असे करेल अशी ही भिती तिला वाटत आहे. नंतर स्वत:ला संपवण्याशिवाय दुसरा पर्याय आपणाला उरणार नाही. ती विचाराच्या तंद्रीत असते तोच तिला यायला उशीर का झाला म्हणून वडील कंदील घेऊन येतात. त्यामुळे तिच्या मनातील सगळा रचलेला मनोरा ढासळतो आणि ती मरगळलेल्या अवस्थेत आबाबरोबर घरी परतते. इथे तिची अवस्था मनाला कातर लावून जाते.

पाटील कथेच्या शेवटी लिहितात –

"दोघेही लगा लगा चालतात ....... तिच्या पायांना कसं मोकळं वाटतं. पायातून साखळ्या काढून ठेवल्यागत सारी चित्रं दूर जातात." 'कंदील' पृष्ठ क्र. १५२

वरील वाक्यातून तिच्या मनाची अवस्था टिपलेली आहे. सर्व विचार सोडून घरी परतताना तिला मोकळे वाटते. पायातून साखळया काढून ठेवल्यासारखे वाटते.

अशी हाऱ्यावरती मनापासून प्रेम करणारी आणि त्याचीच होऊन गेलेली कुसुम आपल्या लक्षात राहते. तारुण्यात पदार्पण केलेली ग्रामीण स्त्री, तिची मन:स्थिती कशी असते याचे दर्शन कुसुम या पात्राच्या द्वारे रंगराव पाटील घडवतात.

## ५) सगुणा

सगुणा ही 'राखणवाली' कथेमधून चित्रित झालेली आहे. तिचे वर्णन करताना रंगराव बापू पाटील म्हणतात –

"तिची कांती भुईमुगाच्या कोवळया शेंगेगत गोरीपान दिसत होती. भुईमुगाची शेंग टच्च भरावी तशी ही भरली होती. कर्दळीचा काळा रंग तिच्या डोळयात साठला होता. आणि पदरातून केसाचा भरगच्च आंबाडा दिसून येत होता."

एकदंर ती सगुणा गोरीपान होती. तब्बेतीने चांगली होती. देखणी होती असे दिसते. तिच्या गळयात मंगळसुत्र होते. हातात बांगड्या होत्या. तिची शरीरयष्टी चांगली होती. कथेमध्ये ती लेखकाला आदराने बोलवते. त्यांच्यासाठी शेंगा भाजते अशी ती वागते आहे हे पाहून तिची सलगी करण्याचा प्रयत्न लेखक करतो त्यावेळी ती त्यांना सांगते –

"मी तायाची हाय ...... तेचा जीव हाय माझ्यावर. मी पाट लावणार हाय ..... त्येच्याबरं. " 'राखणवाली' पृष्ठ क्र. १७७

या वाक्यावरुन तिचे तायावरचे प्रेम आपणास दिसून येते. अशी प्रेमाच्या विश्वात गुंतलेली ही सगुणा आहे. मुक्या प्राण्याबद्दल तिच्या मनात प्रेम आहे. म्हणून लेखकाने व्हला नारल्यानंतर ती म्हणते – "राघू मैना जोडी फोडलीसा. "

इथे तिचे प्राणीमात्रावरील प्रेम दिसून येते. लेखकाला ती भूलत नाही. नवऱ्याने टाकली असली तरी ती परत धाडसाने तायापाशी लग्न करण्याचा विचार त्यांना बोलून दाखविते. इथे तिच्या धाडसी मनोवृत्तीचे दर्शन घडते. राखण करता करता मी प्रेमाच्या विश्वात रममान झालेली आहे. ती वाचकाच्या मनाची पकड घेते.

## ६) कलाबाई जोगतीण

कलाबाई जोगतीण ही 'जोगवा' कथेमधून आपल्या लक्षात राहते. ही कलाबाई हिरव्या रंगाचे लुगडे नेसणारी, गोरीपान, डोळ्यात काजळ घालणारी, केसाचं फुगं पाडणारी अशी आहे. ती रुपवान व सौंदर्यवती असल्याचे दिसते. तिच्या रुपावर समाजातील अनेक लोक भुलतात. त्यामध्ये मास्तरही भुलतो आहे. परंतु ही कलोबाई स्वत:शी प्रामाणिक आहे आणि गिरीलाल बरोबर ती राहते आहे. त्याच्यावर तिचे प्रेम आहे. त्या प्रेमाच्या विश्वात ती रममाण झालेली आहे. समाजातील इतर व्यक्तींचा विचार ती करत नाही. इथे ती जोगतीण असूनसुद्धा प्रामाणिक आहे याचे प्रत्यंतर येते.

सारांश रुपाने आपणास असे म्हणता येईल की प्रेमाच्या विश्वात या वेगवेगळया व्यक्तीरेखा वावरत आहेत. त्यामध्ये जोगतीणीवर एकतर्फी प्रेम करणारा मास्तर आहे. तर पहिल्या प्रेमाच्या आठवणीवर जगणारा बम्र्या आहे. तसेच तारुण्याच्या उंबरठ्यावर असलेली आणि हाऱ्याबरोबर पळून जाण्याचा विचार करणारी कुसुम आहे. शेताची राखण करता करता पहिला संसार उद्‌वस्थ झाला असताना नवा संसार करणारी सगुणा आहे. शानीवर जिवापाड प्रेम करणारा तानाजी आहे. तर जोगतीणीचे जीवन जगता—जगता आपलाही संसार असावा ही भावना असलेली आणि गिरीलालवर प्रेम करणारी कलाबाई जोगतीण आहे. ही पात्रे प्रीतीविश्वात रमणारी पात्रे आहेत असे दिसते. त्यामुळे ती पात्रे आपल्या मनात राहून जातात. त्यांचा वाचकांच्या मनावर एक ठसा उमटतो.

## २) शेतीजीवनाशी एकनिष्ठ व्यक्ती

### १) निवास

शेतीजीवनाशी एकनिष्ठ असणाऱ्या पात्रामध्ये निवास हा 'राखण' कथेमधून चित्रित झाला आहे. त्याच्या हातात फरशी कुऱ्हाड असते. ती अंधारातसुद्धा वीजेसारखी लखलखत असते. त्याने अंगावर घोंगडे पांघरलेले असते. स्वत:च्या ताकतीची त्याला जाणीव होती. तरीपण हातातोंडाला आलेलं हायब्रिडच पीक नीट पदरात पडावं, चोरांची धन होऊ नये असे त्याला वाटत होते. असा हा निवास शेताची राखण करण्यासाठी जातो आणि त्याची झोप लागते. त्याला जाग आल्यानंतर लक्षात येते की, आपल्या शेजारचे संपतचे आणि बाजीनानाचे पीक जसेच्या तसे आहे आणि आपल्याच शेतातली हायब्रीड सर्व खूडून नेलेली आहे. त्यावेळी तो मनातून खूप अस्वस्थ होतो. कष्ट करणारा निवास पण त्याच्या पदरात निराशा पडते.

### २) सगुणा

शेताशी एकनिष्ठ असणारी आणि भुईमुगाच्या शेंगाच्या रानाची राखण करणारी सगुणा ही राखणवाली कथेमधून आलेली आहे. शेताची राखण करता करता स्वत:चे भावविश्व ती निर्माण करते आहे. समोरच्या व्यक्तीला ती आदराने बोलते आहे. ती धाडसी आहे. पहिला संसार उद्‌वस्थ झाला असताना ती दुसरा संसार तायाप्पा बरोबर थाटणार असल्याचे ती सांगते आहे.

इतर शेतीजीवनाशी एकनिष्ठ असलेल्या पात्रामध्ये 'मळणी' कथेमधून महादू सदलगा, लाटणे, संभा या पात्रांचा समावेश होतो. त्याचबरोबर मळयावर जीवापाड प्रेम करणारा भगवान हा 'मळा' कथेमधून आला आहे. तो मळयावर प्रेम करतो आहे. पण भावाच्या भितीपायी मळा विकतो आहे. अशी शेतीजीवनाशी एकनिष्ठ असलेली पात्रे 'ल्हावर' कथासंग्रहामधून आलेली आहेत.

## ३) अंधश्र द्धेला बळी पडणाऱ्या व्यक्तीरेखा

### १) मुलाणी, हरिबा उसाणे

अंध:श्रद्धेला बळी पडणाऱ्या व्यक्तीरेखामध्ये मुलाणी, हरिबा उसाणे हे 'बरकत' कथेमधून आलेले आहेत. कोकणी वैद्याने सांगितल्याप्रमाणे मुलाणी आणि उसाणे हे बेलदाराच्या गाढवाला कसला तरी झाडपाला चारतात. त्यामुळे त्यांना गाढवाच्या लिदीत सोने मिळणार असते. पण सोने मिळायचे बाजूलाच राहते आणि गाढव मरते की काय अशी अवस्था निर्माण होते. बेलदाराला मुलाणी औषध चारत असताना सापडतो आणि दंड म्हणून बेलदार २०० रु. घेतो. पण नंतर गाढव जिवंत होते. सर्वासमोर आपली बेअब्रू होईल म्हणून उसाणे आणि मुलाणी दोघेही खूप घाबरतात. अशा या दोन व्यक्ती ज्या अंध:श्रद्धेला बळी पडलेल्या आहेत. त्या 'बरकत' कथेमध्ये आलेल्या आहेत.

## ४) घाबरट व्यक्ती

### १) संभा

घाबरट व्यक्तीरेखामध्ये 'संभा' हा 'मळणी' कथेतून चित्रीत झालेला आहे. हा महादू सदलग्याचा भाचा आहे. हा मामाकडे शेताच्या मळणीसाठी जातो. रस्त्यात त्याला जोडवे शोधणारी बाई भेटते. येण्यास उशीर का झाला? हे मामांनी विचारल्यानंतर तो सर्व हकिकत सांगतो. त्यावेळी सर्वांचा समज होतो की त्याला जी बाई भेटलेली आहे ती म्हणजे मेलेली बायजी असते. तिचे भूत संभाला दिसते. त्यावेळी संभाला ताप भरतो. आणि त्याची अवस्था केविलवाणी होते. नंतर सकाळी देवऋषीकडे जाताना रात्रीचीच बाई संभाला दिसते आणि तो सर्वांना दाखवतो. त्यावेळी सर्वांच्या लक्षात असे येते ती बाई म्हणजे बायजीची धाकटी बहिण असते. रात्री तिझेच जोडवे पडलेले असते. भूत वगैरे काही नसते. केवळ गैरसमजामुळे संभाला भूत लागलेले आहे असे वाटते. आणि भितीमुळे संभाला ताप भरतो. असा हा घाबरट संभा आपणास दिसतो.

२) **भगवान**

घाबरट व्यक्तीरेखामध्ये मळ्यावर जिवापाड प्रेम करणारा पण भाऊ त्रास देतो आहे म्हणून मळा विकणारा भगवान 'मळा' कथेतून चित्रित झालेला आहे.

## ५) उनाड व्यक्ती

१) **सरशी**

उनाड व्यक्तीरेखामध्ये आपणास जयसिंगला भूल पाडणारी सरशी दिसते. ती जयसिंगवर प्रेम करुन त्याला आपल्या नादी लावून शिर्मा नावाच्या स्त्रीच्या संसार उद्‌वस्थ करते आहे. ती जयसिंगची बालपणाची मैत्रिण असते. जयसिंगचे लग्न झाल्यानंतरही ती त्याच्या परत जीवनात येते. अशा सरशी पात्राबद्दल वाचकाच्या मनात तिटकारा निर्माण होतो.

२) **गारुडी**

गारुडी 'मत्तीर' कथेमधून चित्रित होतो. हा पुंगीचा आवाज करत येतो आणि बायनाला भूलवतो. ती ओली बाळंतीण असते. त्यामुळे ती घरातून निघून जाते. त्या गारुड्याची विषारी नजर आहे. त्याच्याजवळ चाळ, टोपलं, नाग असतो. नाही म्हटलं तरी स्त्रीयांना भुलवणारा असा हा उनाड गारुडी आहे.

वरील उनाड पात्रांच्या शिवाय 'देऊळ' कथेमधील वच्ची, 'मळा' कथेमधील भगवानचा भाऊ, शानीशी सलगी करणारा व तीला ल्हावर देणारा तानाजी इ. पात्रांचा समावेश करता येईल.

## ६) सूडाच्या भावनेने पेटलेल्या व्यक्ती

### १) हांबऱ्या

हांबऱ्या हा सूडाच्या भावनेने पेटलेली व्यक्तीरेखा आहे. सासऱ्याने मारले म्हणून तो सासऱ्याचा खून करण्यासाठी जातो आहे. तो चालायला लागला की, माळीवरची माती खाली पडायची. तो कुऱ्हाडीला लोहाराकडून धार लावून आणतो. आणि सासऱ्याकडे जातो पण त्यावेळी सासरा पंढरपूरला गेलेला असतो म्हणून ज्याच्या दावणीचे वासरु हांबऱ्या कापून येतो. असा आडदांड हांबऱ्या आपणास 'गब्रु' कथेमध्ये चित्रित झाल्याचे दिसते. तो म्हणतो –

"पंढरपूरला गेलायं। जावायाला मारुन देवध्यान करतुय ! .....
मग आलो दावनीचं वासरुच कचलून तेच्या! " 'गब्रु' पृष्ठ क्र. २७
या वाक्यातून त्याच्या स्वभावाचे प्रत्यंतर येते.

## ७) स्त्री व्यक्तीरेखा

### १) बायना व इतर स्त्रीया

'स्त्री' व्यक्तीरेखा मध्ये गारुड्याला भुलणारी 'बायना' आहे. ती गारुडयाच्या पुंगीला भूलून त्याचा आवाज ऐकून घरातून निघून जाते. तसेच परमेश्वराच्या नावावर जोगवा मागणारी कलाबाई जोगतीण आहे. हांबऱ्याची बायको आहे. जी खूप घाबरट आहे. तसेच 'कळस' कथेमधून चित्रित झालेली सर्जुची बायको आहे. जिला सासूने व दीराने मारलेले आहे. प्राणीमात्रावर प्रेम करणारी. तसेच म्हैशीवर प्रेम करणारी किसामावशी आहे. तायाप्पावर प्रेम करणारी सगुणा आहे. पळून जाऊन लग्न करणाऱ्या शाबी आणि आनंदी या दोघी आहेत. तसेच शेताची जाऊन राखण करणारी सगुणा आहे. हाऱ्यावर प्रेम करणारी कुसुम आहे. जयसिंगला भुलवणारी सरशी आहे. पुजेला जाणारी वच्ची आहे. सुली आहे. या स्त्री व्यक्तीरेखांनी 'ल्हावर' कथासंग्रह गजबजलेला आहे.

या स्त्रीया सोशिक कष्ट करणाऱ्या प्रामाणिक, नैतिकता जपणाऱ्या दयाशील मनोवृत्तीच्या, पतीशी एकनिष्ठ असलेल्या अशा दिसून येतात.

## ८) दयाशील व्यक्ती आणि वत्सल व्यक्ती

### १) रहिमान

दयाशील व्यक्तीरेखेमध्ये रहिमान हा 'सोबत' कथेमधून चित्रीत झालेला आहे. हा मेहरबानच्या मुलीला माहेरी येत असताना सोबत म्हणून मदत करतो. आणि उशीर झाल्यामुळे तिला गावापर्यंत आणून सोडतो. येताना बरोबर बॅटरी घेतो. कंबरेला हंटर बांधायला तो विसरत नाही. रस्त्याने जाताना तो तिला सर्व सत्य घटनेची जाणीव करुन देतो. तो सांगतो तुझ्या आईला आणि वडिलांना तुझ्या चुलत्यानेच मारलेले आहे. कारण तुझी आई तुझ्या चुलत्याला भुलली होती. तेव्हा तुझे वडील मध्ये आल्यामुळे त्यांच्या नरडयाला काठीचा चाप देऊन मारले. नंतर तुझ्या आईलाही मारले. त्याचा सांगण्याचा उद्देश असा आहे की, तुझ्या मुलालाही वाटणी मिळते आहे म्हणून तुझा चुलता मारेल. म्हणून तिला जागे करतो असा हा दयाशील असणारा रहिमान आपणास दिसतो.

### २) आबा

दयाशील आणि वात्सल्याचे भावनेने भारावलेला आबा हा 'ल्हावर' कथेमधून व्यक्त होतो. मुलाने ल्हावर आणली नसताना हाताला लागलेले रक्त पाहून तो म्हणतो --

"हे हाताला रगात रं कशाचं? "

यावर तानाजी म्हणतो -- "ल्हावराचं"

यावर आबा म्हणतो "बरं कंदील घे ह्यो ..... छलं घरला ...... मला वाटलं का हाताला खुरपबिरपं लावून घेतलसं ....... " 'ल्हावर' पृष्ठ क्र. ७७

या वाक्यातून आबाचे तानाजीवरचे प्रेम दिसून येते. आपल्या मुलाने ल्हावर आणली नाही तरी चालेल पण त्याला खुरपे लागले की काय याची भिती आबाला वाटते आहे. असा हा मुलावर प्रेम करणारा आबा आपणांस दिसतो.

### ३) सोनाप्पा

सोनाप्पा हा 'दिंडी' कथेमधून चित्रित झालेला आहे. बायकोला आईने त्रास दिल्यामुळे ती निघून जाते. आणि आपल्या मुलाची समजूत तो आई पंढरपूरला गेलीयं अशी काढत असतो. मुलगा आईच्या प्रेमाला आतूर झालेला असतो. तो पक्या झोपेत सुद्धा बडबडतो. आई नाही याचा परिणाम लहान मनावर खूपच होतो. पण वात्सल्यपुर्ण असलेला सोनाप्पा हा आपल्या पक्याला सांभाळतो आहे. हा सोनाप्पाही वेडा झालेला असतो.

अशी ही पात्रे आपल्या नजरेत भरतात. या विविध पात्रांच्या मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न रंगराव पाटलांनी केलेला आहे. वरील ठळक पात्रांच्या व्यतिरिक्त गौण पात्रांच्यामध्ये काही पात्रांची यादी आपणास पुढीलप्रमाणे देता येईल. ही पात्रे वेगवेगळया स्थरातून आलेली आहेत. ती आपआपल्या व्यक्तिमत्वासह प्रकट झालेली आहेत. त्यामध्ये स्त्रीया–पुरुष यांचा समावेश होतो.

## गौणपात्रे पुढीलप्रमाणे

'जोगवा' कथेमधून आगंदी, गज्या, दाभोळे, धोंड्या न्हावी, वालुबाई, गिरीलाल ही पात्रे येतात.

त्यामध्ये आगंदी ही मास्तरची बालपणाची मैत्रिण असते. कोवळ्या वयातच त्याने बायको म्हणून तिला स्वीकारलेली असते. पण नंतर त्याचे लग्न दुसऱ्याच काळ्या बायकोबरोबर होते. आगंदी रोज मास्तर मोट हाणत असताना पाणी नेण्यासाठी विहीरीवर येत होती. एकदा तर वाटंकरी धाववर होता तो म्हणाला होता –

"आर तुझी बायको आली बघं."

अशीही आगंदी मास्तरच्या मनामध्ये आठवण म्हणून राहिलेली आहे.

गज्या आणि दाभोळे हे दोघे या 'जोगवा' कथेमध्ये चित्रित होतात. दाभोळे याची पानपट्टी असते. गज्या आणि दाभोळे जोगतीणीविषयी बोलत असतात. त्यामध्ये –

"जोगतीणी पण खायला लई घालत्यात म्हणं. " अस त्यांच बोलण चाललेलं असते.

धोंड्या न्हावी याच्याकडून मास्तर दाढी करुन घेतो आणि जोगतीची माहिती काढतो. ती राहते कुठे? हे विचारल्यानंतर वस्तारा अधातंरी धरुन धुंडीबा अवघडतो. त्यावर मास्तर त्याला म्हणतो "तिचं एक पोरगं साळत घालणार हुती." असा हा धोंडया सर्व माहिती मास्तला सांगतो.

वालुबाई, गिरीलाल, नाना परीट ही तीन पात्रे यांचा केवळ नामोल्लेखन कथेमध्ये आलेले आहेत. त्यांचे वर्णन, बोलणे असे कथेत काहीच नाही. केवळ नावापुरती ही पात्रे कथेत चितारलेली आहेत. नाना परीट हा कपडयांना इस्त्री करत असतो. वालुबाई ही एक कलाबाई सारखीच जोगतीण असते तर गिरीलाल हा कलाबाईचा जोगतीणीचा सखा असतो.

तसेच 'गब्रु' कथेमधून खंडू लव्हार, बुवा, मुलाणी, सुदीव, आबा आणि आण्णा, गब्रुची आई, बायको इ. पात्रे चित्रित होतात.

लव्हाराकडून हांबऱ्या हा कुऱ्हाडीला धार लावून येतो. तसेच खंडूच्याकडून सायकल घेवून तो बुवाकडे जातो. तो बुवा दारु विकत असतो. त्याच्याजवळ दारु पितो. नुलाण्याजवळ मटन घेतो आणि सासऱ्याला मारण्यासाठी जातो. सुदीव हा त्याचा भाऊ आहे. आबा त्याचे वडील आहेत. त्याच्या त्रासाला कंटाळलेली त्याची बायको आणि आई आहे. ही सर्व पात्रे नाममात्र येतात.

'कळस' कथेमध्ये नदाफ पोलीस फौजदार, दिक्षीत पोलीस, शहाजी, सर्जु, शिवाजी इ. पात्रे येतात.

'कळस' कथेमधील फौजदार हा जुन्या जमान्यातला असतो. भुजंगान भलमोठं इटूळ घालून छातीवर बसावं अशी त्याची छाती असते. करडं करपाट कॅस. करड्या मिशा असतात. फेंदारलेल्या नाकाचा, तसेच बुरड्या नजरेचा असतो. असा हा करारी बाणा असलेला फौजदार असतो त्याला घाबरुन दिवस सुद्धा भित भित वर येत होता. असे पाटील लिहितात. चांदणीला मारलेल्या खुणाचा तपास तो करत असतो. त्याने चांदणीच्या दिराला अटक केलेली असते. त्याचे जबाब घ्यायचे चाललेले असतात. असा हा फौजदार चित्रित होतो.

शहाजी हा चांदणीचा खून केलेला आणि सर्जुचा भाऊ असतो. तो कळकाच्या कांबीगत असलेला गोरा पोरगा असतो. त्याला नदाफ पोलीस पुढे घालून समाज मंदीराकडे आणत असतो. खुप मार दिला तरी शहाजी गुन्हा कबूल करत नाही. नदाफ पोलीस त्याला मार देत असतो. दिक्षीत पोलीस मात्र घाबरत असतो. अशी ही नदाफ पोलीस, दीक्षीत पोलीस आणि फौजदार, शहाजी ही पात्रे चित्रित होतात.

याशिवाय चांदणीचा नवरा सर्जु हा कथेच्या शेवटी चित्रित होतो आहे. चांदणीविषयी त्याच्या मनात आदर आहे. ती मरण पावली आहे तरी तो तिचाच विचार करत आहे. त्याला वाटत राहते तिने किती स्वप्ने बघितली असतील. पण त्याचा काही उपयोग झाला नाही.

'पाणेव' कथेमध्ये आण्णाप्पा, तात्या, पारुमामी, खेडकरांची आऊ इ. पात्रे येतात. आण्णाप्पा हा किसामावशीचा नवरा आहे. तसेच पारुमामी आणि खेडकरांची आऊ ही पात्रे केवळ नाममात्रच येतात. त्याचे संवाद, वावर वगैरे कुठेही आलेले नाही.

'मळा' कथेमध्ये लाटणे, इकबाल्या, आबा, अर्धल्या इ. पात्रे येतात. यामध्ये लाटणे आबा भगावानचा मळा विकत घेण्यास तयार होतो. आबांचा इकबाल्या हा मुलगा आहे. अर्धल्याचे आणि भगवानचे वैर असते. तो मला खूप त्रास देतो हे सांगताच भगवान म्हणतो –

"व्हय लई पिडलयं तेनं. एक दिशी संबंध मिरच्याच उपटून नेल्या. वावरात उभ पीक राहून दिलं न्हाय सारखी खसकाखसकी मुडापाच करतूय." 'मळा' पृष्ठ क्र. ५१

असा हा भगवानला त्रास देणारा अर्धल्या चित्रित होतो. शेवटी हा मळा लाटणे आबा विकत घेतो. इकबाल्या त्यामळ्यामध्ये राबत असतो तो अंधारागत काळामिट्ट असतो. अशी ही सर्व पात्रे 'मळा' कथेमध्ये येतात.

'दिंडी' कथेमध्ये फोंद्या, पक्या ही पात्रे येतात. 'फोंद्या' हा पक्याचा मित्र आहे. पक्या त्याला सांगतो माझी आई येणार आहे. त्यावेळी तो फोंद्या म्हणतो –

"हं आटावलीया कोण म्हणतं?

हं कायतरीच ? " 'दिंडी' पृष्ठ क्र. ६१,६२

त्याला अंगराक तोंडात घालायची सवय असते.

तर पक्या हा लहानपणी आई घरातून निघून गेल्यामुळे त्याच्या मनावर आई नसल्याचा आघात झालेला आहे. तो सारखी आईची वाट पहात असतो. पण आई येत नाही. त्याचे वडील सोनाप्पा पक्याला सांभाळत असतात. पक्या हा आई येत नाही म्हणून बालमनातून आई कशी दिसत असेल याची स्वप्ने रंगवितो.

"जाऊया का आईला बघायला ? ...... तू का आली नाहीस ? .....

मी नको का तुला? ...... बस, मी येतच न्हाय.

पक्या स्वत:शीच बोलतो आणि अधिकच मुस्कटून घेतो ....... " 'दिंडी' पृष्ठ क्र. ६४

असा हा आईच्या मायेला पोरका झालेला पक्या 'दिंडी' कथेमधून चित्रित होतो.

याशिवाय 'ल्हावर' कथेमधून शिंदयाची शानी चित्रित झालेली आहे. तानाजी शानीवर प्रेम करतो आहे. आणि म्हणून त्याने मारलेली ल्हावर तो तिला देतो आहे. 'तू शिकार केलीयास? असे सूचक वाक्यही शानीला बोलतो आहे. म्हणजेच तू माझी शिकार केली आहेस, मी तुझा झालेलो आहे. असे त्याला या वाक्यामधून सांगायचे असते. शानी ही शेळ्या राखण्याचे काम करत असते.

शानीचे रुप वर्णन करताना पाटील लिहितात —

"तिचं रुप अधिक देखणं दिसतं होतं. तिच्या बांगडया सारख्या बोलत होत्या. नाकातली नथ लुडूलुडू हालत होती. " 'ल्हावर' पृष्ठ क्र. ७०

अशी ही शानी, गौण पात्रामध्ये असली तरी ती वाचकाच्या मनात राहून जाते.

'सय' कथेमध्ये सुली शाबीचा भाऊ आंद्या आणि लाटण्याचा बालूशा ही पात्रे आलेली आहेत.

सूली ही बर्म्याच्या विहीरीवर धुणे धुण्यासाठी जाते. तिला सोबत म्हणून बर्म्या थांबतो आहे. तिचे वर्णन करताना पाटील लिहितात –

"तिची शेवाळी रंगाची काकणं. गोरेगोरेपान हात केवड्याच कणीस.

लांब तांबूस बोट. डोळयाचं भिरभिर ...... " 'सय' पृष्ठ क्र. ७८

तसेच तिने टिकल्याचं पातळ नेसलेले होते. ती धाडसी आहे. बर्म्याला ती म्हणते आहे. "खाली या " असे ती विहीरीत सोबत म्हणून बोलवते आहे. पण बर्म्याला एकदा अशीच शाबीबरोबर सलगी केल्यामुळे विहीरीतून मरेपर्यंत फेऱ्या माराव्या लागल्या होत्या म्हणून तो विहीरीत उतरत नाही.

अशी धाडसी असणारी सुली कथेच्या शेवटी मात्र विहीरीत बुडून मरते. त्यामुळे ती मनात राहते.

'सय' कथेमध्ये शाबी हे पात्रही आलेले आहे. बर्म्याने तिला पोहायला शिकवितो म्हणून विहीरीत उतरवले होते. अशी ही शाबी आहे. तर आपल्या बहिणीबरोबर बर्म्याने सलगी केली म्हणून त्याला विहीरीतून फेऱ्या मारायला लावणारा आंदू चित्रित झाला आहे. त्याचा मित्र म्हणून लाटण्याचा बाळूशा आहे.

'मत्तीर' कथेमधून आऊ, आनंदी, नथू नानी, चंदर, भाना, कारकुन्या, तायाप्पा, हरिश, मान्या इ. पात्रे येतात.

आऊ ही बायनाची सासू आहे. ती स्थूल शरीराची आहे. गारुडी भिक्षा मागायला आल्यानंतर ती म्हणते "बाळातीण झालीया. वाडायचं न्हाय. " ती अशी धाडसी आऊ आहे.

'मत्तीर' कथेमध्ये 'नथू' हा बायनाचा मुलगा आहे. त्याला आऊ आनंदीजवळ देते. ही दोन पात्रे केवळ नाममात्र येतात. बायना घरातून निघून गेल्यावर तिचा शोध घेण्यासाठी चंदर, भाना, कारकुन्या, तायाप्पा, हरिश, मान्या इ. पात्रे मदत करतात. ही पात्रे कथेच्या शेवटी येतात.

'परपंच्या' कथेमध्ये शेवाळेकाका, जयसिंग, आबा, हत्ती बाळगौंड, धारीराव इ. पात्रे येतात.

या कथेमधला शेवाळेकाका हा आबाबरोबर बोलतो आहे. त्याने बैल पाळलेली आहेत. आबाला उशीर झाल्याचे पाहून तो म्हणतो.

"आबा । "

"का गा "

"जरा उजेडाचं निघायचं न्हाय का ? "

"हाय की कायतरी ....... " 'परपंच्या' पृष्ठ क्र. १०४

तसेच कथेमध्ये आबा हे पात्र कष्ट करणारे पात्र आहे. एकदा बायकोने मटन आणायला सांगितले असताना तो तिला मार देतो आणि म्हणतो "हाच का परपंच्या करायचीस ? " म्हणजेच आबाचा स्वभाव चैनी करणारा नाही. असे दिसून येते. तसेच कथेमध्ये धारीराव हा जयसिंगचा भाऊ म्हणून चित्रित होतो. हत्तीबाळगौंड हा केवळ नाममात्र म्हणून आणि जयसिंगचा शेजारी म्हणून चित्रित होतो आहे.

जयसिंग हा आबाचा मुलगा म्हणून 'परपंच्या' कथेमध्ये चित्रित होतो आहे. हा जयसिंग कष्ट करणारा आहे. अशी ही विविध पात्रे परपंच्या कथेमध्ये येतात.

'राखण' कथेमध्ये निवास ह्या मुख्य पात्राशिवाय आबा, बेळगांवकर, केसुमामा, बळीआबा, म्हारतीदादा, संपत, बाजीनाना इ. पात्रे येतात.

म्हारतीदादा हा शेताची राखण करण्यासाठी गेलेला आहे. तो निवासच्या पावलांचा आवाज ऐकून उभे म्हणतो.

" कोण गाऽऽऽ "

" मी निवास हाय. "

" राच्चं कारं ? "

" मळ्याकडं राकणलां. "

" हाड तेच्याऽ यला तुजरं कोण नेतय । " 'राखण' पृष्ठ क्र. ११४

असा हा म्हारतीदादा निवासला धीर देतो आहे.

'राखण' कथेमध्ये आबा, बळीआबा, केसूमामा बेळबांवकर, ही पात्रे नाममात्र येतात. तसेच ज्यांचे शेत कापून नेलेले नाही तसेच आहे. म्हणून ज्यांना नामोल्लेख येतो ते संपत आणि बाजीनाना चित्रित होतात. संपताला तंबाखू खाण्याची सवय आहे. अशी ही पात्रे 'राखण' कथेतून चित्रित होतात.

'मळणी' कथेमधून बायजी, महादू, सदलगा, सुभान्या, लाटणेचा बाळूशा ही पात्रे चित्रित होतात.

महादू सदलगा हा शेतकरी असतो. तो खळ्यावर मळणी करण्यासाठी गेला होता. त्याच्यातला गडी म्हणून सुभान्या आणि बाळू लाटणे आलेले आहेत.

बायजी ही सावळा डवंगाची मुलगी असते. ती मेलेली आहे. पण संभाला तिची बहिण भेटते त्यावेळी त्याला वाटते ती बायजीच होती. तो सर्व हकीकत मळ्यावर गेल्यावर सांगतो त्यावेळी जोडवे पडले म्हणून शोधण्यासाठी मी बायजीला मदत केली. हे ऐकुन सर्वजण आश्चर्यचकित होतात आणि संभाला बायजीचे भूत लागले, झपाटले असे सर्वांना वाटते. पण ती बायजीची बहिण असते. ती बायजीसारखीच दिसत असते. बायजी मात्र मेलेली असते. अशी ही गौंण पात्रे 'मळणी' कथेमधून चित्रित होतात.

'बरकत' कथेमध्ये बेलदार आणि बेलदाराची बायको ही पात्रे येतात.

बेलदार हा स्वभावाने कडक होता. त्याचे डोळे तांबडे होते. त्याच्याच गाढवाला हरिबा आणि मुलाणी या दोघांनी लिदीत सोने सापडेल म्हणून कसल्यातरी झाडपाल्याचे औषध चारलेले असते. त्यामुळे गाढव मरणप्राय अवस्थेत पडलेले असते. त्या दोघांची चोरी ज्यावेळी उघडकीस येते तेव्हा हा बेलदार त्यांच्याकडून दोनशे रुपये घेतो. जिवंत असलेले गाढव गुपचुप बाजाराला घेऊन जातो. असा हा बेलदार आहे.

बेलदाराची बायको ही प्राणीमात्रावर दया करणारी अशी आहे. त्यामुळेच गाढव मरणार हे पाहून तिच्या डोळयात पाणी येते. गाढव जिवंत आहे हे नवऱ्याला सांगण्यासाठी ती उत्सुक असते. ती नवऱ्याला म्हणते –

"आवं गाडांव जित्त झालं."

"खरं म्हणतीयास काय ? बेलदार खुष झाला."

"व्हय. ऊन पाणी त्येच्या पायावर वतलं .... तोंडावर वतलं

अन् एकाएकी उठून उभ राहिलं." 'बरकत' पृष्ठ क्र. १४५

गाढव बाजाराला नेण्यासाठी बेलदाराची बायको त्याला मदत करते आहे.

'कंदील' कथेमध्ये शाबी, आनंदी, हाऱ्या, आबा ही पात्रे चित्रित होतात.

शाबी आणि आनंदी या दोघी कथेमध्ये नाममात्र येतात. त्या दोघीजण पळून गेल्या तसे आपणही पळून जावे असे कुसुमला वाटत असते. शाबी ही सोनाराची असते. ती कामाला असलेल्या गड्याबरोबर पळून जाते. ती धाडसाची आहे असे कुसुमला वाटते.

आनंदी पळून गेली पण नंतर ऐनवेळी तो तिला सोडून गेला. तिच्या जीवनाची वाताहत सुरु झाली अशी ही आनंदी कथेत नाममात्र येते.

'हाऱ्या' हा कथेचा नायक आहे. त्याच्यावर कुसुम प्रेम करते आहे. तोही कथेत नाममात्र येतो आहे.

'कंदील' कथेमध्ये आलेले आबा हे कुसुमचे वडील आहेत. धुणे धुण्यासाठी गेलेली कुसुम अंधार पडला तरी घरी लवकर येत नाही. म्हणून वात्सल्यपूर्ण असणारे आबा तिला आणण्यासठी विहीरीवर जातात. त्यावेळी तिच्या मनातील स्वप्न भंग पावते. आबा कंदीलबरोबर कुसूमला घेऊन घरी येतात.

'सरशी' कथेमध्ये जयसिंग, दत्तुआबा, तुका सावंत, शिर्मा, चंदर गाडीवान, आण्णासाहेब तलाठी इ. पात्रे येतात.

जयसिंग हा कथेचा नायक आहे. तो सरशीला बाई म्हणून ठेवतो आहे. ती बालपणीची मैत्रिण असते. पण त्यामुळे त्याचा संसार उद्‌वस्थ होतो. याची जाणीव जयसिंगला नसते. आपली बायको शिर्मा तिच्याकडे तो दुर्लक्ष करतो. असा हा स्वत:च्याच तंद्रीत वावरणारा जयसिंग आहे.

दत्तुआबा हे कथेतील शिर्माचे वडील आणि जयसिंगचे सासरे म्हणून चित्रित होतात.

दत्तुआबांचे व्यक्तीचित्र रेखाटताना पाटील लिहितात –

"दत्तु शेळका माळावरच्या वाटेगत तांबूस होता. गोरापान, घारुळा. तरुणपणी खजूरीगत रसरशीत असलेला दत्तुआबा आता खारकीगत वाळला होता. ऊनऊन दुधावर थंड साय तयार होऊन ती गोळा व्हावी तशा त्याच्या चेहऱ्यावर सुरकत्या उमटल्या होत्या. दुधात काळं पडावं तसा एक तीळ गालावर दिसत होता. गोंदण काढल्यागत खूप काबाडकष्ट करुन दत्तुआबाच्या पायांना धनकुलीसारखा आकार आला होता. त्यामुळे तो गिड्डा वाटत होता. एका हातात मोडकी जुनी ठिगळं लावलेली छत्री – दुसऱ्या हातात एक खाकी पिशवी घेऊन दत्तुआबा आपल्या लोकात आल्यागत निवांत चालला होता. 'सरशी' पृष्ठ क्र. १५३–१५४

असा हा आबा एक दिवस मुलीला भेटण्यसाठी जातो. पण मुलगी सुखात नाही हे त्याच्या लक्षात येते. आणि तो घरी आल्यानंतर खूपच अस्वस्थ होतो. झोपेतच तो अंथरुणावर उठून बसतो आणि त्याला अस्वस्थ होते. असा हा आबा वात्सल्याने भारलेला दिसतो. मुलीचा संसार सुखाचा व्हावा असे त्याला वाटत असते.

सावतांचा तुका हा कथेमध्ये दु:खी आबाला दु:ख कमी करण्यासाठी मदत करतो आहे. आबाची अस्वस्थता तो जाणतो. त्यानं पांढरीधोट टोपी घातली होती. आबाचे सर्व दु:ख तो जाणून घेतो. त्यामुळे थोडेतरी आबाचे दु:ख कमी होण्यास मदत होते.

शिर्मा ही आबाची मुलगी होती. ती जयसिंगाची पत्नी असते. तिचा संसार सुखाचा नसतो. ती दु:खी असते. तिचे वर्णन करताना पाटील लिहितात –

"शिर्मा आबासारखीच गोरीपान होती. नुकतंच आबान तिच लग्न केलं होतं. केळीच्या कोंबासारखी लेक एक आडदांड माणसाच्या गळ्यात पडली होती. तशी त्याची लेक बहुगुणी होती. देखणी होती. सोन्यासारखे हात होते. हिरवा चुडा, मंगळसुत्र अजून नवीननवीन होतं. " 'सरशी' पृष्ठ क्र. १५८

ही शर्मा सासरी जाताना डोळ्यातले पाणी आवरुन आबांच्या दर्शनाला जाते. माहेरावरती तिचे खूप प्रेम आहे. परंतु तिच्या जीवनामध्ये सरशी नावाची स्त्री आल्यामुळे ती दु:खी असते.

आप्पासाहेब तलाठी हे कथेमध्ये शिर्माच्या नवऱ्याला व्यवस्थित वागण्यासाठी सांगतात. त्यावेळी तो तसे वागायला सुरवातही करतो. पण नंतर खुप दिवसांनी परत जयसिंगला सरशी भेटते आणि तो पूर्वीसारखा वागतो.

'सरशी' कथेमध्ये चंदर गाडीवान हा नाममात्र येतो. त्याच्याकडून एकदा शिर्माच्या सासरचा निरोप आलेला होता हा उल्लेख येतो.

अशी ही विविध पात्रे कथेमध्ये चित्रित होताना दिसतात.

'राखणवाली' कथेमध्ये कथेचा नायक स्वत: हा लेखक आहे. त्यामध्ये तायाप्पा मगर हे पात्र चित्रित होते. त्याच्यावरती कथेतील सगुणा प्रेम करते आहे. तो कथेमध्ये नाममात्र येत आहे.

कथेमध्ये स्वत: लेखक हा नायक आहे. हा नायक सगुणेशी सलगी करण्याचा प्रयत्न करतो आहे. पण ती त्याला विरोध करते आहे.

याशिवाय 'सोबत' कथेमध्ये शेळक्याची मुलगी रहिमान, बब्या ही पात्रे येतात. शेळक्याची मुलगी आपला चुलता–चुलतीला भेटण्यासाठी माहेरी येते. त्यावेळी तिला आपल्या चुलत्याच्या कर्तृत्वाचा इतिहास रहिमान ऐकवतो त्यावेळी ती अस्वस्थ होते. अशी ही पात्रे कथेमध्ये येतात.

'देऊळ' कथेमध्ये वच्ची, मास्तर, आई वडील ही पात्रे येतात.

वच्ची ही बावाजीच्या दर्ग्यावर पुजेसाठी जाते. मास्तर आई वडील ही पात्रे कथेमध्ये येतात. आपला मुलगा उनाड वागतो आहे हे वडील मास्तरला सांगतात. आणि एखादं स्थळ आमच्या वच्चीला बघा असेही सांगतात. अशी ही पात्रे आहेत.

एकंदर सर्व कथामधील गौण पात्रांचा विचार केला तर एक गोष्ट सहज लक्षात येते ती म्हणजे, गौण पात्रांमध्येही काही ठळक पात्रे आहेत की जी लक्षात राहतात. आणि ती आपआपल्या गुण वैशिष्टयांनी नटलेली आहेत. ती मनावर ठसतात. कथेमधले त्यांचे स्थान अनन्यसाधारण असे आहे. त्या गौण पात्रामध्ये आगंदी, लाटणे, शिंदयाची शानी, पक्या, सुली, शाबी, जयसिंग, संपत, महादू सदलगा, बेलदार, हाऱ्या, शिर्मा, तायाप्पामगर, वच्ची इ. पात्रे मनात राहतात. या पात्रामधली काही ठळक वावर असणारी अशी आहेत तर काही पात्रे ही नाममात्र येतात. त्याच्या केवळ नावाचाच उल्लेख आहे. या पात्रांना कथेमध्ये महत्त्वाचे स्थान आहे.

अशा विविध पात्रांच्या मनाचा त्यांच्या लकबीसह तळ शोधण्याचा प्रयत्न रंगराव पाटलांनी केला आहे. त्यांच्या व्यक्तीचित्रणाच्या बाबतीत महादेव मोरे म्हणतात –

"शंकर पाटलाप्रमाणे रंगराव पाटलांनी आपल्या कथातून व्यक्तींच्या मनाचा तळ चाचपण्याचा यशस्वी प्रयत्न केलायं हे नजरे आड होऊ देऊन चालणार नाही. शंकर पाटलांच्या नंतर ग्रामीण कथेच ओझं ज्यांनी आपल्या भक्कम खांद्यावर सतर्थपणे पेललयं, त्यात रंगराव बापू पाटलांचे नाव अग्रक्रमाने घ्यावं, असं तोलदार काम त्यांनी केलयं ...... असं त्यांनी जे म्हटलयं ते योग्यच वाटते. मराठी ग्रामीण साहित्याचा इतिहास लिहित असताना कोणालाही 'ल्हावर'ला सोडून पुढे जाता येणार नाही. इतके यश 'ल्हावर'चे आहे. म्हणूनच त्यांच्या पाठीवर थाप टाकून म्हणावसं वाटत, "हैश्यारे गब्रु " ८

म्हणून 'ल्हावर' कथासंग्रह अभ्यासल्यानंतर असे म्हणावेसे वाटते की, त्यांच्या सर्व स्थरातील स्त्री–पुरुष अशा चित्रविचित्र व्यक्तींनी गजबजलेला आहे. आणि हे 'ल्हावर'चे श्रेष्ठत्व आहे. आणि या पात्रामधून पाटलांनी कथाविश्व साकार केलेले आहे.

## मानवेत्तर व्यक्तिरेखा

मानवेत्तर व्यक्तिरेखेमध्ये पाटलांनी वारा, कंदील, कोल्हं यांच्या व्यक्तिरेखा रेखाटलेल्या आहेत. वाऱ्याची व्यक्तिरेखा त्यांनी 'कंदील' कथेमध्ये रेखाटलेली आहे. रंगराव बापू पाटील लिहितात–

"वारा कानाशी भुरभुरतो. गुजगोष्टी करतो. कुजबुजतो. कुरळे केस उडवतो आणि लगट करुन विचारतो. "आज सारा दिवस मळयातच काढलासं? हाऱ्या भेटला?" तिच अंग फुलतं. खुलतं चेहऱ्यावर एक नाजूक हास्याची रेघ, पापण्याची मिस्कील जलद उघडझाप, काळयाभोर डोळयांची हालचाल, पायची नवथर चेहऱ्यावर पुसट लाज ती पुटपुटते वाऱ्याला म्हणते,

"चा ऽ वाट." 'कंदील' पृष्ठ क्र. १४७

म्हणजेच वारा तिला गुपीत विचारण्यासाठी सलगी करतो आहे. तिच्या मनातील विचारतो आहे. ती लाजून चूर झालेली आहे. असे चित्रण येते. इथे वारा तिला जवळचा वाटतो आहे.

पाटील कोल्हाच्या वर्तनाचे वर्णन करतात. ते कसे मातीचा दर्प हुंगत असते. कसे ओरडत असते. स्वत:च्याच धुंदीत कसे असते हे सर्व पाटील टिपतात. ते लिहितात –

"एक लांबलचक हुक्की द्यायच तेच्या मनात आलवतं. पण ते माती हुंगीत तळयाच्या काठाकाठानं पळाय लागलं. तळयाच्या काठानं ओलसर झालेल्या मातीचा दर्प तेला अधिकच वेड लावित होता. ते सारखं तळ्याच्या या काठापासून त्या काठापर्यंत धावायचं. पुन्हा मस्तकात भिनणारा दर्प कुठूनतरी यायचा आणि मग ते उगीचच आभाळाकडं तोंड करुन वर बघायचं. पायात शेपटी घालून गरगर फिरायचं. कुईकुई असा बारीक आवाज करीत नाकपुड्या फुगवून खच्चून वासं घ्यायचं." 'कळस' पृष्ठ क्र. २९–३०

पाटील कंदीलाचीही व्यक्तिरेखा रेखाटतात. त्याची व्यक्तिरेखा रेखाटताना पाटील लिहितात –

"कंदील जवळ येऊ लागतो. कंदील अगदी जवळ येत आहे. कंदील आणि तो माणूस जवळ येतो. " 'कंदील' पृष्ठ क्र. १५२

अशा प्रकारे मानवी व्यक्तिरेखाबरोबरच मानवेत्तर व्यक्तिरेखाही ते अस्सल स्वरुपात रेखाटतात. त्यामध्ये त्यांनी म्हैस, कुत्रे, ल्हावर, वासरु, सर्प, भूत, गाढव इ. ची वर्णनेही केलेली आहेत. आणि हेच त्यांच्या लेखनाचे वैशिष्टये आहे.

## ५. कथांचा विकास

पाटलांच्या कथेचा विकास हा उत्कंठा लावून ठेवणारा असा आहे. त्यांच्या कथेचा वेधक प्रारंभ, औत्सुक्यपूर्ण विकास आणि अनपेक्षित खिळवून ठेवणारी अखेर पाहण्यासारखी आहे. खालील मुद्यांच्या आधारे हा विकास कसा झाला हे पाहू –

## १) कथेचा आकर्षक प्रारंभ

रंगराव बापू पाटील यांच्या कथेचा प्रारंभ खरोखरच मनाची पकड घेणारा असतो. ते कथेची सुरवात आकर्षक करतात. आणि त्यामुळे वाचकाला उत्कंठा लागून राहते. आकर्षक सुरवात करताना ते विशिष्ट भाषाशैली वापरतात. त्यामुळे आपणास वाटत राहते पुढे काय आहे म्हणून कथा पुढे वाचाविशी वाटते. 'गब्रु' कथेचा प्रारंभ पाहण्यासारखा आहे. पाटील लिहितात –

"हांबऱ्या भडकला होता. कुणाशी बोलत नव्हता. कुणी काय म्हटलं तर खेकसत होता. सहज गोष्टीला पण आरडून बोलत होता. घरातनं दाणदाण चालत होता. तेनं माळी हादरायची. माती खाली पडायची." 'गब्रु' पृष्ठ क्र. १९

या वर्णनामधून हांबऱ्या हा किती रागावलेला आहे याचे प्रत्यंतर आपणास येते. त्याचबरोबर कथेत पुढे काय आहे तो कशाबद्दल चिडलेला आहे यासाठी कथा पुढे वाचाविशी वाटते. असा हा 'गब्रु' कथेचा प्रारंभ आहे.

'जोगवा' कथेमध्येही पाटील अशीच सुरवात करतात. त्या कथेमधील मास्तर हा जोगतीणीला नादावलेला असतो. त्याला अन्नपाणी गोड लागत नाही. पण प्रत्यक्षात ती त्याला भेटलेली नसते. त्यामुळे तो अस्वस्थ असतो. तिचे रुप तो डोळयापुढे आणतो. 'जोगवा' कथेची सुरवात वाचल्यानंतर वाटते पुढे काय आहे. मास्तरला जोगतीण भेटली आहे का? यासाठी मन उत्सुक होते व आपण कथा पुढे वाचतो.

'जोगवा' कथेचा प्रारंभ करताना पाटील लिहितात –

"जुगतीणीला त्यो नादावलावता. तिच्या शिवाय त्याला दुसरं काहीच सुचत नव्हतं. जेवाण ग्वाड लागत नव्हतं. सारखी नदरंपुडं दिसत होती. गुरीपान हिरव्या लुगडयानं तिचं गोरपण उजळलेलं केसाचं काळंभोर फुगं पदरातच बाहेर आलेलं. डोळयांत काजळ. सगळा देखावा नदरफुडं याचानं हेच सगळं आंग मरगळून पडायचं. कुठतरी कोपऱ्यात बसायचा, गुडघं पोटाशी घेऊन कुणीतरी याचं. चार शब्द बोलायचा. पण हेचं लक्ष तिकडं नसायच. कायच्या कायच उत्तर द्यायचा. माणूस गेला मंजी हेला बरं वाटायचं. निवांत विचार करायला यायचा. रुप डोळयापुढं आणायचा. तिच्याबर बोलाय याचं. ती हसायची. ह्यो हसायचा. दोघांची गॉड भाषा सुरु व्हायची. ह्येच्या मनाचंच सगळं. एक मन जुगतीण एक मन ह्यो, असं सगळं चालायचं." 'जोगवा' पृष्ठ क्र. ९

'ल्हावर' कथेचा प्रारंभही पाहण्यासारखा आहे. वैरणीचा बिंडा घेऊन तानाजी येतो. आणि त्याला बाप काहीतरी विचारण्यासाठी उत्सुक असतो. ते म्हणजे भांगलण आवरली का? हे तो कशासाठी विचारतो कारण त्या आबाला ल्हावराचे मांस खायचे असते. आपला तानाजी ल्हावर मारुन आणेल असे आबाला वाटते. म्हणून तो भांगलण झाली का असे विचारतो. वाचक या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी कथा पुढे वाचतो. पाटील लिहितात –

"वैरणीचा बिंडा तानाजीनं छपरात टाकला आणि दैवारानं भिजलेली कापडं काढून ती त्यांनं छपराच्या कुडावर टाकली. मग पाटात साठलेल्या गढूळ पाण्यानं तो हातपाय धुऊ लागला. जोंधळयांच्या पानांचा चिकटा जागोजाग लागला होता. तोही त्याने धुतला आणि ओला हात तसाच त्यानं चेहऱ्यावरुन फिरविला.

धाववर कोवळ्या ऊनात म्हातारा बुड टेकून बसला होता. सकाळचं कोवळं ऊन त्याला बरं वाटत होतं. समोरच पोपटी शिवार बघत म्हातारा उगीच बसून राहीला होता. त्याच्या पायांच्या शिराचं जाळं स्पष्ट दिसत होतं. डोळ्यांची बैंदुलागत बुबुळं फिरवीत त्यानं, धावंच्या फुफाट्यात पिवळी गुळणी टाकली आणि इचारलं,

आरं तानाजी भांगलनं आवरली का र? " 'ल्हावर' पृष्ठ क्र. ६५

अशाप्रकारे पाटील कथांची आकर्षक सुरवात करतात की ज्या मधून कथा सहज विकास होत जाते. आणि शेवट ते अनपेक्षित करतात हे दिसून येते.

## २) औत्सुक्यपूर्ण विकास

रंगराव बापू पाटील कथेची सुरवात आकर्षक करतात. आणि औत्सुक्यपूर्ण विकास करतात. हांबऱ्या हा सासऱ्याला मारण्यासाठी कुऱ्हाडीला धार लावून जातो. त्यावेळी निश्चितपणे सासऱ्याला मारेल असे वाटते. त्याची बायको खूप घाबरलेली असते. पण बायकोशी ज्या वासराचा संबंध आहे. ज्या वासराला अंगाखांद्यावर खेळवले आहे ते वासरु हांबऱ्याच्या बायकोला आठवते. इथे कथेचा विकास होत आहे. पाटील लिहितात –

" हांबऱ्याच्या बायकोला माहेर आठवलं. आई बाच्या आठवणीनं ती मुळूमुळू रडू लागली. अंगणातली खिलारी गाय नुकतीच व्याली होती. तिच्या मऊशार अंगाच्या मखमलीवरुन ती हात फिरवायची. छोट वासरु बळीच्या पंखासारखं पांढरंशुभ्र गोंडस, इवली इवली जांभळी जीभ, ते कवेत घेऊन मिरवावं असं तिला वाटे सगळं माहेर तिच्या पुढं उभ राहीलं. " 'गबु'पृष्ठ क्र. २३

'जोगवा' कथेमध्ये मास्तर हा जोगतीणीची चौकशी धोंड्या न्हाव्याकडे करतो आहे. त्यावेळी वाचकालाही उत्सुकता लागून राहते. न्हाव्याने पत्ता सांगितल्यानंतर मास्तरला ती भेटली असेल का? मास्तरचे मन तिने जाणले असेल का? वगैरे प्रश्न वाचकाच्या मनात निर्माण होतात. आणि वाचक पुढे कथा वाचतो. तिथेच कथेचा विकास होतो आहे. जोगतीणीचा पत्ता मिळाल्यानंतर मास्तर तिला भेटण्यासाठी जातो. इथे कथा खऱ्या अर्थाने विकसीत झालेली आहे.

पाटील लिहितात —

"जेवणएळ टळून गेली आणि मग ह्यो कापडं चढवून बाहेर शुभ्र धोतराचा काठ हातात धरुन कोल्हापूरी पायताण वाजवित बाहेर पडला. माणसं देवाच्या पाया पडते होती. यानंही जोडले. रामूस टेकानं वर झाला. बुद्रुक टॅक आलं. सताठ खोपाटं गारठ्यात काकडत होती."

'जोगवा' पृष्ठ क्र. १६

'ल्हावर' कथेमधला तानाजी आबाने सांगितल्यावर ल्हावर मारण्यासाठी जातो पण तो शानीची शिकार होऊन बसतो. शानी त्याला भेटते आणि तिच्यावर प्रेम करतो. इथे कथेमध्ये वाचकांची उत्सुकता वाढत राहते. तो तिच्या बरोबर केसकरांच्या पडकातून ल्हावर शोधत फिरतो. दोघांना चांगला एकांत मिळतो. इथे कथा विकसीत होते. दोघेजण सावलीला बसतात. पाटील लिहितात —

"मारलंसा ल्हावर ? "

"मग? ....... माझ्या आदीची हाय काय ? "

"घावलं नसत मंजी। " ती खट्याळ हसली.

"हं घावत नसतय. " असं म्हणून तोही तिथंच गलोरी आणि ल्हावर ठेवून सावलीला बसला. अगदी तिच्याजवळच. ती पदर सावरुन नीट बसली. उगीच नाकातल्या नथीशी चाळा करु लागली. तान्या तिच्याकडे डोळं भरुन पाहू लागला. " 'ल्हावर' पृष्ठ क्र. ७२

## ३) अनपेक्षित अखेर

रंगराव बापू पाटील यांच्या प्रत्येक कथेचा शेवट हा आपल्या मनामध्ये रेंगाळत राहतो. वाचकाच्या मनातील कथेचा शेवटाविषयी आणि प्रत्यक्षातील कथेचा शेवट यात मोठा फरक असल्याचे दिसते. कथेचा शेवट हा वाचकाला धक्का देतो व विचार करायला लावतो.

'गब्रु' कथेमधील हांबऱ्या हा कुऱ्हाडीला धार लावून सासऱ्याला मारण्यासाठी जातो. त्याची बायकोही घाबरलेली असते. तिला माहेर आणि तिचे ज्याच्यावर प्रेम आहे ते वासरु तिला आठवते. वाचकाला वाटते निश्चितच हांबऱ्या सासऱ्याला मारुन येणार पण तसे न घडता हांबऱ्या हा त्या वासरालाच मारुन येतो. त्याच्या बायकोचे ज्या वासरावर प्रेम आहे ते वासरुच तो मारतो. रक्ताने भरलेली कुऱ्हाड पाहून हांबऱ्याची बायको आबा म्हणून ओरडणार तेवढ्यात हांबऱ्या म्हणतो –

"पंढरपूरला गेलाय! जावायाला मारुन देवध्यान करतूय। ....... मग आलो दावणीच वासरुच कचलून तेच्या " 'ल्हावर' पृष्ठ क्र. २७

असा कथेची अनपेक्षित अखेर पाटलांनी केलेली आहे. कारण तिचा जीव ज्या वासरावर होता ते वासरुच मारले गेले आहे. आबास मारले असेल असे हांबऱ्याच्या बायकोला वाटते. पण वासराला मारुन तिच स्वप्नच उद्‌वस्थ केलं आहे. अशी अनपेक्षित अखेर करण्याचे कसब खऱ्या अर्थांनी पाटलांचे आहे.

'जोगवा' कथेतील मास्तर जोगतीणीला भेटायला जातो तेव्हा आपणास वाटते. तो आता निश्चितच जोगतीणीचा होणार. आणि जोगतीणही त्याच्यावर प्रेम करेल, लग्न करेल असे आपणास वाटते. पण असे न होता ती मास्तरला मी उद्या आळत्याच्या यात्रेला जाणार आहे. बरोबर माझा गिरीलाल आहे. असे सांगण्यालाही ती विसरत नाही. त्यावेळी मास्तरचे स्वप्न भंग पावते. आणि तो जड अंतकरणाने घराकडे परततो. त्यावेळी चांदण्या आपणास हसत आहेत असे मास्तरला वाटत राहते. अशी अनपेक्षित अखेर पाटील करतात. हे सांगताना पाटील लिहितात –

"तो बाहेर पडला. ती चौकटीत उभी. गर्कन वळून मागं पाहावं वाटलं. पण धोतराचा काठ हातात धरुन हा चालू लागला. आता चालण्यात दम नव्हता. पायताण कुर्र कुर्र वाजत नव्हतं. सगळं बुद्रुक टेक अंधारानं एरगटलं होतं. वर चांदण्या फुलल्यावत्या. त्या खदाखदा हसत होत्या. " 'जोगवा' पृष्ठ क्र. १८

'ल्हावर' कथेमधला तानाजी मारलेली ल्हावर शानीला देतो. तो घरी परतल्यानंतर वाचकाला वाटते तो खरे बोलेल व आबा त्याच्यावर रागवेल पण तसे न होता तानाजी आबांना खोटेच सांगतो. आबा हाताला रक्त लागल्याचे पाहून म्हणतात. "हाताला रक्त कशाचे? " त्यावेळी सत्य तानाजीच्या तोंडून बाहेर पडते. आणि ल्हावराचे रक्त आहे असे तो म्हणतो. पण ती मारलेली ल्हावर केसकरांच्या कुत्र्यानं नेली असे तो खोटेच सांगतो. यावर आबा म्हणतो –

"बरं कंदील घे त्यो ...... छलं घरलां ...... मला वाटलं का हाताला खुरपंबिरपं लावून घेतलसं ..... " 'ल्हावर' पृष्ठ क्र. ७७

आबा रागवतील असे वाचकाला वाटते पण तसे न होता वात्सल्याच्या भावनेने आबा त्याची चौकशी करतो. पण तानाजीला मात्र अपराध्यासारखे वाटत राहते. अशी ही कथेची अखेर असल्याचे आपणास दिसते.

डॉ. स. ग. यादव म्हणतात –

"लेखक तिथे कथा संपवितो तिथून वाचकांच्या मनात दुसरी कथा निर्माण झाली पाहीजे. हा अनुभव पाटलांची कथा देते. अकल्पित शेवट करुन वाचकांच्या धक्का देणारी व हे असं का। असा प्रश्न वाचकांच्या डोक्यात निर्माण करणारी त्यांची कथा, अंतर्मनाचा तळ शोधत राहते. याला कारण त्यांच्या अनुभवातील ताजेपण, निरागसपण, डोळसदृष्टी, प्रसंगाची अचूक निवड, नेमके शब्द, मोहक प्रतिमा, यात त्यांचे यश सामावलेले आहे." १

अशा प्रकारे पाटील कथांचा विकास करतात. आकर्षक प्रारंभ आणि औत्सुक्यपूर्ण विकास, अनपेक्षित अखेर पाटील आपल्या कथेमधून करतात. म्हणून त्यांची कथा सार्थ कथा ठरते.

## ६) वातावरण निर्मिती

रंगराव बापू पाटील यांच्या कथेमधून भावनेला अनुकुल व प्रतिकूल वातावरणनिर्मिती करतात. त्यासाठी प्राणीजीवन यांचा वावर करतात. निसर्गचित्रण व वातावरणनिर्मिती पाटील अत्यंत चांगल्याप्रकारे साधतात.

### १) अंधारलेली निराश मनं व्यक्त करणारे वातावरण

मास्तर जोगतीणीच्या घरातून बाहेर पडतो. ती गिरीलालबरोबर आळत्याला यात्रेला जाणार आहे असे सांगते. तिचे बोलणे ऐकुन मास्तर निराश मनाचे वातावरण चित्रित करताना पाटील लिहितात –

"तो बाहेर पडला. ती चौकटीत उभी. गर्कन वळून मागं पाहावं वाटलं. पण धोतराचा काठ हातात धरुन हा चालू लागला. आता चालण्यात दम नव्हता. पायताण कुर्र कुर्र वाजत नव्हतं. सगळं बुद्रुक टेक अंधारानं एरगटलं होतं. वर चांदण्या फुलल्यावत्या व त्या खदाखदा हसत होत्या. आणि काळीही त्यांच्यात सामील झाली होती." 'जोगवा' पृष्ठ क्र. १८

### २) अस्वस्थ वातावरण

अस्वस्थ वातावरण हांबऱ्याच्या हालचालीमधून आणि शब्दामधून व्यक्त होते आहे. तो पाय आदळत चालत होता. कोणी काही विचारल्यानंतर खेकसत होता हे चित्रित करताना पाटील लिहितात –

"हांबऱ्या भडकला होता. कुणाशी बोलत नव्हता. कुणी काय म्हटलं तर खेकसत होता. सहज गोष्टीला पण आरडून बोलत होता. घरातनं दाण दाण चालत होता. तेनं माळी हादरायची माती खाली पडायची. " 'गब्रु' पृष्ठ क्र. १९

## ३) भय कुल वातावरण

पाटील आपल्या कथेमधून भयाचे वातावरण निर्मिती करतात. 'गब्रु' कथेमधील हांबऱ्याची बायको रात्रीचे दार वाजले म्हणून उठते. वाऱ्याने दार उघडलेले असते. बायको परमेश्वराचा धावा करते. काय दृष्टीस पडते आहे हे तिला वाटत राहते. कारण सासऱ्याचा खून करण्यासाठी हांबऱ्या गेलेला असतो.

हे भयाचे वातावरण चित्रित करताना पाटील लिहितात –

"रात्र कलथून चालली होती. उशीरानं सासूला डोळा लागला. आणि एकाएकी दरवाजा धडकला. त्या भयानं शांततेत दरवाज्याच्या दाराची धडक भयानक वाटली. सुनेन चिमणी लावली. सासूला हाक मारली, "आत्ती। ..... आवं आत्ती। " तिनं म्हातारीला हालवून जागी केली.

"काय गं? "

"दरवाजा कुणीतरी धडकला. "

"हाक मारली का? "

"सुदीव असलं तर ..... "

"काय बघाय मिळतंय कुणास ठाऊक? " असं म्हणून म्हातारा दिवा घेऊन पुढं निघाला. म्हातारी मागनं. सून अंगणात दातांत पदर धरुन उभी. परमेश्वराचा धावा करीत उभी राहीली. 'काय वाईट घडू देऊ नको.' 'गब्रु' पृष्ठ क्र. २६

कसल्यातरी आवाजाने कोल्हं भिते हे सांगताना पाटील लिहितात –

"त्या खरखर आवाजान वडाच्या झाडातलं पाखरु फडफडत अंधारातच दूर कुठंतरी गेलं. कोल्हानं दचकून पायात शेपूट घातलं. इकडं तिकडं बघितलं." 'कळस' पृष्ठ क्र. ३०

असेच भयकुल वातावरण चित्रित करताना 'कळस' कथेमध्ये चांदणीला मारायच्या अगोदर भाकरीच ग्वाड लागली नसेल. जसे बोकडाला मुलाणी पाण्यात दिसतो. हे भयाचे वातावरण चित्रित करताना पाटील लिहितात –

"कापायच्या आदी दोन दिवस बोकडाला पाणी जात नाही. मुलाणी पाण्यात दिसतो. तशी तिला दोन दिवस भाकरीच ग्वाड लागत नव्हती. आई बाची आठवण येत होती. इवून नुसतं नदरं पडून जावा म्हणून सांगावा द्यावा वाटत होता. पण कोण देणार सांगावा? दिरालानं थिरडीला जरा दिकुल हिकडं तिकडं झाल्यांलं खपतं न्हाय. दोन दिवस झालं घरात काय तरी सारखी कुजबुज चाललेली होती. उगचं वाटायचं मारुन बिरुन टाकतेती काय कुणाल दिक्कल."
'कळस' पृष्ठ क्र. ३३

'मळा' कथेतील भगवान हा भावाच्या त्रासाला भिऊन मळा विकण्याचे ठरवतो, तो भिलेला आहे. त्याचा भाऊ त्याला त्रास देतो आहे. छप्परावर दगडं मारतो आहे. हे वातावरण निर्मिती करताना पाटील लिहितात –

"आभळात चांदण्या फुलल्या. काळोखाच्या जबडयात चराचर अदृश्य झालं हवा थंड झाली. गारठा पडला. झाडाच्या पानाचं बर्फ झालं. गारठयाचं भूत झाडांच्या मानगुटीवर बसलं. वारा घुबडागत घोघावू लागला. काळयाचा मळा घाबराघट्ट होऊन अंधारात बुडून गेला. उंच टेकडी निळ्यागर्द काळोखात वितळून गेली. गुलाबी फुगा पश्चिमेच्या सागरात फुटून आता दोनतीन तास झाले होते. आणि अंधार काळीभोर मेंढरं हाकीत निघाला होता." 'मळा' पृष्ठ क्र. ४६

असेच भगवानच्या मनाचे चित्रण करताना पाटील लिहितात –

"भगवान सावकाश पायऱ्या उतरला. आणि काठावरच्या बेडकांनी संगट पाण्यात उडया मारल्या. त्यानं परडीचं सामान पायरीवर ठेवलं आणि भिर्रर्र ऽ ऽ करुन एक पाखरु हुंबरावरनं हवेत बाणासारखं घुसलं. चार हुंबरं हिरीत पडली आणि भगवान दचकला. त्यानं हिरीतून आभाळात पाहिलं. मकार घारवाडागत झडप घालीत असल्यासारखं दिसलं. उंबराचं उंच झाड आभाळाला टेकल्यागत दिसत होत आणि त्याच्या शेंड्यावर आभाळात फुलबाज्या उडत होता. चांदण्या फुलत होत्या. बेटातलं पान भिर्रर्र ऽ ऽ करत होत.

मग एक धनछडी केकाटली. अंधाराचा पडदा कापीत दूरवर गेली आणि भगवान अधिकच घाबरला. " 'मळा' पृष्ठ क्र. ४७

भूताच्या भीतीचे वातावरण 'मळणी' कथेमध्ये आलेले आहे. कथेतील संभा हा बायजी भेटली हे सांगितल्यानंतर सर्वांच्या बोलण्यातून भूताच्या भितीचे वातावरण निर्मिती होते. हे भूतभीतीची वातावरण निर्मिती पाटील पुढील लेखनातून करतात –

"आन् ती कुठशी? " सर्वजण संभाकडे पाहू लागले. तो म्हणाला, "वाटनं येताना भेटली. चांगली वड्यापातूरं आली अन् माघारी फिरली ...... "

"आरं तिच्या बायली ..... । बरं, म्हणत हुती तरी काय? संभाची छाती धडधडू लागली, तोंडाला कोरड पडली. त्याचे पाय लटपटू लागले. बोलताच येईना त्याला. तरीही त्यानं अडखळतं सांगितलं. "जोडवं पडलयं म्हणून वडापासनं माघारी आली माझ्याबरं. म्हणाय लागली, बत्तीच्या उजेडात बघत जाऊया। "

"गतकाळबाळीच्या, भूत हाय म्हटल्यावर बोलायचं न्हायसं त्येच्याबर .... थेट पळत याचस त्वा। भूताला पहिली ओ देऊ नये. झाड घेऊन जातं."

"मला काय म्हाईत तिचं काय झालय ते। घ्या दोन वर्षात हिकडं आलुया का मी? "

आणि सदलग्याला सर्व अंगातून वारं गेल्यासारखं वाटू लागलं. भाच्याला भूत दिसलं म्हणून तो रंजीस झाला. संभालासुद्धा थंडी वाजून आली. तेवढयात कुणीतरी विचारलं "पावलं बघितलीस काय तिची? उरपाटी हुती काय?"

त्यानं ओठावरुन जीभ फिरवत सांगितलं, "मी आपला तिचं जोडवं हुडकाय लागलो. मी कशाला तिच्या पायाकडं लक्ष देतूय." 'मळणी' पृष्ठ क्र. १२८,१२९

## ४) आभाळातील ढग व म्हैसीची कास यांची तुलना करणारे वातावरण

'पाणेव' कथेमधली किसामावशी ही धार काढायला बसलेली असते. पण म्हैसीची कास विसविसीत वाटते. म्हैस दूध देण्यास तयार नाही असे किसामावशीला वाटते. ती सारखी आकाशाकडे बघत असते. त्यावेळी आकाशातील ढग तिला पहिल्यांदा टम्म फुगलेल्या रिडीगत दिसतो. तिला आशा वाटते. पण तसे होत नाही. म्हैस पाणवत नाही.

१) सुरवातीला म्हैस दूध देईल असे किसामावशीला वाटते. त्यावेळी ढगाची तुलना करताना पाटील लिहितात –

"किसामावशीनं पदर सावरला. कंबरत आणि कासंखाली बसली. कुडच्यांन पाणी घेऊन तिनं थानावर टाकलं. तसा म्हशीनं पाय उचलला. शेंनात रेंदाळली. तसाच किसामावशीनं कासत हात घातला. आणि तिनं वर आभाळात पाहिलं. रीडीगत टम्म फुगलेला एक काळा ढग तरगंत होता. त्याच्या कडा नव्या दाव्याच्या एसनीगत दिसत होत्या." 'पाणेव' पृष्ठ क्र. ३७

२) नंतर किसामावशीला म्हैस धार देत नाही असे वाटते त्यावेळी पाटील लिहितात –

"पाणकणसाच्या कापसागत हिरवट ढग जमत होत. आभाळाचं खळं मध्येच मोकळं पडतं होते. जांभळया बलंग्यागत ढगांचं ढीग पडलं होत." 'पाणेव' पृष्ठ क्र. ३८

आणि शेवटी म्हैस धार देणार नाही याची खात्री होते तेव्हा पाटील लिहितात –

"वा आभाळात भोरं तांबूस ढग जमत होतं. काही पांगत होत. निळं आभाळ त्यातनं तोंड दाखवित होतं. किसा आभाळात बघायाची कधी रस्त्यावर तर कधी जोत्यावर आणि पुन्हा थानं ओढीत होती." 'पाणेव' पृष्ठ क्र. ४१

"आण्णाप्पा ताठ उभा राहीला. आभाळात नजर टाकली. वांजं ढग पाक पांगलं होतं आणि चांदण्या चमकत होत्या. हसत होत्या." 'पाणेव' पृष्ठ क्र. ४५

वरील वर्णनामधून पाटलांनी म्हैस व मेघ यांची तुलनात्मक दृश्ये रेखाटन उत्कृष्ट वातावरण निर्मिती केली आहे.

## ५) भक्तीला पूरक वातावरण

'दिंडी' कथेमध्ये दिंडी वाजत येते. आणि टाळांनी वातावरण निर्मिती होते. असे भक्तीचे वातावरण निर्मिती करताना पाटील लिहितात –

"दिंडी ऽऽ म्हणून सोनाप्पा किंचाळत आणि विठोबाच्या देवळातला पखवाज घूमत लहरत आला. टाळांनी वातावरण निनादून टाकलं. गजर उसळला. देऊळ घुमलं.

"विठोबा रुकमाई ....... विठोबा रुकमाई ....... विठोबा रुकमाई ....... विठोबा .. ..... विठोबा ....... विठोबा ....... बोला ऽऽ पुडली ऽऽ श्री ऽ ज्ञानदे ऽऽ व तुका ऽऽ राम श्री गुरुदेव ऽऽ दत्त विठोबा रुकमाई ......." 'दिंडी' पृष्ठ क्र. ५८

## ६) प्रेमातूर, कातर प्रीतीचे मन व्यक्त करणारे वातावरण

'सय' कथेमधील सुली बर्म्याच्या विहीरीवर कपडे धुण्यासाठी जाते. त्यावेळी तिची झालेली अवस्था, तारुण्य वाया जाईल असे सुलीला वाटत असते. ही वातावरण निर्मिती करताना व सुलीच्या मनाचे चित्रण करताना पाटील लिहितात –

"वाफ अंगाला झोंबत होती. केवडयाच कणीस मक्याच्या कणसागत भाजत होतं बुबळाला वाफ सहन होत नव्हती. डोळ विहीरीगत समडम भरत होते. चिठपाखरुही दिसत नव्हतं. आंब्याचा मोहर करपून जात होता. जरा गोड वाटत होतं. झळा अंगाला झोंबत होत्या. कडेवरच्या गाठोड्यातला निर्जिवपणा मोहरातही असल्यासारखा वाटला. काहीतरी अर्थच मृगजळासारखं." 'सय' पृष्ठ क्र. ७९

## ७) मनोदर्शन घडवणारे वातावरण

पाटील आपल्या काही वर्णनामधून मनोदर्शन घडवणारे वातावरण निर्मिती करतात. 'सय' कथेमधील सुली पाण्यावरचा तवंग बाजूला सारते त्यावेळी बर्म्या वरुन हे सर्व पाहत असतो. त्यावेळी त्याच्या मनात पूर्वीच्या शाबीशी केलेल्या सर्व लगटीमधील घटना आठवायला लागतात. त्यावेळी पाटील लिहितात –

"का उगचं उदार झालीयास? तो लाडेलाडे बोलतो. मग ती पाण्यावरचा तवंग हातानं दूर करते. शेवाळ पाण्याबरोबर हालतं. विहीरीची पापणी लवल्यासारखी दिसते. आणि पाण्यात चक्रं उमटतात. सुदर्शनचक्र हे चक्रव्यूह वाटतं. आणि त्याला आठवण येते." 'सय' पृष्ठ क्र. ८२

असेच आबांचे मनोदर्शन घडवणारे वातावरण 'सरशी' कथेमध्ये आलेले आहे. आबाच्या मुलीचा शिर्माचा संसार सुखाचा नसतो. हे पाहून आबा सारखा अस्वस्थ असतो. त्याला झोपेतही सारखे भास होत असतात. त्याला सारखे वाटत राहते. आपली मुलगी येऊन दार वाजवते आहे. हे त्याचे मनोदर्शन चित्रित करताना पाटील लिहितात –

"आबा उठला. तीही उठली. त्यानं कंदील घेतला. बाहेर आला पाऊस झिमझिम पडत होता. तो आता सळासळा पडू लागला. आबा धावेवर जाऊन उभा राहिला. त्यानं गर्द काळोखात दृष्टी फेकली, किर्रर काळोख. रातकिड्यांचा आवाज. भेसूर शांतता. झाडं टिपं गाळीत होती. सगळी सृष्टीच रडत होती. तापलेली काच होती. ती भिजली आणि तडकली. एक झोत आला आणि खंदील विझलां. आबा मटकनं खाली बसला. " 'सरशी' पृष्ठ क्र. १६७–६८

## ८) संमोहित करणारे वातावरण

संमोहित करणारे वातावरण 'मर्त्तीर' कथेमध्ये पाटलांनी वर्णन केलेले आहे. त्या कथेमधील बायजा ही घरातून निघून जाते. ते वातावरण पुढीलप्रमाणे

"पिवळं धम्मक ऊनं. पिवळ्या जरद नागिणीसारखं जमिनीतून वाफा निघत होत्या. झळा वाहत होत्या. नागिणीनं जिभळया चाटाव्या तशा झळा दिसत होत्या. ऊन फडी काढून थेट उभ होतं. वावरं आणि पांढर इस्त्यागत तापली होती. दुपारच्या फडीवर एखादं वावटळ उमटायचं आणि तांबडया भडक धुळीचं शिखर गगनाला भिडायचं. पाला, पत्रं, चिरगुटं, पिसं वर फिरत जायची. तरंगायची. रामदुय रामदुयची गुणगुणयाची.

आऊ भरुगडीचा वाडा वावटीळनं एक लाल डोळा उघडून बघायचा आणि पुन्हा मिटून घोरायचा. भलामोठ्या आक्राळविक्राळ दरवाज्याची दारं मागच्या खिळ्यावर पसरलेली होती. दगडं घसरलेली. अंगणात एक कोरडा रांजण आभाळाकडे तोंड करुन रुतलेला. त्याच्या काठाचा एक तुकडा निघाला होता. तिथं काळकरंद दिसतं होतं." 'मत्तीर' पृष्ठ क्र. ९१

## ९) बायनाचा शोध घेणारे वातावरण

गारुडयाला भूलून बायना घरातून निघून जाते. ती ओली बांळतीण असते. घरी तिचे लहान मूल असते. तिला शोधण्यासाठी कारकुन्या, लायाप्पा, मान्या, चंदर हे जातात. त्यावेळी एक विशिष्ट प्रकारची वातावरण निर्मिती 'मत्तीर' कथेमध्ये झालेली आहे ती पुढीलप्रमाणे

"दूरवर कालवा ऐकू आला. माणसांनी तिकडे नजर लावली. खांब रोवल्यागत उभी राहिली. कानोसा घेतला.

चावऱ्यांच झडा माणूसं वारणेच्या काठावर आलं होतं. कंदील दिसत होत बॅटऱ्या पेटत होत्या.

चंदरचं तळचं भुसभुसीत मातीत रुतलं. आणि पायाखालचा आधार सुटला. कलंडल्यागत वाटू लागलं. त्यानं अंधारात लांब चावऱ्याकडे पाहिलं.

एक बॅटरीचा प्रकाश डगरीवरनं खाली पळतं गेला आणि पात्रात एका ठिकाणी थांबला. कुणीतरी हाक मारली. कालवा वाढला.

मग एक पेटलेली बत्ती पळत गेली. वारणतल्या एका झऱ्याजवळ थांबली. तसं तिकडं कंदील पळालं. बॅटऱ्या पळाल्या. वारणा कोलाहलानं गरजली. निनादली. कुत्री आणि माणसं यांचा एकच गलका झाला. तसा चंदर ओरडलां. "छलां पळा" 'मत्तीर' पृष्ठ क्र. १००

## १०) निसर्गरम्य वातावरण

रंगराव बापू पाटील यांच्या कथामधून निसर्गरम्य वातावरणही चित्रित झालेले आहे. ही वातावरण निर्मिती निसर्गाच्या माध्यमातून साकार केलेली आहे.

"वाऱ्यासंगट एक जोरदार पावसाची चळक झाळ झाळ करीत आली. आणि पिकावरनं खालतं वाजत गेली. त्याबरोबर पाऊस थांबला. झाडं तेवढी ठिबकतं होती. मोठं मोठं वाऱ्याच्या झोतबरोबर सा ऽ ऽ लं करुन सांडत आणि पुन्हा थांबत. निवासानं घोंगड डोक्यावरनं काढलं झडाझडा झाडलं. कोरडं करुन पुन्हा डोक्यावर घेतलं. दारु पेलेल्या माणसागतं उंच लिंबारं वाऱ्यावर झुकांड्या खात होतं. आता एखादी दुसरी चांदणी ढगाळ आभाळातून डोकावत होती. "

"झाडं निथळून कोरडी पडली होती. एकसारखं झालेलं आभाळ आता पाक पांगलं होत. ढगांच्या विरळ पडद्यातून चांदण्या तेवत होत्या. त्याचा अंधुकसा प्रकाश आभाळातून पाझरतं होता. चांदीचा भुसा सांडावा तसा तो गळत होता. त्यानं निवासाला जरा बरं वाटलं."

'राखण' पृष्ठ क्र. ११२,१३

## ११) तारुण्याचा गरमपणा व्यक्त करणारे वातावरण

'कंदील' कथेमधील कुसुम ही कपडे धुण्यासाठी जाते. ती तारुण्यात पदार्पण केलेली युवती आहे. तिला तारुण्याचा दाह सहन करावा लागतो आहे. पण तिला तो सोसवत नाही. तिच्या मनात हाऱ्याविषयी विचार येतात. तिचे सैरभैर मन पाटील पुढील शब्दात व्यक्त करतात.

"दिवस कलतो. वारा सुटतो. उष्ण अजून वारा अंगाला भाजतो. दिवस मावळायला गेला तरी वारा गरम असतो. बेभान वहातो. एखादं कडब्याच्या पेंडीचं पान घेऊन खेळतो. ऊंच उडवितो, फरफटत नेतो किंवा एखाद पीस. निळ पीसं. अगर हिरवं .... जांभळ, पोपटी .... नारिंगी करडं ........ " 'कंदील' पृष्ठ क्र. १४६

## १२) विरोधी वातावरणातून भावदर्शन

'सरशी' कथेमधील आबा हा मुलीचा संसार सुखाचा नाही म्हणून दु:खी असतो. त्याला मुलीबद्दल खूप प्रेम आहे. तो वात्सल्याने भारावलेला आहे. पण मुलीचा संसार त्याला पाहवत नाही. तो तिला भेटायला तिच्याकडे जातो. त्यावेळी वर्णन करताना पाटील लिहितात –

"वैदाचा मळा मागं पडला. क्षितीजावरचा रंग हलकेच पुसला जाऊ लागला. फिकट प्रकाश सृष्टीभोवती लहान मुलागत रेंगाळू लागला. खडीचा पायथा दिसत होता. तिच्या पायथ्यास्नं वाडीची माणसं चालली होती. कुणी लुगडं नेसलेली दिसत होती. डोक्यावर गाठोड घेऊन पांढऱ्या धोट कापडाचा एक माणूस तिच्यापुढं लगालगा निघाला होता. त्यांना पाहून त्यांचा संसार सुखाचा असेल अस आबाला वाटलं आणि लेकीच्या आटवणीनं त्याच्या डोळ्यात पाणी उभं राहिलं." 'सरशी' पृष्ठ क्र.१५४,५५

असा दुसऱ्याचा सुखाचा संसार बघून आबांच्या मनात आपल्या लेकीच्या दु:खी संसाराचे चित्र अधिकच गडद होते.

असेच वत्सल वातावरण व्यक्त करताना पाटील लिहितात –

"आबा अंधारात ठेचकळत चालत होता. मध्येच काहीतरी हालल्यासारखं दिसायचं आणि आबाचं काळीज लक्कन हालायचं. ढगाआडून एखादे वेळी चंद्र डोकवायचा आणि दुडूदुडू रांगणाऱ्या बाळासारखा दडायचा. ...... शिर्मीच्या कुशीत असाचं एक चांद उगवलां असता. आपण नातवाला कडेखांद्यावर खेळवलं असतं.असे विचार आबाच्या मनात येत होते." 'सरशी'पृष्ठ क्र. १६३–६४

## १३) दु:खद वातावरण

मुलीचा संसार सुखाचा नाही म्हणून आबा हा दु:खी आहे. त्यामुळे घाणेरीचा खमंग वास दरवळत असतानाही आबांचे दु:ख अंधारासारखे गडद होत जाते. हे सांगताना पाटील लिहितात –

"घाणेरीचा खमंग वास दरवळत होता, उग्र वाटत होता. गार वारं येत होत. अंगाभोवती भिरभिरत होतं. आबाच्या मऊ साईगत कातडीतून घुसून हाडात शिरत होतं. अंधारागत आबाचं दु:ख गडद होऊ लागलं. घाणेरीच्या उग्र वासात झोंबू लागलं. " 'सरशी' पृष्ठ क्र. १५६

## १४) आनंदी वातावरण

पाटलांच्या काही कथामधून वातावरण निर्मिती ही आलेली आहे. लाटणे आबा हा भगवानचा मळा विकत घेण्याचे ठरवितो त्यावेळी तो खुप आनंदी असतो. तो ऐटीत मळ्यात चालत येतो. आणि त्याच्या पटक्याचा पंखा लबाक लबाक हलतो. हे सांगताना पाटील लिहितात

"अंधार वितळला. पांढऱ्या प्रकाशात वस्तू न्हाल्या. त्या पुन्हा रुप घेऊ लागल्या. थंड वारा झुळुझुळु वाहू लागला. पाखरं किलबिलू लागली. 'कुळीव' 'कुळीव' चा साद आला आणि त्यानं मळा घुमला. थंड वाऱ्यानं रामफळ शहारु लागली. आणि भंपाराच रोपटं रामफळीत बिलगल. हिरीतून पारवे फडफडले आणि त्यांनी आभाळात सूर मारला. " 'मळा' पृष्ठ क्र. ५६,५७

लाटणे आबांचा आनंद अशाप्रकारे द्विगुणीत केला आहे.

एकंदर रंगराव बापू पाटील यांच्या कथामधील वातावरण निर्मिती ही वेगवेगळ्या पातळीवर झालेली आहे. तिच्यामध्ये भिती, प्रेम, वात्सल्य, निसर्गरम्य, संमोहित, आनंदी, दु:खी, शोध घेणारे, अस्वस्थ वातावरण, भक्ती, मनोदर्शन इ. प्रकारचे भानदर्शन घडविणारे वातावरण आहे. हे पाटील यांच्या कथेचे ते खास वैशिष्टय आहे.

## ७. संवाद

नाटय व कथा लेखनामध्ये संवादाला अत्यंत महत्वपूर्ण स्थान असल्याचे आपणास दिसून येते. छोटेखानी संवाद वाचकांच्या मनाची पकड घेतात. संवाद हे आशय संपन्न असावेत. संवादाच्या बाबतीत विचार केला तर रंगराव बापू पाटील यांच्या कथालेखनातील संवाद ग्रामीण बोलीतील असल्याचे दिसून येते. त्यामध्ये सहज चटकदार मनाची पकड घेणारे, मनाचा तळ शोधणारे असे विविध संवाद दिसतात.

ग्रामीण भाषेचा वाङ्मयीन प्रवास विशद करताना डॉ. आनंद यादव यांनी म्हटले आहे

"शंकर पाटील व त्यांच्या बरोबरीच्या व काही नंतरच्या ग्रामीण साहित्यिकांच्या साहित्यात वास्तव ग्रामीण भाषेतील संवादाचा तपशिलयुक्त भरणा अधिकच होऊ लागलां. तसेच निवेदनपद्धतीतील नागर भाषेवर ग्रामीणतेचे संस्कार अधिक होऊ लागले. बघता बघता ग्रामीण बोलीच भाषीक नागर असे रुप धारण करुन वावरत आहे की काय असा भास होऊ लागला." [१०]

ग्रामीण बोलीतील संवाद पाटील यांच्या कथेत असल्याचे दिसतात ते खालीलप्रमाणे –

### १) प्रसंगनिष्ठ

'जोगवा' कथेमधील पुढील संवाद मास्तर आणि जोगतीण यांच्यातील आहे. ती सांगते आम्ही उद्या आळत्याच्या यात्रेला जाणार आहे. बरोबर माझा गिरीलाल आहे. गाडी कितीला आहे. हे मास्तरने विचारल्यानंतर ती सांगते. जोगतीणीने चालत जायचे असते.

"उद्या आळत्याला जाणार हायं."

"का ? "

"उद्या आळत्याची जत्रा. "

"गाडी कितीला ? "

"चालत जायचं असतं जुगतीणीनी. "

"बरोबर ? "

"आमचा संच हाय की. माझा गिरीलाल हाय की बरुबर. "

"हूं "

"आवरां आवर करते." 'जोगवा' पृष्ठ क्र. १८

हा संवाद सहज तितकाच भावकुल मास्तरांच्या मनातील जोगतीणीच्या आशेवर पाणी फिरवणारा. त्यांना व्याकुळ करणारा. म्हैसीची धार काढायला बसलेली किसामावशी 'पाणेव' या कथेतील संवादातून दिसते. आण्णाप्पा व ती यांच्यातील हा संवाद.

"मग असं करुया ........ "

"कस ? "

"गवळ्यालाच बुलवून आणुया. "

"आणिक "

"बघूया तरी ...... "

"त्यो हाय हुई आता ? "

"न्हाय ? "

"अं हं ...... "

"मग मी हुतो गवळी. "

"हूं ....... "

"किटली खडखडून येतो हाक मारत .......... " 'पाणेव' पृष्ठ क्र. ४४

हा संवाद आण्णाप्पाची युक्ती दर्शविणारा व म्हैशीला फसवू पाहणारा आहे.

## २) चटकदार संवाद

'ल्हावर' कथेतील पुढील संवादामधून सूचकता, प्रेमभाव, काव्यात्मकता व्यक्त झालेली आहे. हा संवाद तानाजी आणि शानी या दोघामधला आहे. ल्हावर मारण्यासाठी गेलेला तानाजी शानीबरोबर सावलीला बसतो त्यावेळी तो रोखून तिच्याकडे बघतो त्यावेळचा हा संवाद आहे.

"असं का बघताय माझ्याकडं."

"नथ बघतुय तुझ्या नाकातली."

"कवा नत बघीतली न्हायसा."

"बघितलीया. पण ह्या नतीचं मोती जरा एगळं दिसत्याती."

"खऱ्यातलं मोती हायती."  'ल्हावर' पृष्ठ क्र. ७२

पुढील संवाद 'सय' कथेतील आहे. सुली कपडे धुण्यासाठी आलेली आहे. आणि तिला बर्म्या कपडे विहिरीत धुण्यासाठी सांगतो. तेव्हाचा त्या दोघांच्यामधला संवाद असा आहे.

"काय गं ?"

"म्वाट कवाशी सुरु हाय?"

"म्वाट पडलीया चांभाराच्यात."

ती गप्प. तशीच टकाटका बघत. घाण्याच्या लाटेकडं

"मग वं? मी म्हटलं म्वाट असलं."

"हिरीत धू की."

"भ्या वाटतयं."

तिच्या मनातील खोटे भय आणि बर्म्याचे सत्यपण या संवादातून चटकदारपणे व्यक्त होते.

## ३) मनाची पकड घेणारे संवाद

पुढील संवाद 'राखणवाली' कथेतील आहे. सगुणा कथेतील नायकाला आपल्या जीवनाविषयी सांगते. ती निराधार आहे. तिला नवऱ्याने टाकलेली आहे. कौटुबिंक जीवनाविषयीची माहिती या संवादामधून व्यक्त झालेली आहे. सगुणाचे एकाकीपण मनाची पकड घेते.

"सगुणे हे खरं का ?"

"काय ? "

"तुला नवऱ्याने टाकली ते "

"व्हय। "

"करणी करुन गेले न्हाय म्हणून " 'राखणवाली' पृष्ठ क्र. १७२

'दिंडी' कथेमधला पक्या हा आईच्या भेटीसाठी आतूर झालेला आहे. तो आपल्या मित्रांना आई येणार असल्याचे सांगतो. पण मित्र 'येणार नाही' असे सांगतात. तेव्हा परत पक्या अस्वस्थ होतो. त्यावेळी आलेला हा संवाद आहे.

"पक्या लेका दिंडी येतीया "

"आमची आय येणार हाय त्यातनं. "

"हं आटावतीयां. कोण म्हणतं? "

"आजी तवा म्हटली व्हती, तुझी आई दिंडीतनं गेली. "

"हं कायतरीच। " 'दिंडी' पृष्ठ क्र. ६१,६२

पक्याचे भिरभिरणारे कातर मन असे स्पष्ट होते.

## ४) मनाचा तळ शोधणारे संवाद

पुढील 'मळा' कथेतल्या भगवान हा भावाच्या त्रासाला कंटाळून मळा विकण्यासाठी तयार झालेला आहे. त्यावेळी भगवान, इकबाल्या आणि आबा या तिघामधील स्ंवाद

“का म्हणून सोन्यासारखी जमीन इकतूस ? ”

“सुखानं इकतुय व्हय। ”

“बघ बाबा तुझं तू। ”

“मी ठरवलसचं आबा.”

“रान किती ? इकबाल्या.”

“पाच एकर हाय की । ”

“मग आबा आपून घिवूया ”, इकबाल्या.

“डोस्क भिरसाटलं काय तुझं ? ”

“का? ”

“आरं, त्यो सुखानं जिमीन इकतुया व्हयं. ” 'मळा' पृष्ठ क्र. ५४

'गब्रु' कथेमधील हांबऱ्या हा सासऱ्याला मारण्यासाठी जातो. त्यावेळी आबाला काही माणसे विचाारतात. मुलगा असे का करतो आहे. आपलं नशीब असे आबा उत्तर देतो. मनाचा तळ शोधणारे हे संवाद आहेत.

“आण्णा, काय म्हणायचय हे ? ”

“आपलं नशीब. ”

“असं का कराय लागलाय ? ”

“टग्या हुया लागलाय. ”

“पण झालं तरी काय? कुणावर गेला चालून ? ”

“सासऱ्यावर खवळलाय. त्यो दारु पेला म्हणून सासऱ्यानं ठोकलावता तेला सासरवाडीत. त्यो बदला घ्याला गेलाय. ” 'गब्रु' पृष्ठ क्र. २५,२६

मनोदर्शन घडविणारा व कथेचा पुढे नेणारा हा संवाद आहे.

## ५) सहज संवाद

रंगराव बापू पाटील हे आपल्या कथामधून सहज संवाद लेखन करतात. 'जोगवा' कथेतील मास्तर हा धोंड्या न्हाव्याकडे जोगतीणीची चौकशी करतो आहे. या संवादामधून जोगतीणी विषयीची मास्तरची ओढ सहज लक्षात येते आहे.

"धुंडीबा, जुगतीण कुठं ऱ्हाती ? "

"का ? " वस्तारा अधांतरी धरुन धोंडीबा अवघडला.

"असं इचारलसं का बाबा बरोबर हाय. मग तू न्हावी कसला? "

"तिचं एक पोरगं साळंत घालणार हुती. "

"तिला पोरगं कुठलं ? "

"आरं तिच्या जवळपासचं असलं कुणीतरी. "

"बुद्रुक टेकावर ऱ्हाती बघा. टेकावर अगदी तोंडालाच तिचं खोपाटं हाय."'जोगवा' पृष्ठक्र. १५

'सय' कथेमधील सुली ही विहिरीत कपडे धुण्यासाठी आल्यानंतर तिचा साबण विहिरीत पडतो आहे. त्यावेळी साबण काढून देण्यासाठी ती बर्म्याला सांगते आहे. त्यावेळी बर्म्या आणि सुली या दोघांच्यामधला हा संवाद आहे.

"मी काय इच्यारतीया, ध्यान हाय का तुमचं? "

"काय? "

"साबण पडला हिरीत. "

"बेस झालं। "

"काढून द्या आता."

"पडू दे. " 'सय' पृष्ठ क्र. ८८

आपणाला असे म्हणता येईल की, हे संवाद वाचत असताना तो प्रसंग नजरेसमोर आल्याशिवाय रहात नाही. तसेच आपण त्यात मग्न होतो. कथा पुढे पुढे वाचाविशी वाटते. ते संवाद व्यक्तीच्या मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न करतात. हे संवाद चटकदार आहेत. पाटलांच्या कथेतील पात्र सहज ओलतात. आणि हेच रंगराव बापू पाटील यांच्या 'ल्हावर' कथासंग्रहाचे खास वैशिष्टय आहे.

## ८) ग्रामीण जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण

इतर कथाकारांच्या कथा आणि रंगराव पाटील यांच्या कथा वाचत असताना आपणास फरक जाणवतो. कारण पाटील कथेमध्ये सूक्ष्मनिरीक्षण करतात. ग्रामीण जीवनांशी ते एकरुन झालेले आहेत जणू ग्रामीण जीवन ते पिऊन घेतात व व्यक्त करतात.

## ९) प्राणी जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण

रंगराव बापू पाटील हे प्राणी जीवनाचे चित्रण करतात. त्यामध्ये ते म्हैस, कोल्हा, गाढव यांचे चित्रण करतात. म्हैसीचे वर्णन करताना ते लिहितात –

"म्हशीनं त्वांड उघडलं, काळया नाकपुडया फेंदारुन चाटल्या. चिचुक्याच्या डाळीगत पांढऱ्या दातावरनं तिनं जीभ फिरवली." 'पाणेव' पृष्ठ क्र. ३९

या वर्णनामधून म्हैसीचे दात, नाकपुडया, जांभळी जीभ याचे वर्णन पाटील करतात.

कोल्हाचं चित्रण करताना लिहितात –

"कोल्ह आलं पाक डोंगराकडं पळत आलं. आलं ते माती हुगीतच आलं. रोज टिपणाला हुक्की देत ऊसात घुसून ऊस मोडायचं. पण आज चौगुल्याच्या भल्यामोठया वडाकडं वासाच्या रोखावर पळाय लागलं. ऊसाचं मळं तेच्या नदरत नव्हतं. नाकावर अंधारातल्या गार

वाऱ्याच्या झुळकीनं बेभान करणारा वास दरवळत येत होता ..... मध्येच ते थांबायचं. नाकपुडया फेंदरत चांगला मस्तकात भिनल असा वास घ्यायचं. थंड वारा हुंगायचं. मधीच वर बघायच. झाडातल्या चांदण्या तेच्या डोळयात उत्तरायच्या. पुन्हा खाली बघून शेपटाचा गोंडा हवेत फिरवत वळायचं. ठेचकळायचं. वासांनं आणि गारठ्यानं नाकपुड्या सुंद झालेल्या झुडपावर आदळून आणखी सुंद व्हायचा. झिणझिण्या यायच्या पण त्या कैफातच ते बेहाया धावायचं. रानवारंबी भन्नाट धावत होतं. ते तेच्याकडं येत होत. तेला धुंद करणारा मस्तकात भिननारा दर्प घेवून येत होत. ”

'कळ्स' पृष्ठ क्र. २८

वरील वर्णनामधून कोल्ह्याच्यासूक्ष्म हालचालीचे वर्णन पाटील करतात.

सर्पाचे चित्रण करताना 'मत्तीर' कथेमध्ये पाटील लिहितात –

“त्यानं पुंगी वाजवतच नाचत टोपली खाली ठेवली. आणि बोटानं टोपाण उचलून ढकललं. आत पिवळं जरद लडमं पडलं होत. ते उनानं चकाकू लागलं. वळवळू लागलं.” 'मत्तीर' पृष्ठ क्र. ९२

सापाचा रंग त्याचे वर्णन पाटीलांनी सूक्ष्म निरीक्षणामधून केले आहे.

## २) मानवी वर्तनाचे सूक्ष्म निरीक्षण

### १) लकबी

मानवी वर्तनाच्या विविध लकबी पाटील सार्थपणे टिपतात. 'ल्हावर' कथेमध्ये म्हाताऱ्याचे शब्दचित्र रेखाटताना ते लिहितात –

“मग म्हाताऱ्यानं कसनुसा चेहरा केला. त्याचा चेहरा खडबडीत वाटत होता. डोळं खोल गेलं होतं. खांद्याची ढोपरं वर येऊन मान आत बसल्यागत दिसत होती.” 'ल्हावर' पृष्ठ क्र. ६७

'ल्हावर' मारताना तानाजीचे नेम कसा धरला हे सांगताना पाटील लिहितात –

"त्यानं गलुरीच्या फाटयातून नेम धरला. एक डोळा बारीक केला. झाकला. फाटा उजव्या हातानं जाम धरला आणि रबरी पट्टया ताणल्या ....... आणखी ताणल्या ...... आणखी .. .... " 'ल्हावर' पृष्ठ क्र. ७१

## २) हालचाली

मानवी वर्तनाच्या विविध हालचालीही ते टिपतात. 'परपंच्या' कथेमध्ये पाटील लिहितात –

"बायकोनं गठळं सोडलं. बक्र होतं. तांबड्या भडक गोळ्यावर पांढर सफेद मांद्याचं गोळं चिकटलेलं लगा लगा तिनं सगळं आवरलं. " 'परपंच्या' पृष्ठ क्र. १०७

## ३) व्यक्तिविशेष

'गब्रु' कथेत हांबऱ्याच्या वर्तनाचे चित्रण करताना पाटील लिहितात –

"हांबऱ्या एकाएकी बाहेरनं आला तो कावराबावरा झाला होता. सगळया घरातनं त्यानं नजर टाकली. चिमणी पेटवली. सगळं घर धुंडाळलं. कानाकोपरा बघितला. मग माळयावर चढला. ढणढणत्या चिमणीच्या उजेडात त्यानं टकाटका पाहिलं. सांदडीला फरशी कुऱ्हाड धूळ खात पडली होती. तिच्यावर तांबीरा चढला होता. अगदी गंजून गेली होती. " 'गब्रु' पृष्ठ क्र. २०

हांबऱ्याचे वर्तन वरील वर्णनामधून आपणांस दिसते.

## ४) सवय

व्यक्तिच्या सवयीही ते टिपतात. त्यामध्ये शिप्पुरकर जंगमांची कोंबड्या पाळण्याची सवय सांगताना पाटील लिहितात –

"शिप्पुरकर सगळी जंगमं. पण सगळ्यांनी कोंबड्या पाळल्यावत्या. प्रत्येकाच्या दारात एक एक खुरुडं होतच. अंडी विकून माड्या बांधायचा शिपुरकरांचा बेत होता." 'कळस' पृष्ठ क्र. ३०

अशा मानवी वर्तनाच्या वेगवेगळया लकबी, हालचाली, सवय इ. आपल्या लेखनीद्वारे सार्थपणे टिपतात हे पाटलांचे कथेचे वैशिष्टय आहे.

## ३) स्त्रीचे निरीक्षण

स्त्री वर्णन पाटील बारकाईने करतात. ते 'सय' कथेत सुलीचे वर्णन करताना लिहितात

"टिकल्याचं पातळ तिनं पदर सावरला. नाजूक पावलांनी छपराच्या दाराशी गेली."

बायजीचे वर्णन करताना ते लिहितात –

"हिरवं लुगडं ..... तांबडी चोळी ...... रेशमी जांभळी काकणं काजळ फासलेलं डोळं, कानात बुगडी, चोळीच्या पुष्ट उंचवठयावरनं रुळणारी बोरमाळ आणि तिची ती भेदक नजर." 'मळणी' पृष्ठ क्र. १३०

अशा कितीतरी वर्णनामधून पाटलांच्या लेखणीतून सुक्ष्म स्त्रीचित्रण झालेले आहे. सुक्ष्म निरीक्षणमधूनच त्यांच्या 'पाणेव', 'दिंडी', 'कळस' इ. कथा साकार झालेल्या आहेत.

## ४) निसर्ग निरीक्षण

शेती झाडे–झुडपे, डोंगरदऱ्या, ओढे, मंदिरे, नाले, विहीरी, डोहं, पाणंद, आकाश, माती, पशूपक्षी, चंद्र सूर्य इ. वर्णनही पाटील करतात.

ते लिहितात –

"आभाळात चांदण्या फुलल्या. काळोखाच्या जबड्यात चराचर अदृश्य झालं हवा थंड झाली. गारठा पडलां. झाडांच्या पानांच बर्फ झालं. गारठ्याचं भूत झाडांच्या मानगुठीवर बसलं. वारा घुबडागत घोघावू लागलां." मळणी' पृष्ठ क्र. १२५

## ५) निसर्गचित्रण

रंगराव बापू पाटील यांच्या लेखनानूभूतीचा परिसर सातारा–सांगली जिल्ह्याचा आहे. वारणेच्या खोऱ्याचा उल्लेख त्यांच्याही कथेतून येतो. डोंगरनद्या, रान, माळरान आणि विविध प्रकारच्या झाडाझुडपांची, पक्ष्यांची वर्णने त्यांच्या कथेतून येतात. तसेच शेतांची, आकाशाची, चांदण्याची, चंद्र सूर्य याची वर्णनेही येतात.

'मत्तीर' या कथेत बायनेला शोधायला निघालेली माणसे तिच्या नवऱ्याबरोबर तिला शोधू लागली. शोधता शोधता रात्र झाली. लेखक लिहीतो.

"काळामिट्ट अंधार पसरला, वारणेच्या रुंद खोऱ्यात कोरड्या पात्रात निळ्या काळया अंधाराचा डोह पसरला. खोल आणि अथांग कुजाळात पाणकोंबडं चिडीचूप झालं. शेवऱ्या निरगुड्या अंधारात विसावल्या." 'मत्तीर' पृष्ठ क्र. ९८

पाटलांच्या या निसर्ग वर्णनेमुळेच सगळा परिसर सजग होऊन उठतोच. पण तिला शोधणाऱ्या मनाची भावावत्साही प्रकट होऊन जाते. हे परिसरातल्या वातावरणाशी एकरुप झाल्यामुळे शक्य झाले आहे.

'सरशी' सारख्या कथेतील पावसाळी वातावरणही अतिशय प्रत्ययकारी आणि संबंध प्रदेश उभे करणारे असेच आहेत.

डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात –

"कृषक जीवनाची चित्रणेही रंगराव बापू पाटील यांच्या कथेतून विपूल येतात. शेतीत रमलेल्या मनाचीच ही चित्रणे पाटलांना उभी करावयाची असतात." ११

'पाणेव' या कथेतून ग्रामीण परिसरातील माणसाचे सुक्ष्मनिरीक्षणातून ही कथा घडत गेल्याचे दिसून येते. या दृष्टीने त्यांच्या 'गब्रु', 'सय', 'मळा' इ. कथामधील पीरसर आणि त्या परिसरातील माणसांचे रंगगंध त्यांनी आपल्या कथेतून ठिपलेली आहेत.

रंगराव बापू पाटील यांनी निसर्ग, घाणेरी, तरवड, पांगिरा, केकताड, शेवरी, बाभळी, कारंजी, पाणकणसं, चिंच, आंबा इ. झाडेझुडपे तर व्हला, ल्हावर, धनछड्या, रावे, कोकिळा, पारवे, रानचिमण्या इ. पक्षी, डोंगर, माळरान, ओघळ इ. द्वारे त्यांच्या कथेतील परिसर जसा अविष्कृत करतात तसेच त्या परिसरातील विविध प्रथा रीतीरिवाज वदंता, लोकसमज. लोकमानस यांच्यातूनही तो अविष्कृत करतात.

पाटलांच्या कथेमध्ये कोल्हापूर, पन्हाळा, बुद्रुक टेकडांचा परिसर, आळते गांव, राधानगरी, कामेरीचा परिसर, पुणे–बेंगलोर रोड, जंगमाची शिपुरी, चौगुल्याचा वड, तुजारपूर, वेदाता माळ, ऐतवडे, मालवाडी, चावरे इ. परिसरातील निसर्ग वर्णन आल्याचे दिसते. आपल्या नजरेसमोर ते जसाच्या तसा निसर्ग आल्याचे दिसते. हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. वातावरणनिर्मितीसाठीही त्यांच्या कथामधून निसर्ग येतो.

रंगराव बापू पाटील यांच्या कथांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या कथामधील निसर्ग वर्णन हे नागर भाषेत येत नाही तर संवादाबरोबरच ते ग्रामीण भाषेतून व्यक्त करतात. उदाहरणादाखल आपणास खालील कथा पाहता येईल.

'कळस' कथेत पाटील लिहितात –

"वर्त जंगमाची शिपुरी टेकड्यांच्या पायथ्याला शिदुबाजवळच्या झाडात लपलीवती. खालतं कांबीरी पुना–बेंगलोर रोडला घासून सुस्त झोपलेली ऐसपैस पसरलेली. शिपुरी, कांबीरीत दिवं लुकलुकतं होतं. ...... कोल्ह चांदण्या डोळ्यात साठवून येड्यागत पळत होतं. वासनांच जिभ चाटत होतं. पिसं लागल्यागतं पळतं होतं. जंगमं उदयाचा बेत आखून डाराडूर झोपलीवती. कांबीरकर कुऱ्हाडी भालं उशाला ठेवून आकुडबाज मिशासकट घोरत होतं. रोडवरनं ट्रक रॉय रॉय रॉय करत दिव्याचं डोळ मिचकावत तुफान वेगान भरधाव पळत होतं. तर कोल्हं आपल्या नादात इप्रीत धावत होतं." 'कळस' पृष्ठ क्र. २८,२९

'मळा' सारख्या कथेत पाटील लिहितात –

"अंधार वितळला पांढऱ्या प्रकाशात वस्तू न्हाल्या. त्या पुन्हा रुप घेऊ लागल्या. थंड वारा झुळूझुळू वाहू लागलां. पाखरं किलबिलू लागली. 'कुळीव', 'कुळीव' चा साद आला आणि त्यानं मळां घुमलां. थंड वाऱ्यानं रामफळ शहारु लागली. आणि भंपाराचं रोपटं रामफळीला बिलगलं. हिरीतून पारवे फडफडले आणि त्यांनी आभाळात सूर मारला." 'मळा' पृष्ठ क्र. ५६–५७

'सय' कथेमधील वर्णनही पाहण्यासारखे आहे. –

"लांब पाणी झुळझुळत आल्यासारखं जमीनीवरुन वाहात असलेलं पण माग हरणं नव्हती. कुणीच नव्हतं. आता ते पाणी नव्हतं. पेटलेल्या पलीकडे थरथरावं तशी थरथर. भाताच्या पोकळ नळीवर कर्दळी टणटणावी तशी डोंगराची टणटण, असाची रानं, केळीच्या बागा, मोहरलेली आंब्याची पिवळासर झाडं सकळयाचीच थरथर, टणटण ती थरथरणारी वाफ उसळत होती." 'सय' पृष्ठ क्र. ७८

या शिवाय साप, शेती, पाऊस, आभाळ, चांदण, वारा, यांचेही वर्णन केल्याचे दिसते.

ही वर्णने वाचत असताना तो परिसर आपल्या नजरेसमोर उभा राहील्याशिवाय रहात नाही. तो निसर्ग सहजपणे आपल्या नजरेसमोर उभा राहतो.

पाटलांच्या प्रत्येक कथेतून निसर्ग हा येतोच पण तो रेखीवपणे येतो. कथेचा आशय व्यक्त करण्यासाठी तो मोजक्या शब्दामधून अविष्कृत होतो.

एकदंर निसर्गवर्णनाच्या बाबतीत असे म्हणता येईल की, निसर्गाचे वर्णन करायचे म्हणून निसर्ग चित्रित होत नाही. तर कथेच्या आशयाच्या अभिव्यक्तिच्या माध्यमातून हा निसर्ग ओघाने कथेत डोकावतो. आणि त्यामुळे कथा रंगतदार बनते. मग त्यामध्ये विविध प्रकारची झाडे, प्राणी, नद्या, विहीर, वेगवेगळा परिसर हा ओघानेच चित्रित होतो. आणि पाटलांची कथा साकार होते. आणि ती फुलत राहते. कुठेही निसर्ग वर्णनामध्ये पाल्हाळिकता आलेली नाही तर मोजक्या आणि प्रसन्न शब्दकथेच्या माध्यतातून त्यांच्या कथेमधला निसर्ग फुलत राहतो.

पाटलांच्या निसर्ग वर्णनाच्या बाबतीत डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात –

"त्यांच्या लेखनाभुतिचा परिसर सांगली, सातारा जिल्हाचा आहे. वारणेच्या खोऱ्याचा उल्लेख त्याच्याही कथेतून येतो. डोंगर, नद्या, रानं, माळरान, आणि विविध प्रकारच्या झाडाझुडपांनी, पक्ष्यांची वर्णने त्यांच्या कथेतून येतात. निसर्ग वर्णनामुळे सगळा परिसर सजग होऊन उठतोच पण तिला शोधणाऱ्या मनाची भावस्थाही प्रकट होऊन जाते. हे परिसरातल्या वातावरणाशी असलेले एकरुपत्व रंगराव पाटील यांच्या कथेत समृद्ध करुन जाते." [१२]

एकंदर 'ल्हावर' मधील निसर्ग वर्णनाच्या बाबतीत असे म्हणता येईल की, कोल्हापूर पन्हाळा, बुद्रुक टेकचा परिसर, आळते गांव, कामेरी, शिपुरी, तुजारपूर, पुणे–बंगलोर रोड, चावरे, ऐतवडे मालवाडी इ. परिसरापलीकडे निसर्गवर्णन जात नाही. ज्या मातीत त्यांचा पिंड पोसलेला आहे त्याच मातीतील निसर्ग वर्णने ते करतात. कारण तो निसर्ग त्यांनी जवळून पाहिलेला आहे. त्यांच्या अनुभवातून तो निसर्ग साकार होतो. त्यांच्या निसर्गवर्णनाचे वैशिष्टय म्हणजे संवादाबरोबरच ते ग्रामीण बोलीत लिहितात.

'ल्हावर' कथासंग्रहामधील १८ कथामधून थोडाना थोडा निसर्ग हा येतोच आणि हेच त्यांच्या 'ल्हावर' चे वैशिष्ट्य आहे.

म. ना. अदवंत म्हणतात –

"रंगराव पाटील यांच्या 'ल्हावर' मधील कथांनी मराठी ग्रामीण कथा हिरवीगारं ठेवण्याचे ऐतिहासिक कार्य केले आहे. कृतिमतेकडे वळलेल्या किस्सेबाज ग्रामीण कथा वाचून कंटाळलेल्या रसिकांना 'ल्हावर' हा कथासंग्रह निश्चितच दिलासा देईल." [१३]

म्हणून वाटते पाटलांच्या कथेतला निसर्ग त्यांच्या कथेचा अविभाज्य भाग आहे. तो वेगळा करता येत नाही. रक्ताला लाल रंग जितक्या सहजतेने येतो तितक्या सहजतेने रंगराव पाटील यांच्या कथांना निसर्गरंग लाभतात.

## १०) भाषाशैली

भाषाशैलीच्या बाबतीत रंगराव बापू पाटील यांच्या 'ल्हावर' या कथासंग्रहाचा विचार करताना असे वाटते की, जिवंत आणि ग्रामीणतेशी नाते सांगणारी अशी त्यांची भाषाशैली आहे. आपल्या समर्थ भाषाशैलीद्वारे जो प्रसंग रेखाटायचा आहे त्याचे प्रत्ययकारी वर्णन ते करतात. 'मळणी' ही भूतबाधेच्या कल्पनेवर आधारित असलेली कथा या दृष्टीने आवर्जुन वाचण्यासारखी आहे. पाटील लिहितात –

"हा मंजी माघारी जाताना तू तिला भूलून गेला असतास तर मात्र तिनं इंगा दावला असता." आणि काय घडलं असतं या कल्पनेनं संभाच्या अंगावर काटा उभा राहिला. त्यानं भिऊन घोंगड सागतं तोंड मुस्कटून घेतलं. आता त्याला बायजी स्पष्ट दिसू लागली. हिरवं लुगडं .. ... तांबडी चोळी ..... रेशमी काकणं, काजळ फासलेलं डोळ कानात बुगडी, चोळीच्या त्या पुष्ट उंचवठ्यावरुन रुळणारी बोरमाळ आणि तिची ती भेदक नजर ....... " 'मळणी' पृष्ठ क्र. १३२

## १) ग्रामीण भाषाशैली

पाटलांच्या कथेची भाषाशैली ग्रामीण भाषाशैली आहे. पाटील निवेदन आणि वर्णने ग्रामीण बोलीतच लिहितात. व्यक्तीप्रसंग सुधा ते ग्रामीण भाषेतच लिहितात. हे त्याच्या लेखनीचे सामर्थ्य आहे. पुढील वर्णन वाचल्यानंतर हे लक्षात येईल.

"म्हशीनं त्वांड उघडलं. काळ्या नाकपुड्या फेंदारुन तिनं जांभळी जभ नाकात घातली. दोन्ही नाकपुड्या चाटल्या. चिचुक्याच्या डाळीगतं पांढऱ्या दातावरनं तिनं जिभं फिरविली. किसाचं हात भरुन आलं होतं. बोट दुखत होती. रट्टयाला कड आला होता. बसून बसून पेकाट अवघडलं होतं. बोटं दुखत होती. मांड्या भरुन आल्या होत्या." 'पाणेव' पृष्ठ क्र. ३९

## २) ग्रामीण शब्दकला

पाटलांच्या कथेमधून ग्रामीण शब्दकला व्यक्त होते. त्याबरोबरच ग्रामीण बोलाची रुपेही व्यक्त होतात. उदा. त्यो नादावलावता, जेवण ग्वाड लागत न्हवतं, गुरीपान, काळ्याभोर केसाचं फुगं, कायच्या कायच, मंजी, हेला इ. शब्दकलेची रुपे आहेत.

पाटील काही विशेषणेही देतात. ती म्हणजे मळून ढॅन, पांढरा धोटं, काळीढूसं, हिरव लूसं, तांबडं, भोरी इ. क्रियापदाची काही खास रुपेही त्यांच्या कथेत येतात. चाललंवतं, पसरलवतं, बसलीवती, फुलल्यावत्या, दिलीसा, केलसां, जातूस, खातूस, करतूस, चमाकतूया, ठसकारतूय इ.

या व्यतिरिक्त स्थानिक बोलीतील ग्रामीण शब्दांचा वापरही त्यांनी अत्यंत कौशल्याने केला आहे. उदा. इग्रुस, पाणेव, वाडूळ, सौंदडीला, नाक्षार, परपंच्या किटून ढॅन, मळणी, येरवाळी येस्तोर इ.

## ३) वाक्यरचना

पाटील आपल्या कथेतून विशिष्ट वाक्यरचना करताना दिसतात. ती वाक्ये मनाचा ठाव घेतात. उदा.

१. 'अंधार ढू पसरला होता.'

२. 'पिवळं धमक ऊन, पिवळया नागिणीसारखं.'

३. 'छप्पर घोरत होतं.'

४. 'दिवस मावळून चांगला किनीट पडायचा वकुत झालावतां.'

५. 'काळोखाच्या फणीवरनं एक तांबडा मणी भगवानच्या छपराकडं तरंगत येऊ लागला.'

६. 'हे सोनं दुसऱ्याच्या मालकीचं होत होतं.'

७. 'लई दिच्या धरनं ल्हावराचं कोरड्यास खावं वाटतयं ....... '

## ४) भाषेचे वर्णन सामर्थ्य

रंगराव बापू पाटील यांचे वर्णन सामर्थ्य पाहण्यासारखे आहे. आपल्या भाषाशैलीद्वारे ते वर्णन करताना तो प्रसंग, ती व्यक्तिरेखा, तो निसर्ग, ते वातावरण, ती घटना जशीच्यातशी आपल्यासमोर उभी करतात हे त्याचे वर्णन सामर्थ्य आहे. वर्णन सामर्थ्याची उदाहरणे आपणास पुढीलप्रमाणे दिसतात.

१. "किसामावशी धारचीं भांडी घेऊन अंगणात आली. आणि तिनं आभाळांत बघिता. काळयाभोरं लोकरीचा ढीग पिंजून पडला होता. त्यातचं सोनेरी भिंगरी घरगंळत खाली चालली होती. ऊन पळत होतं. ढग पळत होते." 'पाणेव' पृष्ठ क्र. ३७

२. "अं.... अं..... करत तो भिताडाला टेकून बसला. सुकलेल्या खोल गालफडावरचं पांढर खुट त्यानं ओचकारलं. बुबुळ खोल गेली होती. त्या बुबुळानं त्यानं म्हशीची विसविशीत तांबड–भोरी कास पाहिली. आणि हाताची गोफणमिठी डोळ्यावर धरुन तो खॉक खॉक करत बसला." 'पाणेव' पृष्ठ क्र. ३९

३. "पूर्व क्षितिजावर, तळातनं कुणीतरी चेंडू उडवावा तसा, लाल गोळा डोंगरावर सरकू लागलां. वर आला. भिंगरीगत फिरु लागलां. कधी उलटा, कधी सुलटा. निळं क्षितीज पाण्यात रंग सांडावा तसा झगमगू लागलं." 'मळा' पृष्ठ क्र. ५७

४. "सुलीनं विहिरीच्या डोळ्यात पाहिलं आणि काठावरती कर्दळीसारखी काळी माती आत घसरली. बाद बाद माती आत पडली. आणि डोह थरथरला. पाण्याची पापणी लवली." 'सय' पृष्ठ क्र. ७८

५. "ए बाबा नाग काढ. 'त्यानं पुंगी वाजवतच नाचत टोपली खाली ठेवली. आणि बोटानं टोपाण उचलून ढकललं. आत पिवळ जरद लडमं पडलं होतं. ते ऊनान चकाकू लागलं. वळवळू लागलं. गारुड्यानं पुंगी त्याच्याजवळ फुंकली आणि दोन बोटानं त्याला डिवचलं.'" 'मत्तीर' पृष्ठ क्र. ९२

६. "तसं तिकडं कंदील पळालं. बॅटऱ्या पळाल्या. वारणा कोलाहलानं गरजली. निनादली. कुत्री आणि माणसं यांचा एकच गलका झाला." 'मत्तीर' पृष्ठ क्र. १००

७. "आश्विनाचं कोवळं ऊन पसरलं होत पिवळया काचेतून पहावं तस दिसतं होत. लांब माळावरच्या कटणावर पोरं हुदुडया मारीत होती. पिकात जाणारी म्हसरं आडवीत होती. त्याच्या पलीकडचा डोंगर जवळ वाटत होता. आणि त्यावर मेंढराचे काळे ठिपके संथपणे चरत होते" 'राखणवाली' पृष्ठ क्र. १७०

## ५) नादमाधुर्ययुक्त शब्दकला

रंगराव बापू पाटील यांच्या कथेचे वैशिष्ट्य म्हणजे ते आपल्या भाषाशैलीच्या द्वारे नादमयता व्यक्त करतात. तसेच ते नादानुकारी शब्दांचा वापर करतात. हेही शैलीच्या दृष्टीने बघण्यासारखे आहे. ते खालील काही शब्द वापरतात.

झुळझुळ, कलाकलाट फिदीफिदी, टकाटका, सपासपा, खर्रकन, घळाघळा इ. शब्दांच्या द्वारे ते विविध नादमाधुर्य व्यक्त करतात. खालील काही वर्णनामधून आपणास हे नादमाधुर्य सांगता येईल.

१. " छिऽशऽऽ छिऽ शऽऽ छिऽ शऽऽ बराच वेळ आवाज येत राहीला." गल्लीची कुत्री मागं लागली. " भॉ, भॉ, भॉ, भॉ, भा "

"भले नागोबा, भले नागोबा " आणि पुंगी वाजू लागली. अॅऽऽ गऽऽ इगऽ ऽ ग ऽऽ ती टापल्याभोवती नाचू लागला. कमरेत वाकून लेझीम खेळल्यागत करु लागला."

"आऊच काळीज धडधडू लागलं पोरगं रडायचं राहिना – अऽऽ गॅऽऽ "

"सर्व शांत होतं बत्ती प्रकाशात होती तिचा सूऽऽ असा आवाज येत होता." 'मत्तीर' पृष्ठ क्र.९४,९३,९६,१०१

२. “ती भानावर येते समोरुन एक मेंढराचा कळप ढेकळातून ‘फुर् ऽ ऽ फुस’ करीत जातो. बैलांचे चाळ चिमण्या कलकलाच्या तसे बोलतात.” ‘कंदील’ पृष्ठ क्र. १४७

३. दिंडी ऽ ऽ म्हणून सोनाप्पा किंचाळला आणि विठोबाच्या देवळातला पखवाज घुमत लहरत आला. टाळांनी वातावरण निनादून टाकलं. गजर उसळतं देऊळ घुमलं विठोबा रुकमाई .... विठोबा रुकमाई .... विठोबा ..... विठोबा ..... विठोबा ...... बोला ऽ ऽ पुडलीं ऽ ऽ श्री ऽ ऽ ऽ ऽ ज्ञानदे ऽ ऽ व ऽ ऽ तुका ऽ ऽ राम ऽ ऽ श्री ऽ ऽ गुरुदेव दत्त. विठोबा रुकमाई ”

‘दिंडी’ पृष्ठ क्र. ५८

४. “अशीच किर्र किर्र भेसूर दूपार. शांत मरगळलेली पाखरं सावलीत पेंगुळलेली.” ‘सय’ पृष्ठ क्र.८४

५. “काठावर वेळूच उंच बॅट खडं होत आणि वाऱ्यांन ते सू ऽ ऽ वाजत होत. एक वाळकं पान वाऱ्यावर थिर्रर्र ऽ ऽ करत होत. त्यानं परडीचं सामान पायरीवर ठेवलं आणि भिर्रर्र ऽ ऽ करुन एक पाखरु हुंबरावरुन हवेत बाणसारखं घुसलं. ” ‘मव्व’ पृष्ठ क्र. ४७

## ६) निसर्ग प्रतिमा संपन्न भाषा

निसर्ग प्रतिमांच्या वापरामुळे त्यांच्या भाषेचे सामर्थ्य वाढते. रंगराव बापू पाटील यांच्या कथेतून हेच प्रत्ययाला येते. ते लिहितात.

१. “अंधार ढू पसरला होता.”

“काळोखाच्या फणीवरुन एक तांबडा मणी भगवानच्या छप्पराकडं तरंगत येऊ लागला. ”

‘मव्व’ पृष्ठ क्र. ४७

२. “कोवळ्या गवतागत लुसलुसीत असलेलं सकाळचं ऊनं नाहीस होऊन आता काटेरी बाभळीगत चांगलं निबर होऊ लागलं होत.” ‘ल्हावर’ पृष्ठ क्र. ९१

३. "पिवळं धम्मक ऊनं. पिवळ्या जरद नागिणीसारखं जमिनीतून वाफा निघत होत्या. झळा वाहत होत्या. नागिणीनं जिभळया चाटाव्या तशा झळा दिसत होत्या. ऊन फडी काढून थेट उभ होतं. वावरं आणि पांढर इस्त्यागत तापली होती. दुपारच्या फडीवर एखादं वावटळ उमटायचं आणि तांबडया भडक धुळीचं शिखर गगनाला भिडायचं. पाला, पत्रं, चिरगुटं, पिसं वर फिरत जायची. तरंगायची. रामदुय रामदुयची गुणगुणयाची. 'मत्तीर' पृष्ठ क्र. ९१

४. "कंबारबर जुंधळ्याचा जयसिंग डोक्यावर एक झन भारा घेऊन भाऱ्याचा झोक्यावर पावलं टाकीत येत होता. दांडगी अंगलट असलेला गडी जुंधळ्यातल्या नागमोडी वाटेनं वर येत होता. भाऱ्याचा आणि जुंधळयाचा आवज वळवाच्या टप्पोऱ्या सरीसारखा येत होता. ”

'परपंच्या' पृष्ठ क्र. १०२

५. "काळामिट्ट अंधार पडला. आभाळ अंधारुन आलं. ढग लोंबकळू लागले. थंड वारा सुटलां. रक्त गोठवू लागलां. झाडं तपश्चर्येला बसल्यागत होती. ती अंगात आल्यागत हालू लागली. सळसळू लागली. आणि मग पाऊस सुरु झाला. बारीक बुरुगाट पडू लागलं. अंधारात काही दिसत नव्हतं. ” 'सरशी' पृष्ठ क्र. १६३

६. "रात्र किर्रर झाली होती. अंधार काळामिट्ट पडला होता. अंधाराच घोंगड पांघरुन सृष्टी निवांत गुडूप झोपली होती. रात्रीच्या झाडाला फांद्या फुटू लागल्या होत्या. आणि त्या गारठ्याची विलक्षण धुंदी त्या आसमंतात चढू लागली होती. ” 'मळणी' पृष्ठ क्र. १२३

७. "पांढरा फटफटीत चेहरा. कपाळावर सुपारीएवढं तांबड भडक कुक्कू. आता लेल्यागत. पदराचं हिरवं टोपाण पाठीवर पडलेलं. काळाभोर अंबाडा. त्यातून एक विळ्याच्या पाल्यागत शेपटाबाहेर आलेला काजळ फासलेलं डोळं रायबोराएवढं ” 'मत्तीर' पृष्ठ क्र. ९९

डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात –

"रंगराव बापू पाटील यांच्या कथेतील भाषा आणि शैली यांचे स्वरुप पाहता, शंकर पाटलांच्यानंतर भाषेचे मिश्रण करुन अभिव्यक्ती करणारे ग्रामीण जीवनाचे आणि जाणीवांचे नेमक्या आणि नेटक्या शब्दात प्रकटीकरण करणारे ते एक समर्थ ग्रामीण कथाकार आहेत." १४

रंगराव बापू पाटील अर्थाच्यासाठी वाक्यप्रचाराचाही वापर करतात. उदा. डोळ्याच्या कडा ओलावणे, पायातनं वारं जाणे, अश्रू सांडणे, अंगात बाचं रगात असणे, डोळ्यासमोर काजवे चमकणे, दमगीर होणे, रक्त आटणे, डोळे किलकिलं करणे, हेलपाटे घालणे, टाळा पसरणे, हबकी बसणे, डोकं फिरणे, पदर सावरणे, विशविशीत वाटणे, टकाटका बघणे, वेफिकीर होणे, डोळ्यात पाहणे, चाळा करणे, मरगळ खाणे इ.

## ७) शब्दचित्र संपन्नभाषा

पाटलांच्या शैलीने आणखी एक वैशिष्टय म्हणजे ते आपल्या शैलीतून हुबेहुब शब्दचित्र रेखाटतात.

### १) सोनाप्पाच्या आईचे शब्दचित्र

"सोनाप्पाच्या घरातून त्याची आई दातवट खात पांगिऱ्याकडे धावते. तिचा अवतार लावसटीसारखा कराकरा दाढा खाणारी केसाचं पांढरं टोपलं डोळ्यावर, वाकाच्या बटासारखं ठार वाकलेली." 'दिंडी' पृष्ठ क्र. ५९

### २) पांगिऱ्याचे शब्दचित्र

"वाऱ्याने पांगिरा शहारतो. गदगदतो. तांबड्या फुलाचं डोळं असमंत न्याहाळतात. रस्ता ..... घर ...... माणसं ..... सोनाप्पा ..... म्हातारी ..... पोरं आणि पांगिऱ्याचा बुंधा ....."

'दिंडी' पृष्ठ क्र. ६०

### ३) वाऱ्याचे शब्दचित्र

"दिवस मावळायला गेला तरी वारा गरम असतो. बेभान वहात असतो. एखादं कडब्याच्या पेंडीच पान घेऊल खेळतो उंच उडवितो. फटपटत नेतो किंवा एखादं पीस. तांबूस पीस. निळं पीस. अगर हिरवं .... जांभळं .. पोपटी ...... नारिंगी करडं ...... " 'कंदील' पृष्ठ क्र. १४६

### ८) स्त्रीवर्णन सामर्थ्य संपन्न भाषा

आपल्या उत्कृष्ट भाषाशैलीद्वारे पाटील स्त्रीरुप वर्णनही अत्यंत सार्थशब्दात करतात. उदा.

१. "तिचं रुप अधिक देखणं दिसत होतं. तिच्या बांगड्या सारख्या बोलत होत्या. नाकातली नथ लुडूलुडू हालत होती. " 'ल्हावर' पृष्ठ क्र. ७०

२. "हिरव्या लुगड्यानं तिचं गोरपण उजळलेलं. केसाचं काळभोर फुगं पदरातनं बाहेर आलेलं डोळ्यात काजळ. " 'जोगवा' पृष्ठ क्र. ९

३. "तिची कांती भुईमुगाच्या कोवळया शेंगेगत गोरीपान दिसत होती. भुईमुगाची शेंग टच्च भरावी तशी ही भरली होती. कर्दळीचा काळारंग तिच्या डोळ्यात साठलां होता. आणि पदरातून केसाचा भरगच्च आंबाडा दिसून येत होता." 'राखणवाली' पृष्ठ क्र. १७१

### ९) भाषेतील सुचकता

रंगराव बापू पाटील यांच्या कथेमधून अनेक ठिकाणी सूचकता व्यक्त होते आहे. ते आपल्या लेखनाद्वारे खूप काही सांगून जातात. आणि सूचक वर्णन करतात. उदाहरण म्हणून आपणांस खालीलप्रमाणे पाहता येईल.

१. "तिला वाटलं, मागल्यावानी कायतरी मनात आलं असलं. तवागत तिनं तडफड केली. अस व का? अस तवाच्यागत आत्ताबी म्हणाली. तवा मिशीत हसू होतं. पण आता डोळं लालगलींद झालं हुतं .... आत्तीच्या हातात इळा हुतां. " 'कळस' पृष्ठ क्र. ३४

२. "अगं, तू शिकार केलीयास. तुझीच ही शिकार हाय." 'ल्हावर' पृष्ठ क्र. ७४

३. "ती बाईमाणूस. आपण आपण तिथं बसावं कसं? ती वडतीया मस्त .... एकदां अद्दल न्हाय घडली? ...... सोकला कोला ....... " 'सय' पृष्ठ क्र. ८१

४. "दुसरं कराय इल त्ये झालं खरं, पर..... जोडवं पडूनी म्हणत्यात ..... " 'मळणी' पृष्ठ क्र. १२६

५. "लांब शेंडाच्या आडाला दडून बसलेला हरिबा उगाणे स्वतःशीच पुटपुटला. मुलाणी घावलं वाटतं बेलदाराला ..... " 'बरकत' पृष्ठ क्र. १३७

६. "एक उंच केळ .... सुपासारख्या रुंद हिरव्यागर्द पानांची ..... एक भला घड काखेला घेऊन उभी राहीलेली. थोडीशी वाकलेली. गर्भारशी स्त्री." 'कंदील' पृष्ठ क्र. १४९

## १०) अलंकारीक भाषाशैली

रंगराव बापू पाटलांच्या लेखनाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे त्यांची अलंकारीक भाषा आहे. ते विविध अलंकाराचा वापर आपल्या लेखनातून करताना दिसतात. त्याची उदाहरणे आपणास खालीलप्रमाणे सांगता येतील.

### रुपक

१. "जुंधळा वाऱ्यावर झेपा टाकू लागलां. खळाळल्यागत त्याचा आवाज साऱ्या शिवारात घुमु लागला ..... "

२. "तो त्या केळकोंबाकडे डोळे लावून माग जिवंत ताज्या रक्ताऱ्या आंबा."

३. "ईश्वरा पाडळकर गावातील आग. "

४. "दिवसाची भिंगरी डोंगरापल्याडच्या सागरात बुडली."

५. "बोडकी थाट आपल्या माना सोन्याच्या पुरात खुपसून बसली होती."

६. "अंधारात घोंगड पांघरुन सृष्टी निवांत गुडूप झोपली होती. "

७. "रात्रीच्या झाडाला थंडीच्या फांद्या फुटू लागल्या होत्या."

८. "डोंगराच्या पानातनं सुर्याचं फूल अलगद वर सरकू लागलं."

## उपमा

१. "एकदम दोनचार काजवं चमकाव तसं अंधारवडात हिरव्या काकणाचं दोनतीनं तुकडं चमकलं."

२. "खुंटींवर काळ्या नागिणीसारखा हंटर वेटोळे घालून लोंमकळत होता. "

३. "रीडीगत टमम फुगलेला एक काळा ढग तरंगत होता."

४. "बन्शी मक्यागत मोटं पांढरधोट दात."

५. "डोळ्यांची बैदुलागत बुबुळ फिरवीत त्यानं धावच्या फुपाटयात पिवळी गुळणी टाकली."

६. "त्या आवाजानं तिथल्या रानातलं एक ल्हावरही उठलं ते तांबूस ल्हावर चेंडू फेकल्यागत लांब जाऊन गडप झालं."

७. "रानात एकदम केळीचा कोंब तरारुन यावा जशी ती दिसली."

८. "कॉफीच्या वडीगत असलेली जमीन भुईमुगाच्या पसरट जाळ्यांनी झाकून गेली होती."

९. "लहान मूलाला आवळून धरावं तसं ते मऊमऊ लागलं."

१०. "डोळं विहीरीगत समडम भरत होते."

११. "न्हालेल्या पोरीच्या केसागत शेपटाचा गोंडा."

१२. "सरदार पाटलांच्या हिरव्या रेशमी पटक्यासारखं शेवाळ पसरलेलं."

१३. "तसलीच काकणं पाचूसारखी."

१४. "कणकीगत लुयलुशीत."

१५. "उनाला अजगर पडवा तसा वाडा पडला होता."

१६. "फुलबाज्याच्या ठिणग्या इस्कटून पडाव्या तसं दिवं पेटलेलं."

१७. "दारु पेलेल्या माणसागत उंच लिंबार वाऱ्यावर झुकांड्या खात होतं."

१८. "लांबचं डोंगर हत्तीच्या तांडा चालल्यागत वाटत होतं."

१९. "एखाद्या हत्तीवर बसल्यासारखा निवास त्या ढिगावर बसला होता."

२०. "चहाच्या भुकटीगत जमीन चांगली कसून तयार केली होती."

२१. “काळ्या भुग्यागत रात पसरली होती.”

२२. “मुंडकी छाटलेलं दोन दोन पकाचं असंख्य कोंबड पडावं तसं त्याचं रान दिसत होतं.”

२३. “पाक इंगळागत पोरगं भाजाय लागलं.”

२४. “दत्तु शेळक्या त्या वाटेवरनं बैदुलागत घरंगळत चालला होता.”

२५. “हत्तीच्या रंगासारखा ढग आभाळातून गुबगुबीत सशागत धावत होतं.”

२६. “ढगाआडून एखादेवेळी चंद्र डोकावायचा आणि दुडूदुडू रांगणाऱ्या बाळासारखा दडायचा.”

रंगराव बापू पाटील यांच्या कथेमध्ये वरील भाषेची वैशिष्टये दिसून येतात. त्याशिवायही त्यांच्या कथेमधून प्रादेशिकताही व्यक्त होते आहे.

## ११) भाषेतील प्रादेशिक छटा

प्रादेशिक जीवन वर्णनात त्या त्या प्रादेशातील व्यक्तींच्या भाषेची काही वैशिष्टये असतात. त्या छटा पाटलांच्या कथामधून आलेल्या आहेत.

“वर्त जंगमांची शिपुरी टेकडांच्या पायथ्याला शिदुबाजवळ झाडात लपलीवती. खालनं कांबीरी पुना–बेंगलोर रोडला सुस्त झोपलेली. ऐसपैस पसरलेली. ” ‘कळस’ पृष्ठ क्र. २८

एकदंर पाटलांची शैली अशी विविधतेने नटलेली पहावयास मिळते. कधी ते प्रतिमांचा वापर करतात तर कधी बोली भाषेतील अनेक शब्द वापरतात. प्रतिमा वापरल्यामुळे त्यांच्या कथेला वजनदारपणा प्राप्त होतो. त्यांच्या कथेच्या बाबतीत एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ते म्हणजे ते निवेदन करत असताना कथेतील वर्णन आणि संवाद हे दोन्हीही ग्रामीण भाषेतूनच व्यक्त करतात. हा वेगळेपणा आपल्या नजरेस आल्याशिवाय राहत नाही.

डॉ. स. ग. यादव म्हणतात.

"आपण किती लिहीतो? यापेक्षा दर्जेदार किती लिहितो हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे कमी लेखन करुनही मराठी कथेत रंगराव बापू पाटील यांनी आपले स्थान पक्क केलल आहे. याला कारण त्यांची प्रसन्न शब्दकला होय." १५

जीवनात अतिशय कमी बोलणारे रंगराव बापू पाटील कथेत मात्र प्रत्येक शब्दातून बोलताना दिसतात. ग्रामीण कथा ही संभाषणातून घडतं जाते. रंगराव बापू पाटील यांना शब्दाचा सोस असल्यामुळे ते नित्य नवे शब्द शोधतात. त्यांची कथा अस्सल ग्रामीण शब्दकला व्यक्त करते.

डॉ. म. ना. अदवंत म्हणतात –

"व्यक्तीच्या व्यथा आणि समस्या रंगराव बापू पाटलांनी समर्थपणे रंगविलेल्या आहेत. खेडेगावातील अज्ञान, दारिद्रय आणि परस्पर हेव्यादाव्यातून निर्माण झालेले संघर्ष यांचे दर्शन बहुतेक कथातून होते. मात्र हे सर्व रंगवताना कृतिम किंवा कल्पनारम्य घटनांच्या आहारी कथाकार गेलेला नाही किंवा अकारण सहानभूती निर्माण करण्याचा प्रयत्नात भावविवश होऊन कारुण्याचे व दु:खाचे प्रदर्शन करण्याचा सोसपण लेखकाने बाळगला नाही. त्यामुळे या कथातील आशयाइतकी अभिव्यक्ती पण वैशिष्टयपूर्ण आहे. ग्रामीण भागातील अनुभव ग्रामीण भाषेतच व्यक्त केल्यामुळे कथेतील वातावरण घटनांना पोषक झाले आहे. " १६

'ल्हावर' मधील 'कळस', 'मळा', 'ल्हावर', 'सय', 'राखण' आणि 'सरकी' या कथा त्यातील जे लेखकाने जीवनदर्शन घडविले आहे ते विशेष उल्लेखनीय आहे. घटनामधील नाट्यही परिणामकारकपणे व्यक्त झालेले आहे. तसे पाहीले तर प्रत्येक कथाही जीवनानुभव व्यक्त करते आणि तो अनुभव वाचकाच्या मनावर ठसा उमटल्याशिवाय रहात नाही.

अशाप्रकारे स्वतंत्र भाषेचा डौल असणारी कथा रंगराव बापू पाटलांनी लिहिली. त्या कथेमध्ये कधीही कृत्रिमपणा वाटत नाही किंवा उसना आवेश कथेत दिसत नाही. ग्रामीण जीवनात घडलेल्या पिंडामुळे हे सर्व त्यांना शक्य झाले. ग्रामीण जीवन त्यांनी जवळून पाहीले आहे. त्यामुळे कथेचा शोध घ्यावा लागत नाही. व्यक्तींच्या बोलण्यातून सहज निरीक्षणामधून त्यांना कथेचे बीज मिळते. आणि कथासंग्रह श्रेष्ठ ठरला तो त्यांच्या प्रसन्न शब्दकलेमुळेच होय म्हणूनच

डॉ. स. ग. यादव म्हणतात –

"ग. दि. माडगुळकर, व्यंकटेश माडगुळकर, आनंद यादव, आनंद पाटील, रा. रँ. बोराडे, शंकर खंडू पाटील, चंद्रकुमार नलगे, संपतराव जाधव, मोहन पाटील या ग्रामीण लेखकांच्या आज व मागील पिढीत या लेखकांचे स्वतंत्र स्थान आहे. या निमित्ताने एका लेखकास खूप दिवसांनी गौरविले व न्याय दिला त्याबद्दल वाचक समाधानी आहे." [१७]

एकदंर वरील वैशिष्टयांनी हा कथासंग्रह नटलेला आहे.

सारांशरुपाने आपणास असे म्हणता येईल की, काही दोष वगळता रंगराव बापू पाटील यांची कथा खरोखरच श्रेष्ठ आहे. कारण या कथासंग्रहाने मराठी ग्रामीण कथेमध्ये मोलाची भर घातलेली आहे. म्हणून या कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाने पुरस्कार देऊन जे गौरविले आहे ते एका अर्थाने योग्यच आहे. कारण तो तेवढ्या तोलामोलाचा कथासंग्रह आहे. मराठी ग्रार्मीण कथेचा इतिहास लिहिताना कोणासही 'ल्हावर' ला वगळून तो लिहिता येणार नाही. इतके सामर्थ्य 'ल्हावर'चे आहे.

# संदर्भ टीपा


| अ.न. | लेखक | |
|---|---|---|
| १. | डॉ. यादव स. ग. | 'प्रसन्न शब्दकलेचा लेखक रंगराव बापू पाटील'. |
| २. | मोरे महादेव | 'ल्हावर : रसरशीत कथासंग्रह', नोव्हेंबर, १९७९. |
| ३. | डॉ. मुलाटे वासुदेव | 'ग्रामीण कथा स्वरुप आणि विकास', साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जानेवारी, १९९२, पृष्ठ क्र.२२४. |
| ४. | डॉ. यादव स. ग. | 'ग्रामीण कथा लक्षणीयभर ल्हावर' 'नवसंदेश', २३ ऑक्टोबर, १९८०. |
| ५. | डॉ. मुलाटे वासुदेव | 'ग्रामीण कथा स्वरुप आणि विकास', साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जानेवारी, १९९२, पृष्ठ क्र.२२३. |
| ६. | डॉ. मुलाटे वासुदेव | 'ग्रामीण कथा स्वरुप आणि विकास', साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जानेवारी, १९९२, पृष्ठ क्र. ८१. |
| ७. | डॉ. मुलाटे वासुदेव | 'ग्रामीण कथा स्वरुप आणि विकास', साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जानेवारी, १९९२, पृष्ठ क्र.२२४. |
| ८. | मोरे महादेव | 'ल्हावर : रसरशीत कथासंग्रह', नोव्हेंबर, १९७९. |
| ९. | डॉ. यादव स. ग. | 'प्रसन्न शब्दकलेचा लेखक रंगराव बापू पाटील' |
| १०. | डॉ. मुलाटे वासुदेव | 'ग्रामीण कथा स्वरुप आणि विकास' साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जानेवारी, १९९२, पृष्ठ क्र.२६३, २६४. |

११. डॉ. मुलाटे वासुदेव 'ग्रामीण कथा स्वरुप आणि विकास,'
साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती,
जानेवारी, १९९२, पृष्ठ क्र. १६३.

१२. डॉ. मुलाटे वासुदेव 'ग्रामीण कथा स्वरुप आणि विकास,'
साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती,
जानेवारी, १९९२, पृष्ठ क्र. १६२.

१३. अदवंत म. ना. 'मनाची पकड घेणाऱ्या कथा'

१४. डॉ. मुलाटे वासुदेव 'ग्रामीण कथा स्वरुप आणि विकास'
साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती,
जानेवारी, १९९२, पृष्ठ क्र.२६५.

१५. डॉ. यादव स. ग. 'प्रसन्न शब्दकलेचा लेखक रंगराव बापू पाटील'

१६. अदवंत म. ना. 'मनाची पकड घेणाऱ्या कथा'

१७. डॉ. यादव स. ग. 'प्रसन्न शब्दकलेचा लेखक रंगराव बापू पाटील'

टीप

प्रस्तुत काही संदर्भ लेखकाकडे उपलब्ध असलेल्या लेखामधून घेतलेले आहेत. त्यांचे प्रसिद्धी दिनांक नाहीत ती कात्रणे परिशिष्टात जोडलेली आहेत.